पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in
# द पीपल्स पोस्ट
वर्ष : १ । अंक अठरावा । मराठी पाक्षिक । मूल्य : २५ । दिनांक १६ ते ३१ मे


यशवंत मनोहर

**बुद्ध विचारांनीच जगात क्रांती होईल**


नागनाथ कोत्तापल्ले

**गोळवलकर गुरूजी व्हाया नेमाडे**

**शाळांतील २५% आरक्षणापासून खरी वंचित मुले दूर**

विजया मालती हरी



# निवडणूक फडात नागवा प्रचार

तेरा बाप भ्रष्टाचारी
राहुल गांधींच्या गळ्यात बॉम्ब बांधा
प्रियंका शुर्पनखा * मोदी दुर्योधन
स्पीडब्रेकर दीदी * लुडाय लाडू पाठवन
मंदिर वहीं बनाएंगे
मोदींच्या गुजरातेत दारू-पैसा जप्त
नथुराम देशभक्तच * एक्सपायरी पीएम
उसने कौनसे कलर की अंडरवियर पहनी है मैं जानता हूं
संस्कार नसलेल्यांनी दुसऱ्याच्या घरात डोकावू नये
राहुल भारतीय नाही


With Best
Compliments from
A.B.ENTERPRISES

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
सचिन ओव्हाळ

**मुखपृष्ठ**
भूषण बिरारी

**संपादकीय पत्रव्यवहार**
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com


(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)

*अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असेलच असे नाही.


द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२

- जाहिरात विभाग संपर्क
  ९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२
- वर्गणीदारांसाठी संपर्क
  **महाराष्ट्र / मुंबई :**

**विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
**मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
**मुंबई / कोकण** : संकेत तांबे : ७७३८७८४१३२

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा



पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १ ।
अंक १८ वा । मूल्य : रु. २५ । दिनांक १६ मे ते ३१ मे २०१९



संपादकीय ... ५
गोळवलकर गुरूजी व्हाया नेमाडे
नागनाथ कोत्तापल्ले ८
लोकशाहीच्या उत्सवात राजकीय पक्षांचा लक्षणीय सहभाग
प्रकाश खंडेलोटे १२
देशभंजक नायक ... १७
रोजगार उपलब्धतेत मुस्लिमांप्रती भेदभाव : एक अभ्यास
अजय के. नाईक, खलिद खान, आशुतोष वर्मा १९
स्वयंरोजगार करणाऱ्यांमध्ये गरिबी अधिक
प्रो.सुखदेव थोरात / मशकूर अहंमद २२
भाजप सत्तेपासून दूर राहणार!
प्रतिनिधी २६
बुद्ध विचारांनीच जगात क्रांती होईल
यशवंत मनोहर २८
शाळांमधील २५ टक्के आरक्षणापासून खरी वंचित मुले दूर
विजया मालती हरी ३२
व्यक्तिविशेष : ‘पाणीवाले बाबा’ डॉ. राजेंद्र सिंग
प्रतिनिधी ३५
ग्रंथपरिचय : डॉ. रावसाहेब कसबे यांचे ‘भक्ती आणि धम्म’ चिंतन
डॉ. मिलिंद कसबे ३८
आजकालचे प्रश्न : पंक्चरवाला ४०
कविता : – प्रा. डॉ. शेषराव नाईकवाडे ४४
ग्रेट थॉट्स : ... ४५
कोण काय बोलतं... : ... ४६



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. *संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460

## परिवर्तनवादी चळवळीला गती देणारे लेख हवेत

मी अगदी प्रारंभीपासून 'द पीपल्स पोस्ट'चा अंक वाचतो. या पाक्षिकात वाचकांच्या अभिरूचीनुसार वेगवेगळ्या विषयांवरील लेख छापले जातात. त्यातील मजकूर आणि पाक्षिकाची दिशा बघितली तर ते परिवर्तनवादी चळवळीला प्रेरणा देणारे असल्याचे जाणवते. त्यामुळे या पाक्षिकामध्ये परिवर्तनवादी चळवळीला गती देणारे लेख प्राधान्याने छापले पाहिजेत. बाजारात आज पायलीचे पन्नास मॅगझीन आहेत; परंतु ते काढण्यामागे केवळ व्यावसायिकता हेच एकमेव कारण दिसते. त्या तुलनेत 'द पीपल्स पोस्ट'चे धोरण व्यावसायिकतेचेच दिसत नाही. चळवळीसाठी पूरक असे हे पाक्षिक आहे. म्हणून यांमधून चळवळीला वाहून घेतलेल्या लोकांचे लेखही छापले पाहिजेत. कारण, अशा कार्यकर्त्यांचे अनुभवच चळवळीत नव्याने काम करणाऱ्यांना प्रेरक ठरू शकतील.नवीन लेखकांनाही या पाक्षिकात जागा मिळावी, असे मला सुचवावेसे वाटते. संपादकांनी, कृपया याची नोंद घ्यावी.

**– एस.आर. खरग, नांदेड**

## बसपा, भारिप–बहुजन महासंघाने संघटन वाढवावे

'दलित पक्षांच्या मतांमध्ये घट का होत आहे?' हा १६ ते ३० एप्रिलच्या अंकातील डॉ. माला मुखर्जी यांचा लेख अत्यंत माहितीपूर्ण होता. भारिप–बहुजन महासंघ, बहुजन समाज पक्ष आणि रिपाइं या पक्षांच्या २०१४ च्या विधानसभा निवडणुकीतील कामगिरीचे मूल्यमापन यात करण्यात आले आहे. अकोला पूर्व, मूर्तिजापूर, कारंजा, दर्यापूर, हिंगणघाट, नागपूर उत्तर आणि भंडारा या सर्व मतदारसंघांमध्ये भाजपचे उमेदवार विजयी झाले. त्या ठिकाणी दलित पक्षांनी दुसऱ्या क्रमांकाची मते मिळविली. बसपा राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत आहे; परंतु महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक लढवत असताना हा पक्ष स्थानिक प्रश्नांना महत्त्व देत नाही, असे वाटते. भारिप–बहुजन महासंघाने बहुजनांना सत्तेत वाटा देऊन अकोला पॅटर्न प्रस्थापित केला; परंतु राज्यात अन्य ठिकाणी या पक्षाला त्याचे बळ दाखवता आले नाही.

**– सदानंद गजभारे, पुणे**




## राष्ट्रभक्तीच्या सोंगाला कुणीही दाद देणार नाही

'सावधान! दारात आलंय राष्ट्रभक्तीचं सोंग' हे १६ ते ३० एप्रिलच्या अंकातील संपादकीय आम्हाला विशेष आवडले. शहीद जवानांच्या नावे मतं मागणं असो, राजकारणासाठी धर्माचा वापर करणं असो की, कुंभमेळ्यात स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पाय धुणे असो, या सर्व कृती म्हणजे राष्ट्रभक्तीचे निवळ नाटक होय. प्रत्यक्षात सरकार चालविणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा काश्मिरातील ३७० व्या कलमाला विरोध आहे. भाजपने तर त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यातच या कलमाचा मुद्दा मांडला असून भाजप पुन्हा सत्तेत आल्यास ३७० वे कलम रद्द करण्याचे आश्वासन भाजपची मंडळी देत आहेत. ही मोदींची देशभक्ती आहे काय? देशभक्तीच्या नावाखाली हिंदूराष्ट्र निर्मितीचा भाजप आणि संघाचा डाव आहे. नरेंद्र मोदी यांच्या धोरणावर संपादकीयात जोरदार प्रहार करण्यात आला, याबद्दल संपादकांचे अभिनंदन.

**– सुलक्षणा माने, मुंबई**

## खा. शरद यादव यांची भूमिका योग्यच

'द पीपल्स पोस्ट'चे संपादक चेतन शिंदे यांनी घेतलेली खा. शरद यादव यांची मुलाखत १६ ते ३० एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध झालेली आहे. या मुलाखतीत खा. यादव यांनी देशाचे स्वातंत्र्य धोक्यात आल्याची जी भीती व्यक्त केली आहे, ती काही अंशी खरी आहे. कारण भाजपच्या राजवटीत राज्यकर्त्यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता या राज्यघटनेतील मूल्यांची गळचेपी केली. कायदा हातात घेऊन निरपराधांना जिवे मारले गेले. यामुळे देशात भीतीचे वातावरण होते. अशातच लागलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप राष्ट्रवादाचा नारा देत आहे. देशात एकाधिकारशाही आणि भीतीचे वातावरण निर्माण करायचे आणि राष्ट्रवाद जोपासायचा, ही भाजपची नीती सामान्यजणांना रूचणारी नाही. खा. शरद यादव यांनी या मुलाखतीत सामान्य माणसाच्या मनातील भावनाच व्यक्त केलेल्या आहेत.

**– संदीप वाघमारे, नागपूर**

**'ग्रेट थॉट्स' प्रेरणादायी :** 'द पीपल्स पोस्ट'मध्ये नियमित प्रसिद्ध होणारे 'ग्रेट थॉट्स' हे सदर प्रेरणादायी आहे. यात प्रसिद्ध होणारे विचारवंत आणि महापुरूषांचे विचार जीवन जगण्यासाठी बळ देणारे असतात. धावपळीच्या जीवनात अनेक व्याधींना तोंड देत जगणारा माणूस हे विचार वाचून सुखावतो. या सदरात जास्तीत जास्त भारतीय विचारवंत आणि महापुरूषांचे विचार प्रसिद्ध केले जावेत, असे आम्हाला वाटते. **– तुकाराम ढगे, गणेश कांबळे, साहेबराव कांबळे, यवतमाळ**

संपादकीय

# निवडणूक फडात नागवा प्रचार



लोकशाहीत निवडणुकांना आणि निवडणुकीत प्रचाराला खूप महत्त्व असतं. वेगवेगळे पक्ष शड्डू ठोकून किंवा बिनशड्डूचे उभे असतात. आपण निवडणुकीत का उभं आहोत, देश- समाजासाठी आपल्याला काय करायचं आहे आणि सत्ताधारी कोणत्या वाटेवरून कसं चालत असतात हे मतदारांना समजून सांगायचं असतं. आपली भूमिका सांगून मतं मागायची असतात आणि सत्ता मिळवायची असते. लोकशाही हाताळताना नैतिकतेचं एक बंधन असावंच लागतं. ते स्वतःहून घालून घ्यावं लागतं किंवा जी बंधनं तयार केली आहेत ती उत्स्फूर्तपणे पाळावी लागतात. असं झालं तर लोकशाहीला आणि तिनं जन्माला घातलेल्या निवडणुकांना एक सुंदर शील लाभतं. म्हणजे लोकशाही नुसतीच राहत नाही, निवडणुका नुसत्याच लढवल्या जात नाहीत तर त्या शिलवान बनतात. शील लाभणारी प्रत्येक गोष्ट सुंदर असते. परिणामकारक असते. तिच्या गळ्यात मूल्यांच्या माळा चकाकायला लागतात; पण हे झाले थेअरीतलं. वास्तवात आपण पाहतो आहोत ती प्रचाराची पातळी प्रत्येक निवडणुकीत खालावत चालली आहे. प्रचाराच्या लज्जारक्षणासाठी मूल्यांची वस्त्रे असतात. ती गळून पडली की, प्रचार विवस्त्र होतो. गावठी भाषेत बोलायचं तर नागवा होतो. नागवा प्रचार लोकशाही, निवडणुका आणि मतदान यांना वेगळं रूप देतो. त्यांचं अवमूल्यन करतो. अपमानित करतो. प्रचार मूल्ये पाळून करायचा की मूल्ये तुडवून, प्रचार कमरेखाली वार करून करायचा की कमरेवर वार करून; प्रचाराला प्रबोधनाचं साधन समजायचं की निंदानालस्तीचं राजकारण, असे अनेक प्रश्न तयार होतात. जे यावेळच्या निवडणुकीत तयार झाले. अर्थातच, लोकशाहीच्या दृष्टीनं ते चिंताजनक आहेत. मूल्याशिवाय, शिलाशिवाय, गांभीर्याशिवाय लोकशाही असू शकत नाही. लोकांच्या अंतर्बाह्य विकासासाठी ती असते याचा विसर पडता कामा नये.

यावेळच्या निवडणुकीत काहींनी जीभ टाळ्याला चिकटवून प्रचार केला. काहींनी तोंडाला कुत्रं बांधून केला. काहींनी वैयक्तिक निंदानालस्तीलाच आपला निवडणूक अजेंडा बनवला. काहींनी मारहाण करून, काहींनी सोशल मीडियावर घंटागाड्या चालवून, काहींनी कुळीमुळे उकरून तर काहींनी सत्तेतून निर्माण झालेली मस्ती दाखवून, छातीचं माप सांगून तर काहींनी चौकीदार चोर झाल्याचं सांगत प्रचार केला. मुळात वेगवेगळ्या पक्षांनी मांडलेल्या भूमिका, देश आणि समाजासमोरचे प्रश्न, लोकांच्या जगण्या-मरण्याचे प्रश्न, वाढत चाललेला आत्महत्येचा ऋतू, माणसाला भेडसावणारा दुष्काळ, वादळं, भूकंप अशी नैसर्गिक संकटे, विकासाची गती, विकासाचे विकेंद्रीकरण, राज्यघटनेची सुरक्षितता, जातिअंताचे प्रकल्प आणि लोकशाहीच्या आड येणारा मूलतत्त्ववाद आदींवर गांभीर्यानं चर्चा घडायला हवी होती. तसं न करता आरोप-प्रत्यारोपांचा उत्सव सुरू झाला. त्यातून हाणामाऱ्या सुरू झाल्या. एकमेकाला अडवण्यासाठी कोर्टबाजी सुरू झाली. बेकारी, भ्रष्टाचार, कुपोषण, आत्महत्या, शिक्षण आदी प्रश्न घेऊन कोर्टात जाण्याऐवजी यानं आम्हाला अशी शिवी दिली आणि त्यानं थोबाडीत मारलं अशा चर्चा न्यायदेवतेच्या दरबारात जाऊ लागल्या. मुळात मुख्यमंत्र्यांच्या थोबाडीत मारणं लज्जास्पद आहे. या कृतीला पाठिंबा देणं आणखी लज्जास्पद आहे. निवडणुका म्हणजे एक उलाढाल, मतदारांशी करावयाचा सौदा असे समजून काहींनी पैशाचा पाऊस आणि पैशाची छत्री करण्यासाठी काळा पैसा भरपूर प्रमाणात बाहेर काढला. सुमारे चार हजार कोटी रुपये पकडण्यात आले. कोणी टायरमध्ये, कोणी टोपीत तर कोणी अजून कशात तरी पैसे लपवले होते. न सापडलेला पैसा यात मिसळल्यास आकडा प्रचंड होईल. मतदारांना निवडणुकीची झिंग यावी यासाठी दारूचे पाट वाहण्याचा प्रयत्न झाला. प्रशासनानं एक हजार कोटींच्या घरात जाईल एवढी दारूच पकडली. दारूबंदी राज्य आणि पंतप्रधानांचे राज्य असलेल्या एका गुजरातेत पाच-पन्नास कोटींची दारू जप्त झाली. सरकारी मान्यता असलेली आणि नसलेली अशी दोन्ही प्रकारची दारू पसरवण्यात येत होती. विशेष म्हणजे, आपल्याकडे दारूबंदीही आहे आणि दारूनिर्मिती करण्यास परवानगी देणारा कायदाही आहे. आपल्याकडे दारूसेवनास बंदी आहे; पण परमिट काढून दारू पिण्यास परवानगीही आहे. मोठं मजेशीर प्रकरण आहे. तर निवडणुकीत मोठ्या प्रमाणात दारू का पळवली जाते? त्याऐवजी दुष्काळात घसे कोरडे करून फिरणाऱ्यांना पाणी का दिलं जात नाही? तर निवडणूक झिंगावी, कोमात जावी, संमोहित व्हावी म्हणून काही जण प्रयत्न करत असतात. गंमत म्हणजे यात काही लोक टिऱ्या बडवून आपण लोकशाहीवादी असल्याचं सांगत असतात.

निवडणूक प्रचारात आरोप-प्रत्यारोप होणे अगदी स्वाभाविक असतं. ऑडिट करण्याचा आणि वास्तव समाजासमोर आणण्याचा तो एक मार्ग असतो. पण आरोप कोणते करायचे,

विधानं कशी करायची याचं तारतम्य आणि विवेक बाळगायला हवा. तो बाळगला नाही तर मूल्यांना जखमा होतात; पण याची फिकीरच अनेकांना नसते. लक्ष वेधून घेण्यासाठी, विरोधकांना वाईट पद्धतीनं नामोहरम करण्यासाठी पडद्यामागंही शोभणार नाहीत अशी विधानं केली जातात. ज्यांचे चिक्कीचोर म्हणून विरोधक वर्णन करतात त्या महिलेनं राफेलचा विषय चघळत असं विधान केलं की, राहुल गांधींना हेलिकॉप्टरमध्ये बसवून खिडकीतून फेकून द्या. एका नेत्यानं सांगितले की, ममतादीदी मला दरवर्षी कुर्ता आणि मिठाई पाठवतात. यावर दीदी म्हणाल्या, की त्यांना दगडानं भरलेलं मातीचे रसगुल्ले पाठवेन. मग मोदी त्यांना स्पीडब्रेकर दीदी म्हणाले, तर या म्हणाल्या ते तर एक्सपायरी पीएम आहेत. फोन केल्यावर हजर व्हायला मी कोणाची नोकर नाही. याचा सुषमादीदींना राग आला. खरं तर त्यांना निवडणुकीत आपला पत्ता काटल्याबद्दल राग यायला हवा होता. पण कोण्या एकेकाळी समाजवादाची आणि आता हिंदुत्वाची माळ मिरवणाऱ्या सुषमादीदींना राग आला नाही. बंगालीदीदींच्या वक्तव्यावर त्यांनी ट्विट केला. एक शेरच ऐकवला तो असा

**दुश्मनी जम कर करो लेकिन ये गुंजाइश रहे**
**जब कभी हम दोस्त हो जाएं तो शर्मिंदा न हो**

या शेरातून त्यांना काय सांगायचं हे सर्व बिनशेरवाल्यांनाही कळून चुकलं असेल. बंगालीदीदींनी लोकशाहीच्या मर्यादा ओलांडल्या हे वाक्य त्यांनी साध्वी ठाकूरबाईंना का सांगितलं नाही? त्या तर खुलेआम म्हणाल्या की, माझ्या शापामुळे करकरेंसारखा कर्तव्यदक्ष अधिकारी मरण पावला. साध्वीच्या या विधानात कोणती लोकशाही आणि कोणतं मूल्य आहे? ज्यांच्यावर दहशतवादाचे खटले चालू आहेत ते तुरुंगाबाहेर पडताच शुद्ध कसं होतात, स्वयंघोषित शुद्ध कसं होतात? असं कोणतं तीर्थ गंगेच्या काठी आहे किंवा मध्य प्रदेशातल्या हिंदुत्वाच्या शाळेत आहे की ज्यामुळे माणूस शुद्ध होतो?

निवडणूक काळात गाजणारा राफेलचा विषय मागं पडला आणि व्यक्तिगत पातळीवर वार-प्रतिवार होऊ लागले. शरद पवारही अशा वाराचे धनी झाले; पण त्यांनी बारामती टाईप उत्तर देऊन टाकलं. ते म्हणाले, 'ज्यांना स्वतःचं घरदार, संसार नाही त्यांनी दुसऱ्याच्या घरात डोकावू नये. घराचं महत्त्व घरदार तयार करणाऱ्याला कळतं. फकिराला कसं काय कळणार,' असाच त्याचा अर्थ होतो. पण मोदी मोठे वस्ताद आहेत. छातीबरोबरच त्यांनी चौकीदार आणि फकिराचंही भांडवल केलं. मग कोणी तर मोदींना औरंगजेब म्हणालं. मग कुणीतरी राहुल गांधी भारतीय नाहीत. त्यांच्या आई भारतीय नाहीत, पूर्वाश्रमीच्या जीवनात त्या कोठे कसले काम करत होत्या वगैरे कपोलकल्पित कथा बाहेर येऊ लागल्या. कोर्टात जाऊ लागल्या.

बोफोर्स प्रकरणात ज्यांच्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपांचा वर्षाव झाला त्या राजीव गांधी यांनी संसदीय समिती नेमून दूध का दूध पानी का पानी केलं होतं; पण मोदी मात्र राजीव गांधींचं वर्णन 'तेरा बाप भ्रष्टाचारी' असे करू लागले आहेत. एक तर उत्तरं द्यायला राजीव गांधी हयात नाहीत. त्यांची हत्या देशाचे ऐक्य आणि एकात्मतेवरूच झाली होती. त्यांच्या मातोश्रीनं तर बलिदान दिलं होतं; पण प्रचारात मात्र कुळीमुळी काढत एकतर्फी मारा सुरू झाला. ट्रोलची फौज पुढं सरसावली. जणू काही राहुल यांचा अभिमन्यूच करायचाय. राहुल गांधींनी जेव्हा महात्मा गांधींच्या हत्येसंदर्भात हिंदुत्ववादी संघटनेचं नाव घेतलं तेव्हा त्यांच्याविरुद्ध कोर्टात खटला भरला गेला. मग आता काय करायचं? आपला तो सोन्या आणि दुसऱ्याचं ते कारटे या न्यायानं चाललंय. जे जे मुस्लिमांच्या बाजूनं बोलले त्यांना पाकिस्तानी किंवा पाकचे हस्तक ठरवण्यासाठी आरोपांचा भडिमार केला. गुजरातमधील नरसंहारात ठार झालेल्यांना श्रद्धांजली वहावी असं कुणाला वाटलं नाही. बुरख्याच्या बाजूनं बोललं की पाकिस्तानी, सर्जिकल स्ट्राईकचा विषय काढला की पाकिस्तानी, घुंगटाचा विषय काढला की घरात घुसून ठार करू अशा धमक्या. पण हे विषय ना निवडणूक आयोगानं नोंदवले ना ते कोर्टात कधी गेले. दुसऱ्याच्या घराचे आडे मोजणाऱ्यांना स्वतःच्या पत्नीची माहिती विचारली की राष्ट्रद्रोह होतो. लष्करातून बडतर्फ झालेल्या तेज बहादूरनं तर मी भाजप विरोधात निवडणूक लढवू नये म्हणून मला पन्नास कोटींची ऑफर होती असा आरोप केला, तर दुसऱ्या एका नेत्यानं म्हणजे खाननं एका महिलेची अंतर्वस्त्रे आपल्याला ठाऊक आहेत असं लज्जास्पद विधान केलं. आता अशा विधानांचा लोकशाही आणि मतदानाशी काय संबंध? पण ज्यांनी तोंडाला लूत आलेलं कुत्रंच बांधून फिरायला ठरवलंय त्यांना चाप देणारी व्यवस्था कोणीच कशी वापरत नाहीय?

कुणी किती सर्जिकल स्ट्राईक केले हे सांगण्याची स्पर्धा सुरू केली. देशाच्या संरक्षणाविषयी महत्त्वाचा, जिव्हाळ्याचा आणि तसा गोपनीय असणारा विषय निवडणुकीच्या फडात ओढण्यात आला. मतांचा विषय करण्यात आला. क्षेपणास्त्रं काय दिवाळीत उडवायची का, असा प्रश्न पंतप्रधानांनी भरसभेत विचारला. क्षेपणास्त्रे दिवाळीत उडवायची असं कोणीच म्हणणार नाही; पण ती कधीही उडवायची नसतात हेही सर्वांनाच ठाऊक आहे. साध्वीवर एवढे गंभीर आरोप असताना तिला निवडणूक लढवायला परवानगी कशी, असा प्रश्न आरोप-प्रत्यारोपाच्या गदारोळात कुणी कुणाला विचारलाच नाही. मग दिल्लीत असाच आरोप एका उमेदवाराबाबत झाला. तो मुस्लिम नसताना राखीव जागेवर उभा आहे असा तो आरोप.

बघता बघता प्रचार शुर्पणखा, दुर्योधन, अर्जुन, रावण यांच्यावर सरकला. प्रियंकाच्या लांबसडक केसांवर सरकला. त्यांचे केस म्हणजे वीरप्पनच्या मिशा अशी आवई कुणी तरी उठवली. मग पंतप्रधान मोदींवरील चित्रपटावर चर्चा सुरू झाली. स्वतःचीच टिमकी वाजवण्यासाठी आणि स्वतःला हिंदुत्वाचा हिरो ठरवण्यासाठी काढलेला चित्रपट ऐन निवडणुकीत प्रदर्शित

करण्याचा प्रयत्न करणे हा काही योगायोग नाही. राजकीय योगायोग तर नाहीच नाही. अजूनही असं बरंच काही तरी घडत गेलं. हे सारं पाहून जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाहीविषयी जगाचं मत काय झालं असंल हेही कुणाच्या ध्यानीमनी आलं नाही.

निवडणूक काळात असा एकही दिवस गेला नाही की, शेतकऱ्यांनी आत्महत्या केली नाही. पंजाबात दर आठ तासांनी आणि महाराष्ट्रात रोज आठ आणि बीड जिल्ह्यातही रोज एक-दोन आत्महत्या होतात. पण कोणत्याही सभेत कोणा मृत शेतकऱ्याच्या वाट्याला श्रद्धांजली आली नाही. पंकजा मुंडे ज्या जिल्ह्याच्या नेत्या आहेत, त्या बीड जिल्ह्यात आत्महत्यांनी विक्रम केला. लोक पाणी आणायला जाऊन मेले. भाकरीच्या शोधात खेडी ओस पडायला लागली. सुशिक्षित बेरोजगारांमध्ये गुन्हेगारी वाढू लागली. सोशल मीडियानं याच काळात ताळतंत्र सोडलं. तेथे वापरली जाणारी आईमाई काढणारी आणि लिंगवाचक भाषा उच्चार करू नये अशी झाली. पण यापैकी कोणतेही विषय गांभीर्यानं चर्चेसाठी आले नाहीत. याचा अर्थ, इश्यू नसलेला आणि शिवीगाळ, चारित्र्यहनन करणारा आणि मृगजळाचं सत्य समजून दे ठोकून, असा हा प्रचार होता. तो जात, धर्म, मूलतत्त्ववाद, मंदिर, चारित्र्यहनन यावरच घसरला. लोकांना काय मिळालं असंल या प्रचारातून आणि लोकशाहीच्या शरीरावर कोणतं मूल्य सजलं असंल यातून, याचा विचार आज ना उद्या करावा लागंल. तो करायचा असंल तर मोकाट सुटलेल्या आणि ताळतंत्र नसलेल्या जिभा वापरणाऱ्या राजकारण्यांवर लोकांचा अंकुश, दबाव वाढायला हवा. आपल्याकडे तो वाढू दिला जात नाही. भावनेच्या भोवऱ्यात तो अडकवला जातो. तो पाणी मागतो तेव्हा त्याला स्वस्त दारू, तो फूटपाथवर जातो तेव्हा त्याला मोफत संडास, तो मनगटासाठी काम मागतो तेव्हा त्याच्यासाठी मनिऑर्डर, तो औषध मागतो, सलाईन मागतो तेव्हा त्याला धर्मस्थळ असा हा मामला आहे. लोकहो सावध रहा, भ्रमातून-भावनांतून दूर व्हा, दिवास्वप्न पाहू नका; कारण लोकशाहीचा हात तुमच्या हातात आहे. जादूगार किंवा सौदागारांच्या हातात नव्हे.

नरेंद्र मोदींच्या काही विधानांविरुद्ध विरोधकांनी निवडणूक आयोगाचे, सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. पण आयोगाने मोदींना पहिल्या नऊ प्रकरणांत निर्दोष सोडलं. आयोगाच्या निर्णयाचा आदर केला पाहिजे; पण तरीही सामान्य माणसाच्या मनातील काही प्रश्न शिल्लक राहतातच. त्याची उत्तरं कोण, कशी देणार यावर तूर्त तरी उत्तर नाही. तर मोदींनी यांची अशी कोणती विधाने होती हे पाहणंही उचित ठरेल. काही उदाहरणे देत आहे. एक : हिंदूंचे वर्चस्व असलेल्या ठिकाणी निवडणूक लढवण्यास भीती वाटते म्हणून ते अल्पसंख्य मोठ्या प्रमाणात असलेले मतदारसंघ निवडतात. २) नव्या मतदारांना आपलं पहिलं मत पुलवामामधील शहिदांना समर्पित करता येईल का? ३) आमच्याकडचे बॉम्ब दिवाळीत उडवण्यासाठी ठेवले आहेत काय? ४) त्यांनी ४० जवानांना मारलं आम्ही त्यांचे ४२ ठार केले. ५) पाकिस्तानने पायलट अभिनंदन यांची सुटका केली नसती तर पाकमध्ये कत्तलीची रात्र ठरली असती. ६) राजीव गांधींच्या आयुष्याची अखेर भ्रष्टाचारी नंबर वन अशी झाली. याशिवाय आणखी काही विधानं आणि आरोप आहेत. मोदींची त्यातून सुटका झाली असली तरी अशी विधानं इतरांनी केली असती तर त्यांच्या वाट्याला काय आलं असतं याचा विचार करावा. समाजाला मध्यमवर्ग, बुद्धिजीवी वर्ग अशा प्रकरणात फारसा जागा झाला नाही. लेखक, विद्वानांनी एक निवेदन प्रसिद्ध केलं आणि दिल्ली विद्यापीठातल्या दोनशे प्राध्यापकांनी एक निवेदन काढून आपल्या मनातलं असमाधान व्यक्त केलं. स्वतःही शिव्यांचे शिल्पकार आणि आरोपांचे महान संशोधक असलेल्या मोदींनी आपल्याला काँग्रेसने कशा कशा शिव्या दिल्या, याचा एक शब्दकोशच तयार केला. तो जाहीर सभेत ऐकवला. त्या शिव्या अशा : गटारीतला किडा, पिसाळलेला कुत्रा, माकड, मौत का सौदागर, व्हायरस, दुर्योधन, साप, हिटलर, जल्लाद, औरंगजेब, जवानांच्या रक्ताचा दलाल, मोस्ट स्टुपिड म्हणजे लुच्चा, विंचू इत्यादी. साप, विंचू हे सरपटणारे प्राणी खूप दिवसांपासून राजकारणात रुळले आहेत. त्यात सापनाथ, नागनाथही आलाच. ही सर्व विशेषणे, शिव्या याचा अर्थही असा होतो की, आपलं राजकारण आणि त्यातील नैतिकताही घसरगुंडी बनते आहे. मोदींचे स्मरण चांगले आहे. त्यांनी या सर्व शिव्यांचा संग्रह केला; पण स्वतः जन्माला घातलेला संग्रह त्यांनी का जाहीर केला नाही, हा प्रश्न उरतोच. कमरेखाली वार करण्याची आणि ट्रोलची फौज वापरून व्यक्तिगत निंदानालस्ती करण्याची परंपरा चालू कुणी केली? सफाई कामगारांचे पाय धुवायचे, बाबासाहेबांच्या नावानं पंचतीर्थ करायचं आणि दलितांच्या हत्या झाल्यानंतर, बुद्ध, आंबेडकर यांचे पुतळे फोडल्यावर मौन पाळायचं हे कुणी सुरू केलं? सदाशिव पेठेतला स्कॉलर मुलगा म्हणून ज्यांची ओळख आहे त्या प्रकाश जावडेकर यांनी आपली प्रतिभा पणाला लावून काँग्रेसने आतापर्यंत बावन्न वेळा शिव्या दिल्याचा निष्कर्ष काढला; पण आकड्यांच्या बाबतीत भारी तज्ज्ञ असलेले आणि शस्त्रक्रिया करून सडपातळ, चपळ होता येतं हे सिद्ध करणारे नागपूरच्या रेशीम बागेतले नितीन गडकरी यांनी अधिक चांगला अभ्यास केला. काँग्रेसने मोदींना बावन्न वेळा नव्हे तर छप्पन्न वेळा शिव्या दिल्या हे सिद्ध केलं. रेशीम बागेतले बहुतेक जण आकड्यांत आणि समीकरणात सदाशिव पेठेपेक्षा तरबेज असतात. आता या दोघांवर जबाबदारी आहे की, गेल्या पाच वर्षांत मोदींनी काँग्रेसला आणि तिच्या परंपरेला किती वेळा शिव्या दिल्या, हेही शोधून काढावं. आकड्यात गोंधळ होत असंल तर गुगलसाहेबाची किंवा आपणच तयार केलेल्या ट्रोल सेनेची मदत घ्यावी. त्यांना सांगावं, कसला तरी स्ट्राईक (सर्जिकल नव्हे) करा आणि शोधून काढा किती शिव्या दिल्या. ●●●

# गोळवलकर गुरूजी व्हाया नेमाडे




नागनाथ कोत्तापल्ले

भाग १

भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी १९६३ साली प्रसिद्ध झाली. ती पुढची दहा-पंधरा वर्षे दुर्लक्षितच राहिली; परंतु येथे त्यांच्या कादंबरीलेखनाचा विचार करावयाचा नाही. खरे म्हणजे तेही केले पाहिजे. त्यांनी ज्या विविध भूमिका घेतल्या, जो देशीवाद मांडला त्या आधारे त्यांच्याच कादंबऱ्यांचे मूल्यमापन केले पाहिजे, ते येथे करावयाचे नाही.कादंबरीमधील क्वचित एखादद्दुसरा संदर्भ विवेचनाच्या ओघात येऊ शकेल; परंतु त्यांच्या कादंबरीलेखनाचा विचार येथे करावयाचा नाही. त्यांनी जे 'समीक्षासदृश्य' लेखन केले आहे, जो देशीवाद मांडला आहे, त्याचा विचार करावयाचा आहे.

इंग्रजीचे प्राध्यापक आणि मराठीमध्ये समीक्षासदृश्य लेखन करणारे पद्मश्री रा.रा. भालचंद्र नेमाडे यांनी 'देशीवाद' या नावाचा एक लेख १९८४ मध्ये प्रथमतः इंग्रजीमध्ये लिहिला. त्याचाच अनुवाद १९८८ मध्ये मराठीमध्ये प्रकाशित केला. तेव्हापासून त्याबद्दल अनुकूल-प्रतिकूल चर्चा चालू आहे. एवढेच नाही तर साहित्य आणि जीवनाच्या क्षेत्रात जसे काही महत्त्वाचे वाद असतात, तसाच काही हाही प्रकार असावा, असे अनेकांना वाटू लागले. सौंदर्यवाद, वास्तववाद हे जसे साहित्यादी कलांमध्ये चर्चाविषय होतात किंवा मार्क्सवाद, आंबेडकरवाद, गांधीवाद हे सामाजिक क्षेत्रामध्ये महत्त्वाचे ठरतात, तसेच काहीसे देशीवादाचे आहे की काय, असा भ्रम अनेकांना झाला आहे. एवढेच नाही तर हा 'वाद' म्हणजे काही तरी मूलभूत व सर्वस्वी अनोखी गोष्ट आहे, असाही काहींचा गैरसमज झालेला आहे. काहींचा म्हणजे कोणाचा, तर त्यांच्या अड्ड्यावरच्या साहित्यिकांचा. भालचंद्र नेमाडे यांच्यापासून मराठी साहित्यविश्वाला दोन गोष्टी लाभल्या आहेत. एक म्हणजे अड्डा संस्कृती आणि दुसरं म्हणजे भक्तिसंप्रदाय. अड्ड्यावरच्या प्रत्येकास परस्परांची प्रशंसाच करावयाची असते, हे अड्डा संस्कृतीचे महत्त्वाचे लक्षण असते. जमेल तसे अड्ड्यात सामील असणाऱ्यांच्या पदरी काही लाभ पडतील असेही पाहावयाचे असते. म्हणजे वंगण टाकले की




ज्याप्रमाणे गाडा व्यवस्थित चालतो, त्याप्रमाणे अड्डाही व्यवस्थित चालतो. नव्हे, अड्ड्यावर हजेरी लावणाऱ्यांची संख्या आपसूक वाढत जाते. त्यांचे दुसरे योगदान म्हणजे भक्तिसंप्रदायाची निर्मिती त्यांनी केली आहे. अर्थात, येथे भक्ती म्हणजे खुद्द भालचंद्र नेमाडे यांचीच केली पाहिजे, ही प्राथमिक अट असते. जसे एखाद्या संप्रदायामध्ये स्वामी जे सांगतो, ते साऱ्यांनी निमूटपणे ऐकायचे असते, माना डोलवायच्या असतात व स्वामींच्या मतांचा प्रचार सर्वदूर करावयाचा असतो. भालचंद्र नेमाडे यांच्या अड्ड्यावरील स्वामी अर्थातच ते स्वतःच आहेत. गेल्या ४०-४५ वर्षांपासून ते काही सांगत असतात. त्यात तथ्य किती याचा विचार करण्याचे त्यांच्या भक्ताला कारण उरत नाही. त्यांनी बोलावे व यांनी टाळ्या वाजवाव्यात, ते विचार सर्वदूर प्रसारित करावेत, हेच या

भक्तिसंप्रदायाचे ब्रीद असते. त्यांनी सांगावे की साठ हजार वर्षांपूर्वी मराठी भाषा होती, पूर्वी जाती मुळी नव्हत्याच. त्या इंग्रजांमुळे भारतात आल्या; इंग्रजांनी–भारतीयांना नव्हे हिंदुस्तानच्या लोकांना शिक्षण देऊन फार मोठे नुकसान केले, धर्मनिरपेक्षता मुळी टाकावू गोष्ट आहे, ती काय मानता? आपल्या जाती फार श्रेष्ठ आहेत, जातीवर प्रेम करा, भारतीय राज्यघटना ताबडतोब बदलून टाका, अशी एकापेक्षा एक क्रांतीकारी आणि भयप्रद विधाने ते करीत सुटतात आणि त्यांचे भक्त माना डोलवतात. एवढेच नाही तर स्वामी ज्या अर्थी हे सांगत आहेत, त्या अर्थी त्यात नक्कीच काहीतरी 'रहस्य' असलं पाहिजे असे वाटून त्यांचा भक्तिभाव अधिकच प्रबळ होत जातो.


साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात अड्डेबाजी वाढली आणि भक्तिसंप्रदाय वाढला की 'असंख्य धोके' निर्माण होतात. मुख्य धोका म्हणजे सर्वत्र स्वामीची प्रतिरूपे तयार होतात. विचारस्वातंत्र्य हरवून जाईल असा धाक आसमंतात निर्माण होतो. परिणामी संपूर्ण साहित्य आणि संस्कृतीचे क्षेत्र कोडे होऊन जाते. यापेक्षा भयप्रद गोष्ट म्हणजे तद्दन चुकीचे आणि समाजविरोधी विचार प्रसृत व्हायला लागतात. जसे, जात ही खरोखरच नैसर्गिक किंबहुना ईश्वरनिर्मित गोष्ट आहे, असे वाटायला लागते. परंपरा म्हणजे सारसर्वस्व वाटायला लागतात. यातून निर्मितीशीलताच हरवून जाते. असे एकापेक्षा एक भयप्रद धोके निर्माण होतात. याचे एक–दोन अनुभव आमच्याही प्रचितीस आले. त्यांच्या अड्ड्यावरील एक लेखक महाशय स्वामीच्या पुढे दोन पावले टाकून आधुनिक काळात जात किती महत्त्वाची आहे हे आम्हाला पटवून सांगू लागले. त्यापेक्षाही एक दुःखद गोष्ट म्हणजे काही लेखक आपले स्वत्व सोडून स्वामी जसे लिहितात, तसे लिहू लागले आहेत. म्हणजे प्रत्येकाने आपापल्या जातीला परंपरेने दिलेला व्यवसाय करण्यातच कसे हित आहे वगैरे... तर अशी काही उदाहरणे पाहिल्यानंतर तीव्रतेने वाटू लागले की, देशीवादासंबंधी लिहिले पाहिजे. आणखी एक म्हणजे जानेवारी २०१६ मध्ये प्रा. रावसाहेब कसबे यांचा 'देशीवाद : साहित्य आणि समाज' हा तब्बल ४६० पृष्ठांचा ग्रंथ प्रकाशित झाला. त्यानंतर काय लिहायचे? असे मला वाटत होते. भालचंद्र नेमाडेही ब्रीदहीन, फॅसिस्ट आणि मनोरुग्ण लेखक आहेत तसे त्यांनी म्हटले आहे. तसेच भालचंद्र नेमाडे यांनी जी अड्डेबाजी आणि लेखन केले आहे ते आत्मप्रस्थापनेसाठीच केले आहे, असेही म्हटले आहे. आता आणखी काय लिहावयाचे? परंतु भक्तांची 'समरसता' पाहून लिहिणे आवश्यक आहे, असे वाटू लागले.

भालचंद्र नेमाडे यांची देशीवाद मांडणी होऊन आता ३२ वर्षे झाली आहेत. या काळात देशीवादावर लिहावे असे फारसे वाटले नाही. भक्तिसंप्रदाय धर्माच्या क्षेत्रात महत्त्वाचा आहे की नाही, त्याची वेगळी चर्चा होऊ शकते; परंतु सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्याच्या क्षेत्रात मुळी महत्त्वाचा असत नाही; परंतु देशीवादाचे अंतरंग उलगडून दाखविल्यामुळे लोकांची थोडी तरी गुंगी उतरेल, असे वाटते. म्हणून 'देशीवाद' – म्हणजे भालचंद्र नेमाडे यांचा देशीवाद – नेमका आहे तरी काय? त्यांच्यावर नेमका कोणाचा प्रभाव आहे (अर्थात नामनिर्देश न करता), राल्फ लिंटन सारखी मोठी नावे घेऊन त्यांच्याच विचारांची कशी मोडतोड केली आहे? हे आणि यासारखे गंभीर चर्चेमध्ये आवश्यक असणारे मुद्दे चर्चेला घ्यावेत, एवढाच या लेखनाचा हेतू आहे. किंबहुना त्यांची चर्चा मराठी साहित्यजगताच्या दृष्टीने फार फार महत्त्वाची आहे, असे वाटते.

**भोवतालचे पर्यावरण :** 'वाद' अशी संज्ञा जेव्हा वापरली जाते, तेव्हा त्याला आपोआपच एक प्रतिष्ठा प्राप्त होते. कारण अशा वादांना एक सैद्धांतिक रूप असते. काही एक तत्त्वज्ञानात्मक पाया तेथे असतो. अशा वादांच्या आधारे जीवनातल्या सर्वच नसल्या तरी बहुसंख्य प्रश्नांची सोडवणूक होऊ शकते. उदाहरणार्थ, गांधीवाद किंवा वर निर्देशित केलेले वाद जीवनातल्या अनेक प्रश्नांची उत्तरे देतात. ती उत्तरे कोणाला मान्य असतील किंवा नसतील; परंतु सुसंगत व तर्काधिष्ठित उत्तरे मिळू शकतात. अशा वादांच्या मागे प्रदीर्घ काळचे चिंतन असते, तसेच त्यांना जीवनानुभवाचा आधार असतो. तसे काही नेमाडे यांचा देशीवाद करीत नाही. कारण त्यांचा देशीवाद हा भोवतीच्या पर्यावरणात स्वतःचे स्थान शोधण्याचा, पक्के करण्याचा एक 'मतलबी' व 'हिकमती' (दोन्ही शब्द नेमाडे यांचे) प्रयत्न आहे. हा प्रयत्न समजून घेण्यापूर्वी नेमाडे ज्या काळात लेखक म्हणून उभे राहू इच्छित होते, त्या काळातील वाङ्मयीन पर्यावरण समजून घेणे गरजेचे आहे.

१९६३ साली त्यांची 'कोसला' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. ती पुढची दहा–पंधरा वर्षे दुर्लक्षितच राहिली; परंतु येथे त्यांच्या कादंबरीलेखनाचा विचार करावयाचा नाही. खरे म्हणजे तेही केले पाहिजे. त्यांनी ज्या विविध भूमिका घेतल्या, जो देशीवाद मांडला त्या आधारे त्यांच्याच कादंबऱ्यांचे मूल्यमापन केले पाहिजे, ते येथे करावयाचे नाही.कादंबरीमधील क्वचित एखाददुसरा संदर्भ विवेचनाच्या ओघात येऊ शकेल; परंतु त्यांच्या कादंबरीलेखनाचा विचार येथे करावयाचा नाही. त्यांनी जे 'समीक्षासदृश्य' लेखन केले आहे, जो देशीवाद मांडला आहे, त्याचा विचार करावयाचा आहे.

'टीकास्वयंवर' हा भालचंद्र नेमाडे यांच्या फुटकळ लेखांचा संग्रह सप्टेंबर १९९० मध्ये प्रसिद्ध झाला. लगोलग म्हणजे १९९१ मध्ये या फुटकळ लेखांच्या संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कारही प्राप्त झाला. वस्तुतः परीक्षणे, फुटकळ लेख, मुलाखती असलेल्या असल्या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळावा का, हाच वादग्रस्त प्रश्न होऊ शकतो; परंतु त्या प्रश्नांशी आपल्याला तूर्त काही कर्तव्य नाही. या फुटकळ लेखसंग्रहामध्ये १९९० पर्यंत भालचंद्र नेमाडे यांनी लिहिलेले काही लेख, परीक्षणे, मुलाखती इत्यादी मजकूर संग्रहित करण्यात आलेला आहे. म्हणजे तोपर्यंत जे–जे त्यांनी समीक्षासदृश्य असे लिहिलेले होते, ते सारे या पुस्तकात समाविष्ट करण्यात आलेले आहे. पुढच्या कालखंडात त्यांच्या मुलाखतींची, भाषणांची आणि भाषाविज्ञानावरची पुस्तके




**साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला नेमाडे यांचा टीकास्वयंवर हा फुटकळ लेखांचा संग्रह.**

प्रकाशित झाली, हा भाग वेगळा.

'टीकास्वयंवर' मध्ये नोंदविल्याप्रमाणे ''निरस्तपादपे देशे : श्री.के. क्षीरसागर यांचा वादसंवाद'' हे पहिले परीक्षण 'रहस्यरंजन'च्या ऑक्टोबर १९६१ च्या अंकात प्रसिद्ध झाले. म्हणजे त्यांच्या समीक्षासदृश्य लेखनाचा प्रारंभ १९६१ मध्ये झालेला आहे. असे असले तरी पुढे १९६८ साली 'हल्ली लेखकाचा लेखकराव होतो, तो का?' हा लेख लिहिला. पुढे वर्षाला एक किंवा दोन लेख त्यांनी लिहिलेले आहेत. जातीसंबंधीचा उल्लेख असलेला 'देशीवादा'वरील त्यांचा लेख 'न्यू क्वेस्ट'ने 'नेटिविजम' वर स्वतंत्र अंक काढला होता. कारण 'नेटिविजम'ची जगभर चर्चा चालू होती. तेव्हा भारतीयांचा देशीवाद कोणता तो भालचंद्र नेमाडे यांनी तेथे सांगितला. याच लेखाचा अनुवाद 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'च्या १९८८ मधील एका अंकात प्रसिद्ध झाला. येथून पुढे त्यांची आणि 'देशीवादा'ची खरी घोडदौड सुरू झाली. म्हणजे त्यांनी विधाने करायची आणि त्यांच्या अनुयायांनी टाळ्या वाजवायच्या आणि इतरांनी मात्र चकित होऊन पाहात राहावयाचे, असा सिलसिला सुरू झाला.

१९८४ मध्ये मूळ इंग्रजीत लिहिलेल्या आणि १९८८ साली मराठीमध्ये अनुवादिलेल्या देशीवादावरील लेखात प्रथमच एक विधान येते. ते वरकरणी निरुपद्रवी वाटत असले तरी ते भरपूर दिशाभूल करणारे आणि उपद्रवमूल्य असणारे असे आहे. फक्त त्याकडे समीक्षेला मारक असणाऱ्या गूढ भाषेमुळे लक्ष जात नाही. ते विधान पुढीलप्रमाणे आहे –

''हिंदुस्थानच्या इतिहासात आणि भूगोलात कोणत्याही माणसाला ह्या वांशिक आणि प्रादेशिक अशा दोन आडव्या-उभ्या अक्षांवर जागा सापडली की, तो मानाने आपले अस्तित्व टिकवू शकतो. अमूक माणूस कोणत्या जातीत जन्मला आणि तो कुठल्या प्रदेशातला आहे, या दोन गोष्टींवाचून कुठल्याही भारतीय माणसाची ओळख पटणे अशक्य आहे. या दोन्ही व्यवस्थांच्या परस्पर छेदांनी अधिक सूक्ष्मतर अशा अनेक उपव्यवस्थांचे विस्तीर्ण बहुरंगी पट हिंदुस्थानात आढळून येतात; परंतु या उपखंडात कोणालाही जाती आणि देश ह्या दोन स्थूल आयामांशिवाय स्थिर अस्तित्व प्राप्त होत नाही...'' (टीकास्वयंवर, पृ.८१)

या विधानात वंश आणि प्रदेश अशा दोन संज्ञा येतात. निग्रो, चिनी किंवा गोरे हे जसे चटकन ओळखू येणारे वंश, अहित, तसे वंश भारतात आहेत का हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. भारतातील कुठल्याही माणसाचा वंश सांगता येत नाही. कारण हजारो वर्षे येथे आक्रमणे होत आली, वंशसंकर घडत आले. त्यामुळे भारतामध्ये वंशाच्या आधारावर बोलणे शक्यच नाही. मानववंशशास्त्रज्ञांचा निर्वाळाही असाच आहे; परंतु मोठमोठे शब्द वापरून धाक बसविणे ही भालचंद्र नेमाडे यांची 'रीत' आहे. त्या रितीप्रमाणे त्यांनी शब्द तर वापरला; परंतु वंश तर दाखवता येत नाही अशा अडचणीमध्ये ते सापडले. त्यामुळे पुढे त्यांनी कोठेही वंश हा शब्द वापरला नाही. एकदम ते जातीवर आले आणि त्याला ते इतके चिकटून राहिले की, जग खूप बदलले, भारतही खूप बदलला याचे त्यांना भानच राहिले नाही. एक मात्र खरे जातीच्या मुद्यांशी ते एकनिष्ठ राहिले, एवढेच नाही तर विंचू जसा चढत जातो, तशी त्यांना पुढे पुढे जात चढत गेली, असेही लक्षात येते. शेवटी शेवटी तर 'जाती बुडाल्या तर देश बुडेल' असे म्हणू लागले आहेत. निष्ठा असावी तर अशी!

तर एकूण काय की, ते वंशाकडून जातीकडे वळले आहेत. दुसरी संज्ञा प्रदेश अशी आहे. जातीप्रमाणेच प्रदेशामुळेही भारतीय माणसाला प्रतिष्ठा प्राप्त होते, असेही त्यांनी म्हटले आहे. अर्थात, फार प्राचीन काळापासून जगभर स्थलांतरे होत आली आहेत. भारतातही स्थलांतरे झाली. भारताच्या विविध भागांत मराठी माणूस जसा पसरला आहे, त्याप्रमाणेच भारताच्या विविध भागातील माणसे महाराष्ट्रात पिढ्यान्‌पिढ्यांपासून स्थिरावली आहेत. ही स्थलांतरे मुख्यतः उपजीविकेसाठी होतात. काही युद्धांमुळेही होतात. तरीही ती ती माणसे त्या त्या प्रदेशाची म्हणून ओळखावयास हरकत नसावी; परंतु काही आदिवासी जमातींचा पोशाख राजस्थानी पोशाखाशी साम्य असणारा असतो. काही भाषांमध्ये गुजराती, आसामी, तेलुगू या भाषांमधले शब्द सापडतात. विविध मानवसमूहांचे विधी वेगळे असतात. अर्थात, या असल्या तपशिलाशी भालचंद्र नेमाडे यांचे काही देणेघेणे नाही. ते प्रदेश हा एक महत्त्वाचा घटक मानतात, एवढेच. म्हणजे


देशीवादामध्ये प्रदेश आणि जात या दोन्ही गोष्टी त्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

उपरोक्त परिच्छेदातील आणखी एका शब्दाकडे बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे. तो शब्द म्हणजे हिंदुस्थान. खरे म्हणजे आपल्या देशाचे 'भारत' हे नाव हजारो वर्षापासून प्रचलित आहे. पण ते त्यांना मुळीच भारदस्त वाटत नाही. त्यामुळे भारतीय राज्यघटनेत बदल करून 'हिंदुस्थान' या नावाचा स्वीकार केला पाहिजे, असेही त्यांना वाटते. तसे त्यांनी जाहीरपणे सांगितले आहे. आता हिंदुस्थान का तर ते भारतापेक्षा भारदस्त वाटते, म्हणजे त्यांना वाटते. आमच्यासारख्यांना 'भारत' हेच नाव अधिक भारदस्त आणि सुंदर वाटते. हा भाग वेगळा; परंतु त्यांच्या अंतर्मनात हिंदूंचा तो हिंदुस्थान असेच आहे. कारण 'हिंदू' असण्याचा ते अनेक वेळा उल्लेख करतात. एका मुलाखतीत त्यांनी त्यांचे 'भव्य' स्वप्न सांगितले आहे. ते म्हणतात, ''...भारतीयांना जगात स्वतःची केवळ हिंदू म्हणून ओळख पटणं आवश्यक आहे.'' (टीकास्वयंवर, चंद्रकात पाटील यांनी घेतलेली मुलाखत, पृ.२७७) इतरत्रही अशी अनेक विधाने सापडतील. म्हणजे त्यांच्या देशीवादामध्ये जात, प्रदेश आणि हिंदू व हिंदुस्थान या गोष्टींना महत्त्व आहे. याशिवाय 'भूमी' हा घटकही त्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. किंबहुना देशीवादातील हा एक केंद्रवर्ती मुद्दा आहे. त्यांच्या या साऱ्या विवेचनाला एक प्रेषिताचा थाट आहे. एकदा प्रेषिताने एखादा शब्द उच्चारला, की त्यांचे भक्त तो शब्द दूरपर्यंत पोचविण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेत असतात व एकसुराने अगर वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन तारस्वरात मांडत असतात. मग सर्वत्र अवकाशात एकच शब्द घुमत राहतो, तो 'भूमितत्त्व', 'भूमितत्त्व'!

तर मुख्य मुद्दा भूमी हा आहे. या भूमितत्त्वाची मांडणी नेमाडे कशी करतात पाहा - ''अशा ऊर्ध्वरचनेची सवय जडलेल्या वृत्तीला आता असे पटवून देण्याची गरज आहे की, बाबा रे, माणसाला किंवा साहित्याला आपापल्या भूमीवरच, आपापल्या भाषिक समूहात डौलाने उभे राहाता येते. त्याला परदेशी किंवा आंतरराष्ट्रीय आयाम असण्याची खरोखरच गरज नाही.'' (टीकास्वयंवर, पृ.७९)

''देशी याचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे असा प्राय : अर्थ असतो,'' (टीकास्वयंवर, पृ.८०)

''अशा भूमिसातत्यावरील अनेक युगांचा इतिहास विलक्षण वेगवेगळ्या पद्धतीने आजपर्यंत घडत आल्याने येथील पुरातन काळापासूनच्या आंतर्वर्ती घडामोडींचे स्फटिकीकरण एखाद्या छोट्याशा पुराणकथेत किंवा लोककथेतसुद्धा झालेले आढळेल. भारतीय मनात जुन्यानव्या घडामोडींचे सत्त्व अशाच स्थळकाळांनी निश्चित केलेल्या भूमिप्रधान देशी परंपरांनी तयार होते... वायव्येकडील पठाणांचा पोशाख जसा त्या भूमीचा सांस्कृतिक आविष्कार आहे... सारांश विविधतेत एकता असणे देशीपणाच्या ह्या अनंत आविष्कारांच्या मुळाशी असलेले परस्परावलंबी भूमितत्त्व होय... अंधारकोठड्या ही शिक्षेची रूपे माणसाला




त्याच्या प्रिय भूमितत्त्वापासून वंचित करण्याची क्रूर साधने होत.'' (टीकास्वयंवर, पृ.८२)

अशी आणखीही काही अवतरणे देता येतील. पण त्यांची काही आवश्यकता नाही. म्हणजे देशीवादातील यापूर्वी जे महत्त्वाचे घटक त्यांनी निर्देशिले आहेत, त्यात आणखी एका घटकाची भर पडली आहे; परंतु या संपूर्ण देशीवादी प्रकरणाला आणखी एक बाजू असल्याचे त्यांनी निर्देशिले आहे. ती बाजू म्हणजे वसाहतवादातून मुक्त होण्यासाठी आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन फेकून दिला पाहिजे, असे त्यांना वाटते. खरे म्हणजे, स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली. जगात आणि आपल्या देशातही आमूलाग्र बदल झाले. तरीही वसाहतवादातून मुक्ती मिळालीच नाही म्हणा की! आणि जर ती मिळाली नसेलच तर त्याला काय कारणे आहेत, हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. पण त्यांची सामाजशास्त्रीय चर्चा करण्याची गरज भालचंद्र नेमाडे यांना वाटत नाही. ते आपले आंतरराष्ट्रीय असणे किती धोकादायक आहे, हे सांगत राहतात.

या आंतरराष्ट्रीयतेसंबंधी चर्चा करण्यापूर्वी काही ऐतिहासिक सत्ये समजून घ्यावी लागतात. साधारणतः सातव्या शतकापासून या देशावर परकीयांची आक्रमणे होत आली आणि भारतीय लोक क्रमाने पराभूत होत गेले. ही पराभवाची मालिका इंग्रजांनी येथे एकछत्री अंमल बसविला तेव्हा संपली. म्हणजे आपण गुलाम झालो. १५ ऑगस्ट १९४७ ला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आणि आपल्या देशाचा एक आगळावेगळा इतिहास सुरू झाला. १३०० वर्षांची गुलामी संपली. स्वातंत्र्यानंतर इंग्रज परत इंग्लंडला गेले. पाकिस्तानची निर्मिती झाली. तरीही भारतात काही मुस्लिम राहिले. येथे एक धर्मनिरपेक्ष राजवट सुरू झाली. ●●●




# लोकशाहीच्या उत्सवात राजकी

प्रकाश खंडेलोटे

स्वातंत्र्यानंतर जवळपास साडेतीन वर्षांनी पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. २५ ऑक्टोबर १९५१ ते २१ फेब्रुवारी १९५२ दरम्यान २६ राज्यांतील ४८९ जागांसाठी तब्बल ६८ टप्प्यांमध्ये ही निवडणूक झाली. काँग्रेसचा प्रभाव आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाला आव्हान देणारे कोणी नसल्यामुळे ३६४ जागा पटकावून काँग्रेसने या पहिल्याच निवडणुकीत घवघवीत यश मिळविले. फुलपूर लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान झाले. लोकशाही मार्गाने निवडून येणारे ते पहिले पंतप्रधान होते.

या निवडणुकीत ५३ राजकीय पक्ष आणि ५३३ अपक्ष मिळून १,८७४ उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी २२ पक्ष आणि ३७ अपक्षांनी लोकसभेत प्रवेश केला. या निवडणुकीत १७ कोटी ३२ लाख मतदारांपैकी ४४.८७ टक्के मतदारांनी मतदान केले. काही राज्यांत २५ टक्के तर काही राज्यांत ६० टक्क्यांपर्यंत मतदान झाले होते. ४८९ जागांसाठी काँग्रेसने सर्वाधिक ४७९ उमेदवार उभे केले होते. 'लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि विकास' हा नारा देत ४४.९९ टक्के मतांसह ३६४ जागा मिळवून काँग्रेस पक्ष सत्तास्थानी आला. ३.२९ टक्के मतांसह १६ जागा मिळवून भाकप दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तिसऱ्या क्रमांकावरील समाजवादी पक्षाला १२ जागा मिळाल्या होत्या. या पक्षाने एकूण १०.५९ टक्के मते मिळवली होती. ९४ उमेदवार उभे केलेल्या भारतीय जनसंघाला पश्चिम बंगालमधून २ आणि राजस्थानातून १ अशा केवळ ३ जागा जिंकता आल्या. किसान मजदूर प्रजा पार्टी ९, पीपल्स डेमॉक्रॅटिक फ्रंट ७, गणतंत्र परिषद ६, अखिल भारतीय हिंदू महासभा ४, शिरोमणी अकाली दल ४ आणि तामिळनाडू टॉयलर्स पार्टी ४ अशी अन्य पक्षांची कामगिरी राहिली. ३७ जागांवर अपक्ष निवडून आले होते. १० टक्के जागा जिंकून विरोधी पक्षाचे स्थान पटकावण्यासाठी कोणत्याही पक्षाला ४८ जागा मिळाल्या नव्हत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या परिश्रमाने लिहिलेल्या राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्याच्या जवळपास वर्षभरानंतरच पार पडलेल्या या निवडणुकीत डॉ. बाबासाहेबांच्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचेही उमेदवार उभे होते. त्यातील केवळ दोघे निवडून आले. डॉ. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीत दिलेले योगदान अमूल्य आहे. तरीही त्यांचे हे योगदान विसरून उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातल्या मतदारांनी त्यांना पराभूत केले आणि त्यांचे एकेकाळचे स्वीय सहाय्यक नारायण काजरोळकर यांना लोकसभेत पाठवले. (त्यानंतर १९५२ मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीत निवडून येऊन डॉ. बाबासाहेब संसदेत गेले.) १९४७ मध्ये सत्ता हस्तांतराच्या काळात काँग्रेसचे अध्यक्ष राहिलेले, फैजाबाद लोकसभा मतदारसंघातील किसान मजदूर प्रजा पार्टीचे उमेदवार जीवतराम भगवानदास ऊर्फ आचार्य कृपलानी यांचाही या निवडणुकीत पराभव झाला. त्यांच्या पत्नी सुचिता कृपलानी मात्र काँग्रेसच्या मनमोहिनी सहगल यांना हरवून दिल्लीतून निवडून आल्या होत्या.

दुसरी सार्वत्रिक निवडणूक १९५७ मध्ये झाली. राज्यांची पुनर्रचना होऊन केवळ १३ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेश बनले होते.




# कीय पक्षांचा लक्षणीय सहभाग

राखीव जागांचे धोरण ठरत नसल्याने ४०३ लोकसभा मतदासंघांतून ४९४ सदस्य निवडण्यात आले होते. ३१२ मतदारसंघांतून प्रत्येकी १ तर १८२ मतदारसंघातून खुल्या प्रवर्गाबरोबरच अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या सदस्याचीही निवड करण्यात आली. या निवडणुकीत यशस्वी होणाऱ्या राजकीय पक्षांचं प्रमाण १३ पर्यंत घसरलं होतं. या निवडणुकीतही पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसनेच बाजी मारली होती. तथापि, संयुक्त महाराष्ट्राचा काँग्रेसला फटका बसला होता. मुंबईसह कोकणातील निम्म्या जागांवर काँग्रेस हरली होती. पश्चिम महाराष्ट्रात बारामती आणि सोलापूर वगळता सर्वत्र काँग्रेसचा पराभव झाला. नाथ पै, श्रीपाद अमृत डांगे, शामराव परुळेकर, क्रांतीसिंह नाना पाटील, नानासाहेब गोरे आदी दिग्गज नेते निवडून आले होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या रेट्याने काँग्रेसची पश्चिम महाराष्ट्रात वाताहत झाली. मात्र महाराष्ट्रात सामील झालेल्या मराठवाडा व विदर्भात काँग्रेसला घवघवीत यश मिळाले. महाराष्ट्रात प्रांतरचनेचा फटका बसलेल्या काँग्रेसने देशभरात मात्र चांगली कामगिरी केली होती. पंडित जवाहरलाल नेहरू फुलपूरमधून, लाल बहादूर शास्त्री अलाहाबादमधून तर फिरोज गांधी अमेठीतून निवडून आले होते. काँग्रेसने ४७.७८ टक्के मतांसह ३७१ जागा मिळवल्या होत्या. २७ जागा मिळवून भाकप दुसऱ्या क्रमांकावर राहिला. प्रजा सोशालिस्ट पार्टीला तिसऱ्या क्रमांकाच्या १९ जागा मिळाल्या. या निवडणुकीत डॉ. बाबासाहेबांच्या शेड्यूल्ड कास्ट् फेडरेशनने १.६९ टक्के मतांसह ६ जागा हस्तगत केल्या तर भारतीय शेतकरी कामगार पक्षाने ४ जागांवर विजय मिळवला होता. १३० उमेदवार उभे केलेल्या जनसंघाला केवळ ४ जागांवर विजय मिळाला. त्यामध्ये बलरामपूरमधून निवडून आलेल्या अटल बिहारी वाजपेयी यांचा समावेश होता. या निवडणुकीत ४१ अपक्ष निवडून आले.

दुसऱ्यांदा लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यानंतर तिसऱ्या निवडणुकीच्या वेळी ४९४ मतदारसंघ तयार झाले आणि राखीव जागा स्वतंत्रपणे दिल्या गेल्या. ४९४ पैकी अनुसूचित जातींसाठी ७९ तर अनुसूचित जमातींसाठी ३० अशा १०९ जागा राखीव ठेवल्या गेल्या. यामुळे प्रथमच एका मतदारसंघातून १ उमेदवार निवडला गेला. मागील दोन निवडणुकांच्या तुलनेत काँग्रेसच्या जागांमध्ये किंचित घट होऊन त्यांना ४४.७२ टक्के मतांसह ३६१ जागा मिळाल्या होत्या. भाकप २९ जागा मिळवून दुसऱ्या क्रमांकावर राहिला तर स्वतंत्र पार्टीने १८ जागा मिळवून तिसरा क्रमांक पटकावला. १४ जागांवर भारतीय जनसंघाचे उमेदवार निवडून आले. प्रजा सोशालिस्ट पार्टी १२, द्रविड मुन्नेत्र कळगम ७ आणि सोशालिस्ट पार्टी ६ जागांवर निवडून आली. ११.०५ टक्के मतांसह २० ठिकाणी अपक्षांनी बाजी मारली होती. सत्तरी पार केलेले पंडित जवाहरलाल नेहरू सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. त्यानंतर साधारणतः दोन वर्षांनी २७ मे १९६४ रोजी नेहरूंचे निधन झाल्यानंतर पंतप्रधानपद लाल बहादूर शास्त्री यांच्याकडे गेले. १९५९ ते ६० दरम्यान काँग्रेस अध्यक्ष राहिलेल्या इंदिरा गांधींचा शास्त्री मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी देशाची घडी बसविण्याचा प्रयत्न चालविला असतानाच पाकिस्तानने युद्ध छेडले. एप्रिल ते २३ सप्टेंबर १९६५ पर्यंत चाललेल्या या युद्धात पाकिस्तानचा पराभव झाला. मात्र

या युद्धानंतर पुढाकार घेऊन रशियाने ताश्कंद येथे उभय देशांमध्ये समझौता घडवून आणण्यासाठी ११ जानेवारी १९६६ रोजी शिखर परिषद घेतली. त्याच रात्री पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचे ताश्कंदमध्ये निधन झाले. पुढे कार्यकारी समितीच्या पाठिंब्याने काँग्रेस कार्यकारी समितीचे मत जिंकून इंदिरा गांधी १९ जानेवारी १९६६ रोजी देशाच्या पाचव्या आणि पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या.

१९६७ मध्ये झालेल्या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीत लोकसभेच्या जागा ५२० पर्यंत वाढल्या होत्या. प्रत्येक मतदारसंघातून फक्त एक उमेदवार निवडून द्यायचा होता. ही निवडणूक काँग्रेसने इंदिरा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली लढली आणि जिंकलीही. ५४ टक्क्यांपेक्षा अधिक जागा मिळवून काँग्रेस सलग चौथ्या टर्मसाठी केंद्रात सत्तेत आली. इंदिरा गांधी पंतप्रधान बनल्या. तथापि, काँग्रेसला या निवडणुकीत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्त्वाखाली लढलेल्या मागील तीन निवडणुकांच्या तुलनेत कमी जागा मिळाल्या होत्या. या निवडणुकीतही अन्य कोणत्याही पक्षाने ५० चा आकडा गाठलेला नव्हता. स्वतंत्र पार्टी ४४ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर तर भारतीय जनसंघ ३५ जागांसह तिसऱ्या स्थानावर होता. द्रविड मुन्नेत्र कळगमला २५ जागा मिळाल्या होत्या. १३.७८ टक्के मतांसह ३५ ठिकाणी अपक्ष निवडून आले होते. काँग्रेसने सत्ता मिळवली असली तरी नेहरूंच्या निधनानंतर १९६४ मध्ये पक्षाच्या नेतेपदावरून इंदिरा गांधी आणि उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्यात उद्‌भवलेल्या तीव्र मतभेदांचा फटका या निवडणुकीत काँग्रेसला बसला. त्यातही सात राज्यांमध्ये पक्षाची मोठी पीछेहाट झाली. गुजरातमध्ये पक्षाला २४ पैकी फक्त ११ जागा मिळाल्या तर स्वतंत्र पार्टीने १२ जागा हस्तगत केल्या. मद्रासमध्ये काँग्रेसने ३९ पैकी ३ तर द्रमुकने २५ जागांवर बाजी मारली. ओरिसामध्ये वीसपैकी काँग्रेसने ६ तर स्वतंत्र पार्टीने ८ जागा मिळवल्या. राजस्थानात २० पैकी १० जागा काँग्रेसच्या पारड्यात पडल्या. स्वतंत्र पार्टीने ८ जागा खिशात घातल्या. पश्चिम बंगालमधील ४० जागांपैकी केवळ १४ जागांवर काँग्रेसचे उमेदवार निवडून आले. केरळमध्ये तर १९ पैकी केवळ १ जागा काँग्रेसला मिळाली. दिल्लीत ७ पैकी १ काँग्रेसला तर उर्वरित ६ ठिकाणी भारतीय जनसंघाने बाजी मारली. काँग्रेसच्या समर्थनात घट झाल्याचे प्रतिबिंब सहा विधानसभा निवडणुकांमध्ये पडून या राज्यांमधील पक्षाची सरकारे गेली. यामुळे इंदिरा गांधी आक्रमक झाल्या आणि अनेक महत्त्वाचे निर्णय त्या एकट्याच घेऊ लागल्या. त्यामुळे त्या वेगळ्या पडल्या. याचा परिणाम पक्षात फूट पडण्यात झाला.

१९७१ मध्ये पाचव्या निवडणुकीच्या वेळी लोकसभेच्या जागा दोनने घटून ५१८ झाल्या होत्या. काँग्रेसने ४४१ जागा लढवून ३५२ जागा जिंकल्या होत्या. त्यावेळी गाय-वासरू हे काँग्रेसचं निवडणूक चिन्हं होतं. त्यामुळे 'गाय-वासरू नका विसरू' ही त्यांची घोषणा होती. 'गरिबी हटाव'चा नारा देत काँग्रेसने ही निवडणूक जिंकली. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या.

**आणीबाणी लादल्याचा फटका** : पाचव्या लोकसभा निवडणुकीत मूळ काँग्रेसमधून फुटून बाहेर पडलेल्या काँग्रेस (ओ) ने २३८ जागा लढवल्या; परंतु त्यांना केवळ १६ ठिकाणी यश मिळाले. या पक्षाचे नेते मोरारजी देसाई सुरतमधून विजयी झाले. १५७ उमेदवार उभे केलेल्या जनसंघाला केवळ २२ जागा मिळाल्या. वाजपेयी ग्वाल्हेरमधून निवडून आले. इंदिरा गांधी काँग्रेसला पराभूत करण्यासाठी काँग्रेस (ओ) ने जनसंघासह चार पक्षांची मोट बांधून ही निवडणूक लढवली; परंतु आघाडीला त्यांच्या पूर्वीच्याच जागा राखता आल्या नाहीत. दरम्यान, इंदिरा गांधींनी १९७१ च्या निवडणुकीत रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवताना गैरप्रकार केल्याच्या प्रकरणात १२ जून १९७५ रोजी निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा गांधींचे लोकप्रतिनिधी म्हणून सर्व अधिकार रद्द केले. यामुळे विरोधकांनी थेट सरकारविरूद्ध बंडाचा पवित्रा घेतला. या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधींनी २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू केली. याचा फटका काँग्रेसला १९७७ च्या निवडणुकीत बसला. मतदारसंघाच्या पुनर्रचनेमुळे या निवडणुकीत लोकसभेच्या जागा ५४२ झाल्या होत्या. जनता पक्ष आघाडीने २९१ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले होते. त्यामुळे मोरारजी देसाई यांच्या नेतृत्त्वाखाली पहिले काँग्रेसेत्तर जनता आघाडीचे सरकार सत्तेत आले. काँग्रेसला ५४.५२ टक्के मतांसह १५४ जागा मिळाल्या होत्या. माकप २२, द्रमुक १८ तर रिपाइंच्या खोब्रागडे गटाने २ जागा मिळवल्या होत्या.

**मजबूत सरकारसाठी पुन्हा काँग्रेसला कौल** : दरम्यान, जनता आघाडीच्या सरकारला अंतर्गत बेबनावामुळे आपला कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. त्यामुळे मुदतीपूर्वीच म्हणजे जानेवारी १९८० मध्ये सातव्या लोकसभेच्या निवडणुका लागल्या. जनता आघाडीचे सरकार अल्पकाळ टिकल्याच्या पार्श्वभूमीवर देशाला मजबूत सरकारची गरज असल्याचा मुद्दा इंदिरा गांधींनी निवडणूक प्रचारात मतदारांना पटवून दिला. यामुळे या निवडणुकीत ४२.६९ टक्के मतांसह ३५३ जागा मिळवून काँग्रेस पुन्हा सत्तेवर आली. जनता आघाडीचा तर अक्षरशः धुव्वा उडाला. या आघाडीने केवळ ३१ जागा जिंकल्या. धर्मनिरपेक्ष जनता दलाने ४१, माकप ३७ तर अपक्षांनी ९ ठिकाणी बाजी मारली होती.

**सहानुभूतीच्या लाटेचा काँग्रेसला फायदा** : १९८० मध्ये पुन्हा पंतप्रधानपदी आल्यानंतर इंदिरा गांधी यांनी देशांतर्गत सुरक्षेचा विचार करताना पंजाबमधील दहशतवादाविरूद्ध आक्रमक भूमिका घेतली होती. त्यातूनच अमृतसरच्या सुवर्णमंदिरातून अतिरेक्यांना बाहेर काढण्यासाठी त्यांनी मंदिरात सैन्य घुसवले होते. त्याची शिक्षा म्हणून त्यांना बलिदान द्यावे लागले. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्या अंगरक्षकांनी गोळ्या झाडून हत्या केली. त्यानंतर डिसेंबर १९८४ मध्ये ८ व्या लोकसभेसाठी निवडणुका झाल्या. या निवडणुकीत सहानुभूतीच्या लाटेचा फायदा काँग्रेसला झाला. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली या पक्षाला विक्रमी ४२६ जागा मिळाल्या. संजय गांधी यांच्या अपघाती निधनानंतर आईच्या (इंदिरा गांधींच्या) मदतीसाठी म्हणून राजकारणात आलेल्या राजीव गांधी यांची पंतप्रधानपदी

निवड झाली. ते २ डिसेंबर १९८९ पर्यंत या पदावर होते. १९८९ मध्ये नवव्या लोकसभेसाठी मतदान झाले. बोफोर्स प्रकरणातून काँग्रेसमधून बाहेर पडलेले विश्वनाथ प्रताप सिंग यांनी तेलुगू देसम, द्रविड मुन्नेत्र कळगम आणि आसाम गणपरिषद यांना सोबत घेऊन राष्ट्रीय आघाडी स्थापन केली आणि ही निवडणूक लढवली. या निवडणुकीत सर्वाधिक १९७ जागा काँग्रेसला मिळालेल्या असल्या तरी बहुमताचा आकडा गाठता न आल्याने या पक्षाला सरकार स्थापन करता आले नाही. त्यामुळे ८५ जागा मिळवलेला भारतीय जनता पक्ष आणि ३३ जागा पटकावलेल्या डावी आघाडीप्रणित भाकप (मा) च्या बाहेरून दिलेल्या पाठिंब्यावर १४३ सदस्य असलेल्या राष्ट्रीय आघाडीचे व्ही.पी.सिंग पंतप्रधान झाले; परंतु बिहारचे मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्या सरकारसह सिंग यांनी, अयोध्येत बाबरी मशीदस्थळी जाणारी रामरथयात्रा अडवून अडवाणींना २३ ऑक्टोबर १९९० रोजी अटक केल्यानंतर भाजपने व्ही.पी.सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. परिणामी, ७ नोव्हेंबर १९९० रोजी सिंग सरकार संसदेत विश्वासदर्शक ठराव हरले. त्यानंतर काँग्रेसच्या पाठिंब्यावर पंतप्रधान बनलेले चंद्रशेखर सरकारही जास्त काळ टिकू शकले नाही. त्यामुळे मे-जून १९९१ मध्ये दहाव्या लोकसभेसाठी निवडणुका झाल्या. या निवडणुकीत काँग्रेसला २५२ जागा मिळाल्या. तर भाजपने १२१ जागी यश मिळवले. जनता दलाला केवळ ६३ जागा मिळाल्या. त्याखालोखाल ३६ जागा पटकावून माकप चौथ्या स्थानावर राहिला. सर्वाधिक जागा मिळवलेल्या काँग्रेस पक्षाचे पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान झाले.

१९९६ मध्ये अकराव्या लोकसभेसाठी निवडणूक झाली. या निवडणुकीत भाजप, समता पार्टी, शिवसेना आणि हरियाणा विकास पार्टी यांचा समावेश असलेली भाजप आघाडी तसेच भाकप, माकप, रिव्होल्यूशनरी सोशालिस्ट पार्टी आणि ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक यांची डावी आघाडी, काँग्रेस आणि इतर छोट्या-मोठ्या पक्षांनी ही निवडणूक लढवली. त्यात भाजप आघाडी २०३, काँग्रेस १४०, तिसरी आघाडी ७९ आणि डाव्या आघाडीला ५२ जागा मिळाल्या. बहुमतासाठी छोट्या पक्षांसोबत प्रादेशिक स्तरावर व्यापक आघाडी बनविण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय पक्षांचे प्रयत्न अकराव्या लोकसभेपासून सुरू झाले. त्रिशंकू लोकसभेत सर्वाधिक जागा मिळवलेल्या भाजप आघाडीचे नेते अटल बिहारी वाजपेयी यांना राष्ट्रपती शंकर दयाल शर्मा यांनी सरकार स्थापनेसाठी आमंत्रित केले; परंतु संसदेत बहुमतासाठी सदस्यांचे समर्थन मिळू शकणार नसल्याचे लक्षात आल्यानंतर वाजपेयी यांनी विश्वासदर्शक ठरावाला तोंड देण्यापेक्षा राजीनामा देणे पसंत केले. वाजपेयी फक्त १३ दिवस पंतप्रधानपदी होते. त्यानंतर संयुक्त आघाडीच्या कडबोळ्यावर एच.डी. देवेगौडा आणि इंद्रकुमार गुजराल पंतप्रधान झाले. मात्र पाठिंबा देणाऱ्या पक्षांतील अंतर्गत संघर्षामुळे त्यांनाही कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. त्यामुळे ११ व्या लोकसभेने १५ मे १९९६ ते ४ डिसेंबर १९९७ या काळात तीन पंतप्रधान दिले. आघाडीच्या राजकारणामुळे १ वर्ष सहा महिने आणि २० दिवसानंतर लगेचच १२ व्या लोकसभेच्या निवडणुका लागल्या. फेब्रुवारी-मार्च १९९८ मध्ये

## शिरोमणी अकाली दलाने लढवल्या सर्व सोळाही निवडणुका

१४ डिसेंबर १९२० रोजी स्थापन झालेल्या शिरोमणी अकाली दलाने सर्व सोळाही निवडणुका लढवल्या. सहा वेळा घवघवीत तर दहा वेळा किरकोळ यश मिळाले. पक्षाने १३ व्या लोकसभा निवडणुकीत १० जागा मिळवल्या. आणीबाणीनंतर झालेल्या १९७७ च्या निवडणुकीत ९ जागांवर पक्षाने बाजी मारली होती. ११ व्या, १२ व्या आणि १४ व्या लोकसभेत पक्षाचे प्रत्येकी आठ सदस्य होते.

निवडणुका झाल्या. काँग्रसला १४१ जागा मिळाल्या. १८२ जागा मिळवलेल्या भाजपचे नेते अटलबिहारी वाजपेयी अण्णाद्रमुकच्या पाठिंब्याने सोळावे पंतप्रधान बनले; परंतु भ्रष्टाचाराचे खटले मागे घेण्याची अण्णाद्रमुकच्या सर्वेसर्वा जयललिता यांची मागणी सरकारने नाकारल्यामुळे अण्णाद्रमुकने समर्थन मागे घेतले. त्यामुळे वाजपेयींना राजीनामा द्यावा लागला. संयुक्त पुरोगामी आघाडीने सरकार स्थापण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे राष्ट्रपतींनी लोकसभा बरखास्त केली.

५ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर १९९९ दरम्यान १३ व्या लोकसभेसाठी मतदान झाले. यावेळी प्रथमच भाजपप्रणित संयुक्त आघाडीने बहुमत मिळवून वाजपेयी पुन्हा पंतप्रधान बनले. दरम्यान, वाजपेयी सरकारचा कार्यकाळ पूर्ण होण्याच्या पाच महिने अगोदरच चार राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने चांगली कामगिरी केली होती. याचा लाभ उठवता येईल या अपेक्षेने वाजपेयींनी १३ वी लोकसभा मुदतीपूर्वीच बरखास्त करण्याची शिफारस राष्ट्रपतींकडे केली. त्यानंतर एप्रिल ते मे २००४ दरम्यान १४ व्या लोकसभेसाठी मतदान झाले. यावेळी मात्र काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीने बहुमत मिळवले. सोनिया गांधी पंतप्रधान व्हाव्यात ही काँग्रेसजणांची भावना असली तरी सोनियांनी मात्र मनमोहन सिंगांना पदावर बसवले.

मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतर एप्रिल-मे २००९ मध्ये पंधराव्या लोकसभेची निवडणूक झाली. यात काँग्रेसच्या २०६ जागांसह यूपीएने २४७ जागा पटकावल्या. भाजपप्रणित एनडीएला १३८, तिसऱ्या आघाडीला ७५, समाजवादी पक्ष व राष्ट्रीय जनता दलाच्या चौथ्या आघाडीला केवळ २६ जागांवर समाधान मानावे लागले. मनमोहन सिंग दुसऱ्यांदा पंतप्रधान बनले. पूर्ण पाच वर्षांची मुदत संपवून १९६२ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू पुन्हा पंतप्रधान बनल्यानंतर प्रथमच अशा पद्धतीने मनमोहन सिंग दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले. २०१४ ची सोळावी लोकसभा निवडणूक मोदी फॅक्टरमुळे एकतर्फी झाली. या निवडणुकीत काँग्रेसला पन्नासचाही आकडा गाठता आला नाही. महाराष्ट्रातील ४८ पैकी राष्ट्रवादीसोबतच्या आघाडीत या पक्षाला केवळ दोन जागा मिळाल्या होत्या. तामिळनाडून जयललिता यांच्या अण्णाद्रमुक पक्षाने ३९ पैकी तब्बल ३७ जागा मिळवून राज्यात आपलेच राज्य असल्याचे दाखवून दिले होते. ●●●

# पुढील अंकात

## सरकारी विठ्ठल विरूद्ध खासगी विठ्ठल



पंढरपूरच्या मूळ विठ्ठल मंदिरातील बडव्यांची सत्ता संपुष्टात आल्यानंतर आता खासगीत विठ्ठल मंदिर उभे करण्यात आले आहे. सरकारी विरूद्ध खासगी शाळा, सरकारी विरूद्ध खासगी एस.टी. तसं आता जुना विरूद्ध नवा, खासगी विरूद्ध सरकारी देव असं चित्र निर्माण झालं आहे.

■■■

## राखीव जागा विरोधकांना सुप्रीम कोर्टाचा पुन्हा दणका



राखीव जागांना सातत्याने विरोध करणाऱ्या वृत्तींना सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा दणका तर दिलाच शिवाय राखीव कोट्याचा नीट अर्थही सांगितला. राखीव जागा म्हणजे केवळ नोकऱ्या नव्हेत तर समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाकडे जाण्याची ती एक शिडी आहे. शिडीच काढून घेतल्यावर या मूल्यांपर्यंत पोहोचायचं कसं?

# देशभंजक नायक

मोदी आणखी पाच वर्षं राहिले तर जगातील सर्वात मोठी लोकशाही टिकू शकेल काय? अतिरिक्त लोकानुनयामुळे जे लोकशाही देश लयाला जातील त्यातील भारत हा पहिला देश असेल!

गुजरातचे मुख्यमंत्रीपद अनेक वर्षं भोगल्यानंतर २०१४ मध्ये हिंदू राष्ट्रवादी भारतीय जनता पक्षाचे नेते नरेंद्र मोदी लोकसभेचा प्रचंड बहुमताचा कौल मिळून निवडून आले. असे प्रचंड बहुमत गेल्या तीस वर्षांत कुणालाही मिळाले नव्हते. या काळात भारतावर मुख्यतः काँग्रेसचीच सत्ता होती. स्वातंत्र्यानंतरच्या ६७ पैकी ५४ वर्षांत जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी यांच्याच पक्षाची सत्ता होती. पुन्हा मोदी आणि भाजपच सत्ता गाजवणार की नाही याचा निर्णय देण्यासाठी भारत मतदान करतो आहे. साडेपाच आठवडे आणि सात टप्प्यांत पृथ्वीच्या पाठीवरील सर्वात मोठा मतदार असलेली ९० कोटी जनता कौल देणार आहे.

मतदान प्रक्रियेच्या या प्रचंड आवाक्याचे सखोल भान येण्यासाठी केवळ राजकारणच नव्हे, तर देशात खोलवर दडलेल्या सांस्कृतिक विग्रहांचीही माहिती असायला हवी. मोदींच्या कहाणीच्या अगदी सुरुवातीच्या अध्यायांकडे आपण लक्षपूर्वक पाहिले तरच आपल्याला मोदी अपरिहार्य का ठरले तेही कळेल, आणि आता आपत्ती का ठरले हेसुद्धा समजू शकेल.

या देशात जे घडते आहे त्यातून लोकानुनयाचा स्तर जसा दिसतो त्याचबरोबर कल्पनारम्य मिथ्थ्यकथा कशी घडत जाते हेही झर्रकन दिसून जाते. भारतातच नव्हे, तर टर्की, ब्राझील, ब्रिटन आणि अमेरिका या देशांतली लोकानुनयी राजकारणातून बहुसंख्यकांना नाहक असुरक्षिततेच्या भावनेने कसे घेरले जाते हे समजून घेणे गरजेचे आहे. याकडे दुर्लक्ष करणे कुणालाच परवडणारे नाही. या राजकारणाच्या खेळ्यांतून जे जग आकाराला येते आहे, ते ना न्याय्य आहे ना आकर्षक!

स्वांतत्र्यप्राप्तीनंतरच ही कहाणी सुरू होते. १९४७मध्ये ब्रिटिश अंमलाखालील भारताचे दोन तुकडे झाले. भारतीय मुसलमानांसाठी पाकिस्तानची भूमी आखून देण्यात आली. पण भारताचे नेतृत्व केंब्रिजमधून उच्च शिक्षण घेतलेल्या पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंकडे होते आणि भारत हिंदूंचा देश म्हणवला जाऊ नये असाच निर्णय त्यांनी घेतला. फाळणीनंतरही देशात भरपूर मुस्लिम जनता होती. (३ कोटी ५० लाख तेव्हा आणि आता जवळपास १७ कोटी मुसलमान आहेत.) नेहरूंनी त्यांच्या आदर्शवादानुसार या नवजात देशाला निधर्मी राष्ट्र म्हणून ओळख दिली. हा निधर्मवाद केवळ धर्म आणि राज्यव्यवस्था यांच्यातील फारकत म्हणूनच नव्हता, तर राज्यव्यवस्थेने सर्व धर्मांना सारखा दर्जा, सारखी वागणूक द्यावी ही अपेक्षा हे भारतीय निधर्मवादाचे वैशिष्ट्य होते. अनेक टीकाकारांच्या मते या अपेक्षेला ऑर्वेलियन संदर्भ लाभतो आणि काहीजण काहीजणांपेक्षा अधिक समान




**टाइम मॅगॅझिनच्या मुखपृष्ठावरील** 'DIVIDER IN CHIEF' **या शीर्षकाचा आतिश तासीर यांचा लेख मुग्धा कर्णिक यांनी 'द वायर मराठी' साठी अनुवादित केला आहे. यातील संपादित अंश द पीपल्स पोस्टच्या वाचकांसाठी... संपादक**

आहेत अशी सामाजिक रचना होऊ लागते. भारतीय मुसलमानांना शरियतवर आधारलेला कौटुंबिक कायदा लागू होतो – त्यामुळे पुरुषाला आपल्या पत्नीला तीन वेळा 'तलाक तलाक तलाक' म्हणून, जेमतेम मोबदला देऊन सोडता येते. मात्र हिंदू पुरुषांना सुधारित कुटुंब कायदा लागू होतो. त्यांची पूजास्थळे शासनाच्या ताब्यात जातात हा ही फरक होता.

(हा तथाकथित त्रिवार तोंडी तलाकचा प्रकार २०१८मध्ये कायद्याच्या कक्षेत आणून तो गुन्हा ठरेल यासाठी मोदींनी निर्णय घेतला.)

नेहरुंचे राजकीय वारस स्वातंत्र्यानंतरचा बहुतांश काळ देशाचे शासक होते. लोकशाही तत्वे आणि प्रथा पाळणे हे जरी वरवर दिसत असले तरीही हा एक संरजामी घराणेशाहीचाच भाग होता. भारतातील ही राजवट उच्चभ्रूशासित, आंग्लाळलेली, रस्त्यावरच्या लुंग्यासुंग्यांची भीती बाळगणारी होती. २०१४मध्ये ही भिंत पडली, दारे उघडली आणि भाजप, मोदींच्या नेतृत्वाखाली ५४३पैकी २८२ जागा निवडून लोकसभेत जिंकून आला. काँग्रेसला केवळ ४४ जागा मिळाल्या. देशातील हा सर्वात जुना पक्ष विरोधी पक्ष म्हणूनही प्रभावी काम करू शकला नाही.

**लोकानुनयी नेते दोन छटांचे असतात :** काही नेते टर्कीचा एर्डोगान किंवा ब्राझीलचा बोल्सोनारो यांच्याप्रमाणे त्यांच्या जनतेतूनच पुढे आलेले असतात, दुसऱ्या प्रकारातले लोकांशी थेट काहीही संबंध नसूनही, केवळ लोकांच्या लालसा, आकांक्षांचे भांडवल करून पुढे आलेले असतात. (अशा नेत्यांत शॅम्पेनप्रिय निओनाझी आहेत– ब्रेक्झिटवाले, डॉनल्ड ट्रम्प, पाकिस्तानचा इम्रानखान).

नरेंद्र मोदी निश्चितपणे लोकांतून पुढे आलेले आहेत. चहावाल्याचा मुलगा! त्यांची निवड म्हणजे एका परीने वर्गसंघर्षाचा विद्रोहच म्हणता आला असता. अमेरिकन इतिहासकार ॲन ॲपलबॉम म्हणतात 'लोकांमध्ये त्यांना माहीतही नसलेल्या, न पार करता येणाऱ्या दऱ्या असतात, पण त्यांना आपले एकमेकांत पटत नाही याची कल्पनाच नसते.' या प्रकारच्या अनभिज्ञतेचा

# स्वतःच्या अपयशाची शिक्षा जगाला देण्यासाठी तो दुराग्रही आणखी कायकाय करेल?

काँग्रेसच्या नेतृत्वाखाली एकत्र आलेले छोटे-छोटे पक्ष, आणि मोदींचा पराभव करण्यासाठी कोणताच नसलेला ठोस कार्यक्रम अशी विरोधकांची अवस्था आहे. मोदींना इतके दुबळे विरोधक लाभले हे त्यांचे सुदैवच म्हणायचे. तरीही मोदी संशयग्रस्त आहेत आपल्या विजयाबद्दल. कारण त्यांना पक्के माहीत आहे की २०१४ची आश्वासने त्यांनी पूर्ण केलेली नाहीत. म्हणून तर ते अंतर्गत शत्रूंच्या मुद्द्यावर सुटले आहेत. इतर लोकानुनयी नेत्यांप्रमाणेच तेही आपल्या व्हाइट हाऊसमध्ये बसून 'त्यांच्या' सल्तनतीवर हताश संतापातून ट्वीट करत रहातात आणि भारतीयांच्या मर्यादांचे जणू प्रतीकच असलेल्या या दुराग्रही व्यक्तीच्या हाती भारत दुसऱ्यांदा सत्ता द्यायला सज्ज झाला आहे. स्वतःच्या अपयशाची शिक्षा जगाला देण्यासाठी तो दुराग्रही आणखी कायकाय करेल या विचारानेच थरकाप होतो.

शोध लागण्याची ही निवड होती असे म्हणता येईल. या अगोदरही लोकांमध्ये राजकीय मतभेद होते, पण मोदींच्या निवडीमुळे लोकांमधील सांस्कृतिक दरी उघड झाली. पार न करता येणारी खोलखोल घळ! यात डावे किंवा उजवे हा प्रश्न फारसा उरला नाही. अतिशय मूलभूत तत्त्वांचा हा फरक होता असे उघड झाले.

देशाची अगदी प्राथमिक अशी परंपरा, भारतीय प्रजासत्ताक राज्याची वैशिष्ट्यपूर्ण घडण, देशाचे संस्थापक, अल्पसंख्यांकांचे स्थान, देशातील विद्यापीठांपासून, कॉर्पोरेट कंपन्यांपासून, माध्यमांपर्यंतच्या सर्व संस्था या सर्वांवरच अविश्वास दाखवण्याचे सत्र सुरू झाले. स्वतंत्र भारताची थोर मानचिन्हं समजल्या जाणाऱ्या निधर्मवाद, उदारमतवाद, मुक्त-निर्भय पत्रकारिता या सर्व गोष्टी म्हणजे देशातील हिंदूंविरुद्ध असलेले कारस्थान असल्याची चर्चा सुरू झाली. इस्लाम, इसाई या एकेश्वरी धर्मांच्या साथीला, या देशात न रुजलेल्या उच्चभ्रूंनी ही हिंदू बहुसंख्यांकांविरुद्ध कारस्थानं चालवली आहेत असा समज पसरवण्यात आला.

मोदींचा विजय हा या अविश्वासाचा परिपाक होता. त्यांनी नेहरूंसारख्या देशसंस्थापक व्यक्तीवर हल्ला चढवायला सुरुवात केली. देशापुढील पवित्र मानल्या गेलेल्या आदर्शवादी मूल्यव्यवस्थांवर, नेहरूप्रणित निधर्मीवाद, समाजवाद यावर हल्ला चढवला. त्यांनी काँग्रेसमुक्त भारताची भाषा सुरू केली, हिंदू मुस्लिमांमध्ये बंधुत्वाची भावना असण्याची गरज आपल्याला वाटत नसल्याचे त्यांनी अगदी स्पष्टच बोलून दाखवायला सुरुवात केली. त्यांच्या या राज्यारोहणामुळे एक गोष्ट अगदी उघड्यावर आली. अनेक सुसंस्कृत, उच्चस्तरातील लोकांना जी संस्कृती उदार-बहुविध वाटत होती, ती तशी नव्हती. या देशाच्या मुशीतील रसायनाच्या वरवरच्या शांत-उदार पृष्ठाच्या तळाशी धार्मिक राष्ट्रवाद उकळत होता, मुस्लिमद्वेष! जातीयद्वेष खोलवर मुरला होता. या देशाला राजकीय हेतूने पेटवलेल्या जातीय, धार्मिक दंग्यांचा फार मोठा इतिहास आहेच. १९८४मध्ये इंदिरा गांधी यांच्या शीख अंगरक्षकांनी त्यांची हत्या केल्यानंतर दिल्लीच्या रस्त्यांवर २७३३ शिखांच्या हत्या केल्या गेल्या. काँग्रेसचे नेतृत्व अगदी निर्दोष होते असे नाहीच, पण तरीही त्यांनी निधर्मीवादाचा पुनरुच्चार करत राहून झुंडीच्या हिंसाचारापासून पक्षाला अलग राखण्यात यश मिळवले. पण मोदींनी मात्र २००२च्या गुजरातमधील दंग्यांनंतर कानठळ्या बसवणारे मौन बाळगले होते. इतके की इतिहासातले ढोंग तरी बरेच बरे असे वाटू लागले. आल्डस हक्सले म्हणतो त्याप्रमाणे 'राजकारणातले ढोंगी निदान काही मूल्ये त्यांच्या राजकीय निकडीपेक्षा, आर्थिक गरजांपेक्षा श्रेष्ठ आहेत एवढे तरी मान्य करीत असतात.' मोदींनी कोणतेही पर्यायी नीतीमूल्य न देताच भारतापुढील आदर्श कल्पना मोडीत काढल्या आणि सर्व नीतीमूल्ये जणू संस्कृती आणि स्तर यांच्यासाठी असलेल्या लढाईपुढे दुय्यम असल्याचे प्रस्थापित केले.

त्यांच्या अमदानीत पूर्वी श्रेष्ठ मानलेले सारे आदर्श जणू राज्यकर्त्या उच्चभ्रूंनी केलेला पोकळपणा आहे असेच कथन तयार होऊ लागले. २०१९मध्ये मोदींनी ट्वीट केले- 'त्यांच्या दृष्टीने माझा गुन्हा काय आहे माहीत आहे? गरीब कुटुंबात जन्मलेली व्यक्ती त्यांच्या घराणेशाहीला कसे काय आव्हान देते?' ते पुन्हा एकदा २०१४ची क्रांतीकारक बदलाची वातावरणनिर्मिती करण्याच्या खटपटीत आहेत. यातील 'त्यांच्या'ला संदर्भ आहे तो भारतातील इंग्रजी बोलणाऱ्या लोकांचा! ते काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत असे ते सूचित करतात. 'सल्तनत' या शब्दाचा वापर करून ते काँग्रेस ही विदेशी राजवटीचे वारसदार आहे असे सुचवून कुत्र्यांना छू करण्याचे तंत्र वापरतात. या देशाचा कब्जा ब्रिटिशांनी १८५८नंतर घेतला, त्यापूर्वी येथे मुस्लिम राज्यकर्ते होते - आणि आता पुन्हा गर्वोन्नत हिंदूंचा उदय होऊ नये म्हणून हे लोक काम करीत आहेत असे त्यांनी शिताफीने सूचित केले आहे.

२०१४मध्ये मोदींनी सांस्कृतिक आघाडीवर असलेल्या सार्वत्रिक संतापाला आर्थिक प्रगतीच्या वचनांनी एकवटून आणले. ते नोकऱ्यांबद्दल बोलत, विकासाबद्दल बोलत. समाजवादी राज्यव्यवस्थेवर त्यांनी काढलेले उद्गार प्रसिद्ध झाले- ते म्हणाले गवर्न्मेंट हॅज नो बिझनेस बिइंग इन बिझनेस- शासनाने उद्योगधंद्यात असण्याचा धंदा करू नये. आता खरंही वाटणार नाही पण ती निवडणूक अनेक दृष्टीने एक आशादायक निवडणूक होती. १९९२मध्ये अयोध्येत सोळाव्या शतकातील मशीद नष्ट केल्याची घटना घडली होती, पण २०१४मध्ये दिल्लीच्या पत्रकारांनी जेव्हा मोदींच्या मतदारापुढे अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिराचा प्रश्न टाकला तेव्हा त्यांनी संतप्त होऊन उलटा प्रश्न केलेला- आम्हाला मंदिरांबद्दल का विचारताय- आम्ही त्यांना मत देणार कारण आम्हाला विकास हवा आहे. 'सब का साथ, सब का विकास' ही मोदींची तेव्हाची घोषणा होती. ●●●

# रोजगार उपलब्धतेत मुस्लिमांप्रती भेदभाव : एक अभ्यास



अजय के. नाईक,
खलिद खान, आशुतोष वर्मा

भाग १

> मुस्लिमांसाठी शहरी भागांमध्ये ग्रामीण भागांच्या तुलनेत कामगार बाजारपेठेच्या स्थिती कमी अनुकूल आहेत. खांडलेकर (१९९२) यांनी या संदर्भात आधीच्या काळात केलेल्या एका अभ्यासात, धर्म या घटकाचा समावेश केला होता. त्यांनी मुंबईतील वेगवेगळ्या बाजारपेठांचा अभ्यास केला होता. या अभ्यासातून असे निष्पन्न झाले होते की, संरक्षित मजुरी क्षेत्र हे अहिंदू कामगारांच्या तुलनेत हिंदू कामगारांना अधिक अनुकूल होते.

मुस्लिम हा भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा धार्मिक गट आणि सर्वात मोठा धार्मिक अल्पसंख्याक समूह आहे. मात्र तरीही सरकारकडून, धोरणकर्त्यांकडून आणि संशोधकांकडून करण्यात आलेल्या विविध अभ्यासांतून असे दिसून आले आहे की, बहुतांश मानव विकासाच्या निकषांवर मुस्लिम मागास आहेत, मागे राहिले आहेत. मुस्लिम हा भारतातील सर्वाधिक गरीब, शैक्षणिकदृष्ट्या मागास आणि राजकीयदृष्ट्या सर्वाधिक कमी प्रतिनिधित्व लाभलेला गट आहे. याखेरीज आरोग्य, घरे उपलब्ध असणे, पिण्याचे सुरक्षित पाणी, स्वच्छता इ. मानव विकासाच्या इतर विविध निकषांच्या संदर्भातील त्यांची कामगिरीही अत्यंत असमाधानकारक आहे. सरकारी नोकऱ्यांतील आणि संघटित क्षेत्रातील मुस्लिमांचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे आणि त्यामुळेच त्यांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने पुरेसे उत्पन्न मिळवून न देणाऱ्या असंघटित खासगी क्षेत्रात आणि किरकोळ स्वयंरोजगाराची कामे त्यांना करावी लागतात. मात्र सर्वसमावेशक विकासासाठी प्रत्येक धार्मिक समाजाला त्याचे लाभ मिळणे आवश्यक असून त्यांनी विकास प्रक्रियेत भागही घेतला पाहिजे. त्यामुळे गटांतर्गत विषमता कमी होईल.

काही अभ्यासांतून मुस्लिमांच्या दुर्बलतेवर प्रकाश टाकण्यात आला असला तरीही भारतात मुस्लिमांच्या स्थितीवरच्या कागदोपत्री लेखनाची, साहित्याची कमतरता आहे. जॉन आणि मुटाटकर (२००५) यांनी असे निरीक्षण नोंदवले आहे की, ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांत मुस्लिमांच्या आहाराची सरासरी सर्वात कमी आहे. शहरी भागांत हा फरक अधिक ठळकपणे दिसून येतो. तिथे त्यांची अन्न खाण्याची पातळी हिंदूंच्या तुलनेत २२ टक्क्यांनी कमी आहे. मात्र या दोन गटांतील संबंधित तफावत ग्रामीण भागात फक्त ४ टक्के आहे. या अभ्यासातून पुढे असेही स्पष्ट झाले आहे की, ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात मुस्लिमांमध्ये गरिबीचे प्राबल्य आणि प्रघात, खोली आणि तीव्रता सर्वोच्च आहे. खरे तर ग्रामीण भारतातील धार्मिक गटांमधील गरिबीच्या निष्कर्षांमधील वैविध्याचे प्रमाण शहरी किंवा नागरी भारताच्या तुलनेत खूपच कमी आहे. उदाहरणार्थ, ग्रामीण भारतातील हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील जनगणनेच्या गुणोत्तरातील फरक नगण्य आहे, मात्र शहरी भारतातील हे गुणोत्तर मुस्लिमांमध्ये १५ टक्के पॉइंट्सनी अधिक आहे. दास, कार, एस. आणि कायल एम. (२०११) यांनी त्यांच्या अभ्यासात पश्चिम बंगालच्या ११ जिल्ह्यांतील ग्रामीण भागातील प्राथमिक घरगुती माहिती गोळा केली आणि पश्चिम बंगालच्या ग्रामीण भागातील अल्पसंख्याक दाट वस्तीच्या विविध स्तरांना सार्वजनिक मालाची किती उपलब्धता आहे, याचे मापन केले.

अनुभवाधिष्ठित अभ्यासावर आधारित प्रयोगांतून संशोधकांना असे आढळले की, मुस्लिमांना मूलभूत सुविधा, आरोग्य आणि वाहतूक सुविधा अत्यंत किरकोळ प्रमाणात उपलब्ध होतात. एक्सपर्ट ग्रूप टू प्रपोज अ डायव्हर्सिटी इंडेक्स अँड वर्कआऊट द मोडॅलिटीज ऑफ इम्प्लिमेंटेशन (गोख, २००८) मधून मुस्लिम समाजाचा जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात कमी सहभाग दिसून येतो. मागास गटांसाठी असलेला निधी पूर्णपणे न वापरणे हाही एक महत्त्वाचा काळजीचा व विचार करण्याचा मुद्दा आहे. निल्सेनने (२०११) पश्चिम बंगालच्या मुस्लिम अल्पसंख्याकांचा अभ्यास केला. त्यातून त्याने असे दाखवून दिले की, राज्यातील विकासात्मक आणि राजकीय अशा दोन्ही प्रक्रियांमधून मुस्लिमांना अनेक बाबतीत वगळण्यात आले होते. लोकसंख्येतील इतर क्षेत्रांच्या तुलनेत सामाजिक-आर्थिक निकषांच्या व्याप्तीत त्यांना लक्षणीय कमी गुण मिळतात. तसेच राजकीय वर्तुळातील त्यांचे प्रतिनिधित्वही अत्यल्प आहे. तरीही अलीकडच्या वर्षांत मुस्लिम

संघटनांमध्ये ही विकासात्मक कमतरता दूर करण्यासाठी आणि तिच्यावर मात करण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी वाढती गतिशीलता निर्माण झाल्याचे दिसत आहे. शरीफ (२०१३) यांनीही असा दावा केला आहे की, सार्वजनिक नोकरी आणि विकास पत यांसारख्या मुख्य प्रवाहातील संधी इतर अल्पसंख्याकांच्या तुलनेत मुस्लिमांना कमी प्रमाणात उपलब्ध आहेत.

भारतातील मुस्लिम अल्पसंख्याकांच्या बाबतीतील चिंतेची बाब अशी आहे की, देशात त्यांच्याविषयी पूर्वापार पूर्वग्रह आणि भेदभाव असल्याचे सूचित होते. देसाई आणि कुलकर्णी (२००८) यांनी असा दावा केला होता की, मुस्लिमांना सामाजिक भेदभावाचा त्रास दीर्घ काळापासून सहन करावा लागला आहे. मात्र गेल्या दशकात झालेल्या हिंदू मूलतत्त्ववादाच्या उदयापासून अलीकडे हा त्रास मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. वाढत्या प्रमाणातील संस्थात्मक उपेक्षेचा मुस्लिमांना त्रास होत आहे. लोकप्रिय दृष्टिकोनांतील शत्रूत्वाचा, पोलीसांच्या आणि इतर अधिकाऱ्यांच्या हातून त्यांच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या भेदभावाचा, पूर्वग्रहदूषित शैक्षणिक अभ्यासक्रमाचा, इतिहासविषयक पक्षपाती, वादग्रस्त दृष्टिकोनांचा आणि सांस्कृतिक दुर्बोधतेच्या परिणामांचा त्यांना वाढत्या प्रमाणात अनुभव येत आहे. मुस्लिमांना अनुषंगिकपणे दर्जेदार घरे आणि बँकांच्या सेवा किंवा पाणी, आरोग्य आणि वाहतूक या मूलभूत सेवा-सुविधा नाकारल्या जातात. दास (२०१०). मुस्लिम समाजाच्या विरोधात आयुष्याच्या विविध क्षेत्रांत अशा प्रकारे सर्वत्र पसरलेल्या आणि सखोल रुजलेल्या भेदभावांच्या प्रकाशात कामगार बाजारपेठेतील भेदभावाची तपासणी करणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. या पार्श्वभूमीवर हा सध्याचा अभ्यास भारतातील कामगार बाजारपेठेतील मुस्लिमांची परिस्थिती शोधण्याचा प्रयत्न करत आहे. दुय्यम माहितीच्या आधारावरच्या त्यांच्या प्रतिनिधित्वाच्या स्थितीखेरीज अनौपचारिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून नागरी कामगार बाजारपेठेतील मुस्लिमांच्या बाबतीतील धर्माधारित भेदभावाच्या अस्तित्वाचे क्षेत्रीय अभ्यासाद्वारे (फिल्ड स्टडीद्वारे) परीक्षणही करण्यात आले आहे.

**माहिती आणि पद्धती :** या अभ्यासातून नागरी अनौपचारिक कामगार बाजारपेठांत मुस्लिमांना तोंड द्याव्या लागणाऱ्या धर्माधारित भेदभावाच्या आर्थिक आणि सामाजिक-सांस्कृतिक निकषांचा शोध घेण्यात आला आहे. मुस्लिमांना उपलब्ध असलेल्या कामगार बाजारपेठेचे मापन त्यांच्या एकूण रोजगारातील वाट्याच्या संदर्भात करण्यात आले आहे. नागरी परिसरांतील त्यांच्या स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी ग्रामीण-शहरी अशा दोन स्वतंत्र घटकांचा वापर करण्यात आला आहे. रोजगाराव्यतिरिक्त रोजगाराच्या दर्जावरही लक्ष एकवटण्यात आले आहे आणि शैक्षणिक रोजगार व आर्थिकदृष्ट्या सुस्थितीतील गटांच्या रोजगारांमधील त्यांच्या वाट्याच्या संदर्भात त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे. दुय्यम माहितीच्या आधारावर करण्यात आलेले विश्लेषण हे कोणत्या क्षेत्रांत मुस्लिमांची परिस्थिती मोठ्या प्रमाणात काळजी करण्याजोगी आहे यावर आधारित आहे. दुय्यम माहिती २०११-१२ च्या रोजगार आणि बेरोजगारीवरच्या नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या माहितीवर आधारित आहे. धर्माधारित भेदभावाचा सर्वसामान्य आढावा घेण्यासाठी दिल्लीच्या एनसीआरमधील नागरी समाजात काम करणाऱ्या निवडक प्रतिसादकर्त्यांच्या सखोल मुलाखती घेऊन क्षेत्रीय अभ्यास करण्यात आला. प्रतिसादकर्त्यांमध्ये घरांची देखभाल करणारे कर्मचारी, स्थानिक दुकानदार, लाँड्रीकाम करणारे, शिंपी आणि घरगुती कामे करणाऱ्यांचा समावेश होता. त्यांच्यापैकी बहुतेक जण पश्चिम बंगालमधून व उत्तर प्रदेशातून आणि काही बिहारमधून स्थलांतरित झाले होते.


**तक्ता १ : भारतातील रोजगाराचे धर्मनिहाय वर्गीकरण**

**(टक्केवारीत) : २०११-१२**

| धर्म | ग्रामीण | शहरी | एकूण |
|---|---|---|---|
| हिंदू | ८५.१ | ७८.२ | ८३.१ |
| मुस्लिम | १०.१ | १५.८ | ११.८ |
| ख्रिश्चन | १.९ | ३.० | २.२ |
| शीख | १.९ | १.४ | १.७ |
| इतर | १.० | १.६ | १.२ |
| एकूण | १०० | १०० | १०० |

*स्रोत : ६८ वा राऊंड, रोजगार आणि बेरोजगारी यावरची एनएसएसओ माहिती, २०११.*

**आलेख १ : शहरी भारतात रोजगार करणाऱ्यांमध्ये धार्मिक गटांचा वाटा : २०११**




**विश्लेषण :** शहरी कामगार बाजारपेठेतील मुस्लिम-कमी दर्जाच्या कामांमध्ये अधिक केंद्रीकरण

भारतातील एकूण रोजगारात मुस्लिमांचे प्रमाण ११.८ टक्के आहे. हा वाटा ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात उच्चतर आहे. ग्रामीण भागात तो -१०.१ टक्के आणि शहरी भागात १५.८ टक्के आहे. (आलेख १ आणि तक्ता १ पहा)

अभ्यासांतून असे सूचित होते की, मुस्लिमांसाठी शहरी भागांमध्ये ग्रामीण भागांच्या तुलनेत कामगार बाजारपेठेच्या स्थिती कमी अनुकूल आहेत. खांडलेकर (१९९२) यांनी या संदर्भात आधीच्या काळात केलेल्या एका अभ्यासात, धर्म या घटकाचा समावेश केला होता. त्यांनी मुंबईतील वेगवेगळ्या बाजारपेठांचा अभ्यास केला होता. या अभ्यासातून असे निष्पन्न झाले होते की, संरक्षित मजुरी क्षेत्र हे अहिंदू कामगारांच्या तुलनेत हिंदू कामगारांना अधिक अनुकूल होते. डिसोझा आणि इतर (२०१६)

**तक्ता २ : शहरी भारतातील व्यावसायिक गटनिहाय धार्मिक गटांमधील रोजगारी : २०११-१२**

| धर्म | स्वयंरोजगारित वेतनधारक | नयमित कामगार | हंगामी वेतनधारक | स्वयं-रोजगारित | नियमित कामगार | हंगामी वेतनधारक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रांग (रो) टक्केवारी | | | | स्तंभ (कॉलम) टक्केवारी | | |
| हिंदुत्व | ३९.८ | ४५.६ | १४.६ | ८२.४ | ८२.५ | ८४.८ | ८३.१. |
| इस्लाम | ५४.५ | २७.९ | १७.७ | १२.५ | १०.५ | ११.२ | ११.८. |
| ख्रिश्चन | ३०.० | ५३.४ | १६.५ | २.१ | ३.६ | १.६ | २.२.. |
| शीख | ५२.६ | ४२.९ | ४.४ | १.९ | १.९ | १.३ | १.७.. |
| इतर | ४०.६ | ४९.३ | १०.१ | १.१ | १.५ | १.१ | १.२. |
| एकूण | ४२.० | ४३.१ | १४.९ | १०० | १०० | १०० | १०० |

*स्रोत : ६८ वा राऊंड, रोजगार आणि बेरोजगारी यावरची एनएसएस माहिती, २०११-१२.*

**तक्ता ३ : शहरी भारतात क्षेत्रनिहाय धार्मिक गटांमधील रोजगार**

| २०११-१२ धर्म | शेती | उद्योग | नोकऱ्या | शेती | उद्योग | नोकऱ्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रांग टक्केवारी | | | स्तंभ टक्केवारी | | |
| हिंदुत्व | ७.१ | ३३.४ | ५९.४ | ८३ | ७५.५ | ७९.३ | ७८.२ |
| इस्लाम | ४ | ४३.६ | ५२.४ | ९.४ | १९.९ | १४.१ | १५.८ |
| ख्रिश्नच | ९.२ | २७.२ | ६३.६ | ४.१ | २.४ | ३.३ | ३ |
| शीख | ११.४ | २८.७ | ५९.९ | २.३ | १.१ | १.४ | १.४ |
| इतर | ५.१ | २२.६ | ७२.३ | १.२ | १ | १.९ | १.६ |
| एकूण | ६.७ | ३४.६ | ५८.६ | १०० | १०० | १०० | १०० |

*स्रोत : ६८ वा राऊंड, रोजगार आणि बेरोजगारी यावरची एनएसएस माहिती, २०११-१२.*

यांनी एनएसएस माहितीच्या आधारावर असा निष्कर्ष काढला की इतर धार्मिक अल्पसंख्याक आणि हिंदू उच्चवर्णीय हे औपचारिक क्षेत्रात गुंतलेले होते, तर मुस्लिम किरकोळ कामांत गुंतले होते.


अखिल भारतीय पातळीवरच्या २०११-१२ च्या अगदी अलीकडच्या माहितीतून असे दिसते की, किरकोळ कामे आणि स्वयंरोजगार यांमध्ये सर्वोच्च प्रमाणात मुस्लिम एकवटलेले आहेत. (तक्ता २ पहा). किरकोळ किंवा हंगामी कामांतील मुस्लिमांचा वाटा १७.७ टक्के होता, तर हिंदूंचा वाटा १४.६ टक्के होता. हिंदूंच्या तुलनेत मुस्लिमांमध्ये स्वयंरोजगारितांचे प्रमाण अधिक होते. हे प्रमाण मुस्लिमांमध्ये ५४.५ टक्के आणि हिंदूंमध्ये ३९.८ टक्के होते. दुसरीकडे नियमित वेतनाच्या नोकऱ्यांतील त्यांचा वाटा फक्त २७.९ टक्के होता, तर हिंदूंचा वाटा ४५.६ टक्के होता. रोजगाराच्या क्षेत्रीय वर्गीकरणातून धार्मिक गटनिहाय तफावत उघड होते. औद्योगिक क्षेत्रात मुस्लिम मोठ्या प्रमाणात एकवटलेले आहेत, तर नोकरीच्या क्षेत्रात हिंदू मोठ्या प्रमाणात एकवटलेले आहेत. (तक्ता २ पहा.)

नोकरीच्या क्षेत्रात इतर धार्मिक अल्पसंख्यांकांचेही मुस्लिम समाजाच्या तुलनेत अधिक केंद्रीकरण झाले आहे. नोकऱ्यांची क्षेत्रनिहाय रचना असे दर्शवते की, औद्योगिक क्षेत्रातील एकूण रोजगारात मुस्लिमांचे प्रमाण सुमारे २० टक्के आहे, तर सेवा किंवा नोकरीच्या क्षेत्रातील त्यांचा वाटा फक्त १४ टक्के आहे. नोक-यांचे व्यावसायिक गटनिहाय आणखी वर्गीकरण केले तर शहरी कामगार बाजारपेठेतील दर्जेदार रोजगाराच्या संदर्भात धार्मिक तफावत दिसून येते. (आलेख २ आणि तक्ते ४ व ५ पहा). मुस्लिम लोक कारागिरी आणि संबंधित कामे, प्रकल्प आणि मशीन ऑपरेटर आणि प्राथमिक व्यवसाय यांसारख्या कमी दर्जाच्या नोकऱ्यांमध्ये गुंतल्याचे आढळून येते. नोकरी क्षेत्रातील मुसलमानांपैकी ४० टक्के मुस्लिम कारागिरी आणि संबंधित कामे तसेच प्रकल्प आणि मशीन ऑपरेटर व प्राथमिक व्यवसाय या दोन व्यवसायांत गुंतलेले आहेत, ही बाबही इथे लक्षात घेतली पाहिजे. यामधील हिंदूंचा संबंधित वाटा फक्त २५ टक्के आहे.

**लेखक : अजय के. नाईक आणि खलिद खान** हे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीज, नवी दिल्ली इथे साहाय्यक प्राध्यापक आहेत. तर **आशुतोष वर्मा** हे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीज, नवी दिल्ली या संस्थेशी प्रशिक्षणार्थी म्हणून संलग्न होते.

●●●

**आलेख २ : शहरी भारतातील हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील व्यावसायिक गटांचा वाटा : २०११.**





# स्वयंरोजगार करणाऱ्यांमध्ये गरिबी अधिक

प्रो. सुखदेव थोरात/ मशकूर अहंमद

भाग दुसरा

हंगामी कामे करणाऱ्या कुटुंबांमध्ये बौद्ध कामगारांचे प्रमाण उच्चतर (१९ टक्के) आहे. त्यानंतर मुस्लिमांचे (१७.३ टक्के), ख्रिश्चनांचे (१७.८ टक्के) अशी प्रमाणे आहेत. बौद्ध आणि मुस्लिम यांच्यातील हंगामी मजुरांचे किंवा कामगारांचे प्रमाण हिंदू (१३.८ टक्के), शीख (३.५ टक्के) आणि ख्रिश्चन (२.३ टक्के) यांच्या तुलनेत उच्चतर आहे.

वर केलेल्या विश्लेषणातून बौद्ध आणि मुस्लिम यांच्यामध्ये टिकून असलेल्या एकूणच, तुलनात्मक उच्च प्रमाणातील गरिबीच्या कारणांविषयी थोडीफार कल्पना येते. याखेरीज या विश्लेषणातून स्वयंरोजगारित मुस्लिमांमध्ये आणि नियमित वेतनाच्या रोजगारातील मुस्लिमांमध्ये व बौद्धांमध्ये टिकून असलेल्या गरिबीच्या तुलनात्मक उच्च प्रमाणाच्या कारणांविषयीचे संकेतही समजतात. नियमित वेतनाच्या रोजगारांच्या कमी उपलब्धीमुळेही अखेरचा उपाय म्हणून मोठ्या प्रमाणातील मुस्लिमांना घरगुती, कमी उत्पन्न देणाऱ्या स्वयंरोजगाराच्या कामांकडे जबरदस्तीने, नाईलाजाने वळावेच लागते. या परिस्थितीमुळे स्वयंरोजगारितांमधील गरिबीचे प्रमाण वाढते. उत्पन्नासाठी ज्या क्षेत्रावर बौद्ध अवलंबून असतात, ती क्षेत्रे भिन्न असली तरीही बौद्धांमध्येही अशीच परिस्थिती दिसते. मालमत्तांच्या उपलब्धीच्या अभावामुळे बौद्धधर्मीय रोजंदारीच्या आणि नियमित वेतनाच्या कामांकडे वळतातय परंतु नियमित वेतनाची ही बहुतांश कामे अनौपचारिक क्षेत्रांतच एकवटलेली असल्याने ती कमी उत्पन्न देणारी असतात. यामुळे बौद्धांमध्ये हिंदूंच्या किंवा ख्रिश्चनांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात गरिबी निर्माण होते. या धार्मिक गटांमध्ये शिक्षणाची आणि व्यावसायिक कौशल्यांची पातळी कमी असल्यानेही या गटातील लोकांचे अनौपचारिक क्षेत्रातील कमी वेतन देणाऱ्या रोजगारांमध्ये काम करण्याचे प्रमाण अधिक आहे.

**शिक्षणाची उपलब्धी :** सन २०१४ मध्ये करण्यात आलेल्या एनएसएसच्या शिक्षणविषयक सर्वेक्षणावर आधारित विविध धार्मिक गटांना असलेल्या शिक्षणाच्या संधीच्या किंवा उपलब्धीच्या परिस्थितीचे या विभागात विश्लेषण करण्यात येणार आहे. सन २०१४ मध्ये अखिल भारतीय स्तरावरचा साक्षरतेचा दर ७५.८ टक्के होता. मुस्लिमांमधील साक्षरतेचा दर सर्वात कमी ७३.० टक्के होता. त्यानंतर हिंदूंमध्ये ७५.८ टक्के होता. त्याउलट जैन (९५.३ टक्के), ख्रिश्चन (८८ टक्के), बौद्ध (८३.६ टक्के), शीख (७८ टक्के) आणि इतरांमध्ये (७३.८ टक्के) होता.

देशातील धार्मिक गटांमध्ये शिक्षणाच्या पातळ्यांमध्ये लक्षणीय तफावती टिकून असल्याचे दिसून आले आहे. एका बाजूला मुस्लिमांमध्ये साक्षर लोकांचे प्रमाण सर्वोच्च आहे, तर दुसरीकडे त्यांच्यापैकी बहुसंख्य लोकांनी अत्यल्प शिक्षण घेतले आहे. सुमारे २१ टक्के साक्षर मुस्लिमांनी प्राथमिक शिक्षणाहूनही कमी शिक्षण घेतले होते आणि आणखी ३३.७ टक्के लोकांनी प्राथमिक ते माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण घेतले होते. त्याचप्रमाणे बौद्धांमध्येही मोठ्या प्रमाणातील लोकसंख्या (३८.१ टक्के) ही प्राथमिक आणि माध्यमिक स्तरापर्यंतचे, तर २३.९ टक्के लोकसंख्या ही माध्यमिक व उच्च माध्यमिकपर्यंतच शिक्षण घेतलेली होती. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या लोकसंख्येचे मोठे प्रमाण (३६ टक्के) जैनांमध्ये होते. त्याखालोखाल शीख आणि ख्रिश्चनांमध्ये (प्रत्येकी २७ टक्के) ते होते. बौद्धांमध्ये ते २४ टक्के आणि हिंदूंमध्ये २० टक्के होते. मुस्लिमांमध्ये ते सर्वात कमी म्हणजे १४

टक्के होते. अशा प्रकारे बहुसंख्य मुस्लिमांचे शिक्षण शिक्षणाच्या कनिष्ठ पातळीपर्यंतच मर्यादित होते. माध्यमिक स्तराहून खालच्या पातळीवरच्या शिक्षणाच्या वेळी मुस्लिम विद्यार्थ्यांमधील गळतीचे प्रमाण मोठे असल्याचे यावरून सूचित होते. शिक्षणाची पातळी वाढत जाते तसतशी मुस्लिम आणि इतर धार्मिक गट यांच्यातील तफावतही वाढत जाते, यावर सच्चर समितीच्या अहवालातही (२००६) शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

उच्च शिक्षण घेणाऱ्या लोकसंख्येचे मुस्लिमांमधील टक्केवारी (८.३ टक्के) ही सर्वात कमी होती. म्हणून उच्च शिक्षणात फक्त मुस्लिमांचेच प्रतिनिधित्व कमी आहे. (थोरात, २०१३) . त्याचप्रमाणे बौद्धांमध्ये उच्चस्तरीय शिक्षण घेतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण (५.७ टक्के) हे जैनांमधील उच्चशिक्षितांच्या ३१.४ टक्के, ख्रिश्चनांमधील १२.१ टक्के, शिखांमधील ८.६ टक्के आणि हिंदूम धील ८.४ टक्के या प्रमाणाच्या तुलनेत कमी आहे. अशा प्रकारे मुस्लिम आणि बौद्ध या दोहोंनाही उच्च शिक्षणाच्या अत्यल्प संधी उपलब्ध आहेत. परिणामी, अर्थकारणाच्या संघटित क्षेत्रातील उच्च वेतनाच्या नोकऱ्या किंवा रोजगार मिळवण्याच्या त्यांच्या संधीही कमी होतात. सर्वच धार्मिक गटांमध्ये नावनोंदणी दराबाबतही अशाच प्रकारच्या तफावती आढळल्या होत्या. २०१४ मध्ये प्राथमिक आणि मध्यम (झ/च) शालेय स्तरीय शिक्षणाचा अखिल भारतीयस्तरीय एकूण नावनोंदणी दर हा ९७ टक्के होता. झ/च नावनोंदणी ही शिखांमध्ये सर्वोच्च म्हणजे ९७ टक्के होती. त्याखालोखाल ख्रिश्नच, हिंदू, जैन, बौद्ध आणि मुस्लिम यांच्याम ध्ये उतरत्या क्रमाने ही नावनोंदणी होती. अशा प्रकारे इतर धार्मिक गटांच्या तुलनेत मुस्लिम आणि बौद्ध या गटांची नावनोंदणी कमी होती. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (ड/क्ह) स्तरांवर सर्वंकष नावनोंदणीचा दर ७८ टक्के होता. ड/क्ह स्तरावरचा क्रम काहीसा वेगळा होता. या स्तरावरचा नावनोंदणीचा दर जैनांमध्ये सर्वोच्च होता. त्याखालोखाल बौद्ध व ख्रिश्चनांमध्ये आणि नंतर हिंदू व मुस्लिम अशा क्रमाने तो होता. पुन्हा एकदा मुस्लिमांमधील ड/क्ह स्तरीय शिक्षणातील नावनोंदणीचा दर सर्वात कमी होता. झ/च पातळीचा विचार करता ड/क्ह पातळीवर बौद्धांनी अधिक चांगली कामगिरी केली होती.

उच्च शिक्षणाच्या बाबतीत अखिल भारतीय पातळीवरचा एकूण नावनोंदणीचा दर २७ टक्के होता. पुन्हा एकदा मुस्लिमांमध्ये याही बाबतीतील दर सर्वात कमी होता. तो १५ टक्के होता. परंतु इतर धार्मिक गटांचा विचार केला तर जैनांमध्ये तो ६० टक्के, ख्रिश्चनांमध्ये ३९ टक्के, शिखांमध्ये ३४ टक्के, बौद्धांमध्ये ३१ टक्के आणि हिंदूंमध्ये २८ टक्के होता. अशा प्रकारे साक्षरतेचा दर आणि झ/च, ड/क्ह आणि उच्च शिक्षण या बाबतीतील नावनोंदणी या दोन्ही बाबतीत मुस्लिम इतर धार्मिक गटांच्या तुलनेत खूपच मागे होते. दुसरीकडे, बौद्ध इतर गटांच्या पुढे गेले नसले तरीही त्या गटांपर्यंतचा पल्ला त्यांनी जवळजवळ गाठल्यासारखे दिसत होते.

**१५–५९ वर्षे वयाच्या लोकसंख्येतील बेरोजगारीचा दर (करंट डेली स्टेटस) :** अखेरीस आपण विविध धार्मिक गटांमधील बेरोजगारीच्या दरातील तफावतींचे मूल्यमापन करणार आहोत. भारतात करंट डेली स्टेटसच्या आधारावर १५५९ वर्षे वयोगटातील अनुमानित बेरोजगारीचा दर हा २०११–१२ च्या दरम्यान ५.७ टक्के होता. ग्रामीण आणि शहरी भागातील बेरोजगारीचा दर हा जवळजवळ समान होता. मात्र बेरोजगारीचा दर धार्मिक गटांमध्ये लक्षणीयरित्या भिन्न होता. ख्रिश्चनांमध्ये तो सर्वोच्च (९.५ टक्के ) आणि बौद्धांमध्ये सर्वात कमी (७.६ टक्के) होता. त्याखालोखाल तो मुस्लिमांमध्ये (६.० टक्के) आणि हिंदूंमध्ये (५.६ टक्के) होता. अशा प्रकारे हिंदू, मुस्लिम आणि बौद्ध या तीन धार्मिक गटांमध्ये बौद्धांमध्ये बेरोजगारीचा दर सर्वोच्च होता.

बौद्धांमध्ये निरक्षरांचा बेरोजगारीचा दर सर्वोच्च म्हणजे ९.५ टक्के होता. तर मुस्लिम (४.५ टक्के) आणि हिंदू (४.७ टक्के) यांच्यामध्ये तो जवळजवळ सारखा होता. बौद्धांमध्ये मध्यमस्तरीय शिक्षणाच्या पातळीवर बेरोजगारीचा दर सर्वोच्च (११.६ टक्के) होता. मुस्लिम आणि हिंदू यांच्यामध्ये तो कमी म्हणजे प्रत्येकी सुमारे ६ टक्के होता. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवर मुस्लिमांच्या बाबतीत बेरोजगारीच्या दरात वाढ झाल्याचे दिसते. खरे तर, दोन्ही पातळ्यांवर बौद्ध आणि हिंदू यांच्या तुलनेत म ुस्लिमांमध्ये हा दर उच्चतर (माध्यमिकमध्ये ६.७ टक्के आणि उच्च माध्यमिकमध्ये ९.५ टक्के) होता. पदवीच्या पातळीवरही असाच प्रवाह दिसतो. हिंदूंच्या ८ टक्के दराच्या तुलनेत मुस्लिम आणि बौद्ध यांच्यामध्ये बेरोजगारीचा दर सर्वोच्च असून तो जवळजवळ १३ टक्के होता. अशा प्रकारे उच्चतर पातळीवर मुस्लिम आणि बौद्ध या दोघांनाही कमी रोजगारीचा अनुभव घ्यावा लागतो. हा अनुभव त्यांना अंशतः त्यांच्याकडे असलेल्या कमी गुणवत्तेच्या शिक्षणामुळे आणि अंशतः नियमित वेतनाच्या रोजगाराच्या बाजारपेठेत त्यांना तोंड द्यावे लागणा–या भेदभावामुळे येतो.

१. शैक्षणिक स्तर याचा संदर्भ कुटुंबातील प्रौढ सदस्याने मिळवलेल्या शिक्षणाच्या सर्वोच्च पातळीच्या आधारावर कमी, मध्यम, उच्च या वर्गांशी आहे. शैक्षणिक पातळी निरक्षरसह प्राथमि क स्तराच्या खाली असेल तर त्याला कमी शिक्षण असे म्हटले गेले आहे. तसेच मध्यम आणि माध्यमिक शैक्षणिक पातळ्यांना मध्यम शिक्षणाच्या समकक्ष मानले गेले आहे आणि उच्च माध्यमि क व त्यापुढीच शैक्षणिक पातळ्यांना उच्च शिक्षण असे म्हटले गेले आहे.

**चर्चा आणि धोरणावरील परिणाम/ सहभाग :** देशातील धार्मिक गटांमधील गरिबीच्या प्रमाणात लक्षणीय तफावती असल्याकडे गरिबीविषयक आंतरधर्मीय भिन्नतांवरची चर्चा निर्देश करते. सर्व धार्मिक गटांमध्ये मुस्लिम आणि बौद्ध सर्वाधिक गरीब असल्याचे दिसून आले आहे. शहरी भागांमध्ये मात्र बौद्धांनी गरिबीच्या प्रमाणाचा विचार करता मुस्लिमांच्या पुढे पाऊल टाकले आहे. मात्र ख्रिश्चन, शीख आणि हिंदू यांच्या तुलनेत हे दोन्ही गट अत्यंत गरीब आहेत. ख्रिश्चन आणि शीख हे सर्वात कमी गरीब आहेत, तर गरिबीचा विचार करता हिंदू मध्यम गटात आहेत. वरवर पाहता विविध व्यावसायिक वर्गांमध्येही अशीच संरचना

## मुस्लिमांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण ६ टक्के, तर हिंदूंमध्ये ५ टक्के

इतर काही घटकांसह मुस्लिमांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे उच्च वेतन दिल्या जाणा-या नियमित वेतनाच्या नोक-यांमध्ये मुस्लिमांचाही सहभाग कमी आहे. मुस्लिम आणि बौद्ध यांचा विचार करता, उच्च शिक्षणाची उपलब्धी बौद्धांना मुस्लिमांच्या तुलनेत अधिक प्रमाणात आहे. मात्र यातील विरोधाभास असा आहे की, शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या क्षमता विकसित करून घेतल्यानंतरही उच्चतर वेतनाच्या नोक–यांच्या संधी बौद्धांना उपलब्ध होत नाहीत. बौद्धांमध्ये पूर्वीपासून टिकून असलेल्या बेरोजगारीच्या उच्च दरातून हे प्रतिबिंबित होते. मुस्लिमांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण ६ टक्के आणि हिंदूंमध्ये ते ५ टक्के आहे. त्या तुलनेत बौद्धांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण ७.६ टक्के आहे. वास्तविक, शिकलेल्या तरुणांमध्येच बेरोजगारीचा दर अधिक म्हणजे १२ टक्के आहे. शिकलेल्या हिंदू तरुणांमधील हा दर ८ टक्के आहे. उच्च शिक्षित तरुणांमधील बेरोजगारीचा दर मुस्लिम ांमध्येही उच्च आहे. तो सुमारे १३ टक्के आहे. आधी दाखवून दिल्याप्रमाणे बौद्ध आणि मुस्लिम यांच्यातील बेरोजगारीच्या मोठ्या प्रमाणाचे कारण हे खासगी क्षेत्रात नोक–या देताना त्यांच्या बाबतीत केल्या जाणा–या भेदभावात आहे.

आढळते. रोजंदारीवरील बौद्ध हंगामी शेतमजूर आणि मुस्लिम स्वयंरोजगारित कामगार हे इतर धार्मिक गटांच्या तुलनेत सर्वाधिक गरीब आहेत. ग्रामीण आणि शहरी भागांतही बौद्धांमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्यांचे प्रमाण सर्वोच्च आहे हे इथे नमूद करावेच लागेल. त्याचप्रमाणे स्वयंरोजगारित मुस्लिमांचे प्रमाण शहरी भागांत सर्वोच्च आहे आणि या दोन्ही गटांमध्ये गरिबीचे सर्वो च्च प्रमाणही आढळते. खरे तर बौद्धांमध्ये कमी पातळीचे शिक्षण घेतलेल्यांनीही गरिबी घटवण्याच्या निकालांच्या बाबतीत अधिक चांगले निकाल दाखवून दिले आहेत. मात्र पंगारिया आणि मोरे (२०१३ ) यांनी संशोधनाद्वारे असा निष्कर्ष काढला होता की, कुटुंबप्रमुखाचे शिक्षण जितके सर्वोच्च असेल तितका त्याचा संबंध मोठ्या प्रमाणात तीव्रतेने गरिबीचा दर कमी करण्याशी असतो. स्वयंरोजगारित आणि हंगामी मजूर असलेले बौद्ध लोक तशाच प्रकारच्या हिंदूंच्या आणि मुस्लिमांच्या तुलनेत गरीब असण्याच्या शक्यता खूपच अधिक आहेत. हिंदू आणि मुस्लिम यांच्यामध्ये हंगामी मजूर गरीब असण्याच्या शक्यता हिंदूंच्या तुलनेत मुस्लिम ांमध्ये कमी आहेत.

**मुस्लिम आणि बौद्ध यांच्यामध्ये गरिबीचे प्रमाण उच्च असण्याची काय कारणे आहेत? :** वर्णनात्मक विश्लेषण असे सूचित करते की, सर्वसामान्यपणे शेतजमीन आणि खासगी उद्योग यांसारख्या उत्पन्न मिळवून देणाऱ्या मालमत्तांवरची कमी मालकी, रोजगाराच्या आणि शिक्षणाच्या कमी पातळ्या आणि नियमित वेतनाच्या रोजगाराच्या कमी संधी ही मुस्लिम आणि बौद्ध या गटांमधील उच्चतर गरिबीम ागची संभाव्य कारणे आहेत. अल्पसंख्याक गटातील सदस्यांकडे जमीन आणि उद्योग यांच्यासह मालमत्तांची कमी मालकी असल्याचे आढळून आले आहे. त्यांना बेरोजगारीच्या उच्च दराचा त्रास सहन करावा लागतो आणि त्यांच्याकडे वेतनाधारित रोजगार कमी होते. शिवाय त्यांच्याकडे कमी पातळ्यांचे शिक्षण होते. मुस्लिम आणि बौद्ध यांच्यामध्ये गरिबीचे उच्च प्रमाण असण्यास हे सर्वसामान्य घटक कारणीभूत असले तरीही, मुस्लिम आणि बौद्ध यांच्यामध्ये गरिबीला कारणीभूत होणाऱ्या या घटकांच्या सापेक्ष महत्त्वामध्ये आणि गरिबीवर मात करण्यासाठी ते अनुसरत असलेल्या व्यूहरचनांमध्ये भिन्नताही आहेत.

सन २०११–१२ मध्ये मुस्लिम आणि बौद्ध यांच्याकडे हिंदूंच्या तुलनेत ग्रामीण भागांत शेतजमिनींची मालकी असण्याचे प्रमाण कमी होते. हिंदूंमधील स्वयंरोजगारित शेतकऱ्यांच्या प्रमाणाच्या (४२ टक्के) तुलनेत त्यांच्यातील स्वयंरोजगारित शेतक–यांचे प्रम ाणही(२८ टक्के) कमी होते. दोन्ही धार्मिक गटांनी शेतजमिनींवर मालकी मिळवण्यातील मर्यादा दूर करण्यासाठी विविध व्यूहरचना स्वीकारल्या. मुस्लिमांनी उद्योग आणि व्यवसाय सुरू केले, तर बौद्धांनी हंगामी मजूर म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

यानंतर मुस्लिमांमधील स्वयंरोजगारित अकृषक कुटुंबांचे प्रम ाण २७ टक्के होते आणि बौद्धांचे या व्यवसायांतील प्रमाण फक्त ९ टक्के होते. मात्र हेच प्रमाण हंगामी मजूर म्हणून काम करण्याच्या बाबतीत या दोन्ही गटांमध्ये बरोबर उलटे होते. ५४ टक्के बौद्ध लोक हंगामी रोजंदारीवरील मजूर म्हणून काम करत होते तर मुस्लिम आणि हिंदू या दोन्ही गटांमधील प्रत्येकी ३५ टक्के लोकच रोजंदारीवर काम करत होते. नियमित वेतनाच्या नोकऱ्यांचा विचार करता तिथे काम करणाऱ्यांचे प्रमाण बौद्ध आणि मुस्लिम या दोहोंसाठी समान म्हणजे प्रत्येकी सुमारे ९ टक्के होते.

शहरी भागांतही अशीच परिस्थिती असल्याचे आढळले. तिथे मुस्लिम स्वयंरोजगार करत होते आणि बौद्ध हंगामी मजूर म्हणून काम करण्याच्या संधीच्या शोधात होते. स्वयंरोजगारित आणि व्यवसायाची मालकी असलेल्या लोकांचे प्रमाण मुस्लिमांमध्ये बौद्धांच्या तुलनेत सुमारे पाच पट अधिक होते. मुस्लिमांचे प्रमाण ५६ टक्के आणि बौद्धांचे फक्त ११.५ टक्के होते. अशा प्रकारे बौद्ध हे जास्त प्रमाणात नियमित वेतनाच्या नोकऱ्यांवर आणि हंगामी रोजंदारीच्या नोकऱ्यांवर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असल्याचे यावरून स्पष्ट होते. मुस्लिमांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणातील (६७ टक्के) बौद्ध लोक हे नियमित वेतनाच्या कामात गुंतल्याचे

आढळले, मुस्लिमांमधील हे प्रमाण २६.२ टक्के होते. हंगामी कामात गुंतलेल्या लोकांचे प्रमाण मात्र बौद्ध आणि मुस्लिम या दोहोंतही सारखेच म्हणजे १७ –१९ टक्के होते. इथे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये आरक्षण असल्यामुळे नियमित वेतनावर काम करणाऱ्या कामगारांचे बौद्धांमधील प्रमाण उच्चतर असण्याची शक्यता आहे. मुस्लिमांना मात्र असे आरक्षण नाही.

अशा प्रकारे मुस्लिम आणि बौद्ध या दोघांनाही शेतजमिनी आणि अकृषक व्यवसाय यांसारख्या भांडवली मालमत्ता कमी प्रमाणात उपलब्ध असल्याचा त्रास सहन करावा लागत आहे. परंतु या आव्हानाचा सामना करण्यासाठी त्यांनी विविध व्यूहरचना शोधल्या आहेत. मुस्लिमांना विशेषतः शहरी भागांत भांडवली मालमत्ता आणि नियमित वेतनाच्या नोकऱ्या या दोन्ही गोष्टी उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी उद्योगांची आणि व्यवसायांची उभारणी करून आर्थिक स्वयंरोजगारित कृतींचा आश्रय घेतला. म्हणूनच शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही क्षेत्रांतील अकृषक स्वयंरोजगारित कामांमधील त्यांचा वाटा बौद्धांच्या तुलनेत उच्चतर आहे. मात्र त्यांच्या या वाट्याचा आकार हा भांडवलाच्या मालकीच्या स्वरूपातील त्यांच्या संभाव्य ताकदीऐवजी त्यांच्या यातनामय परिस्थितीचा परिणाम आहे. भांडवलावरची घटलेली मालकी आणि नियमित वेतनाच्या नोकऱ्यांमधील कमी संधी यामुळे त्यांना विविध प्रकारची स्वयंरोजगारित कामे करणे भाग पडले आहे. अगदी क्षुल्लक, उरलीसुरली आणि तुटपुंजे उत्पन्न देणारी कामे ते करतात. स्वयंरोजगारित कामगारांमधील सार्वत्रिक स्वरूपाच्या उच्च प्रमाणातील गरिबीतून हे प्रतिबिंबित होते. ग्रामीण भागात २२ टक्के गरिबी आहे आणि शहरी भागांत ती २४ टक्के आहे. हिंदूंमधील ग्रामीण भागांतील गरिबीचे प्रमाण १८ टक्के आणि शहरी भागातील गरिबीचे प्रमाण १३ टक्के आहे. त्या तुलनेत मुस्लिमांमधील हे आकडे उच्चतर आहेत. बौद्धांमध्ये ग्रामीण भागांतील प्रमाण ९ टक्के आणि शहरी भागांतील प्रमाण १७ टक्के आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे, बौद्ध (त्यांच्यापैकी बहुतांश एससी आहेत) लोक रोजंदारीवरच्या आणि अनौपचारिक क्षेत्रातील नियमित वेतनाच्या कामांवर अधिक प्रमाणात अवलंबून राहतात. त्यांच्यामध्ये हंगामी कामगारांचे उच्चतर प्रमाण आहे, यातून ही गोष्ट प्रतिबिंबित होते. इतर सर्व धार्मिक गटांमधील हंगामी कामगारांच्या प्रमाणाच्या तुलनेत हे प्रमाण मोठे आहे. बौद्धांमधील हंगामी कामगारांचे प्रमाण हे ग्रामीण भागांत ५४ टक्के आणि शहरी भागात १९ टक्के आहे. मुस्लिमांशी तुलना करता, मुस्लिमांमधील हंगामी कामगारांचे प्रमाण ग्रामीण भागात ३५ टक्के आणि शहरी भागात १७ टक्के आहे. त्याचप्रमाणे नियमित वेतनाच्या नोकऱ्यांतील बौद्धांचे प्रमाण हे ग्रामीण भागात ८ टक्के आणि शहरी भागांत ६७ टक्के आहे. ग्रामीण आणि शहरी भागांत मुस्लिमांमधील हे प्रमाण अनुक्रमे ९ आणि २६ टक्के आहे. अशा प्रकारे ग्रामीण भागांत मुस्लिमांच्या तुलनेत बौद्ध किरकोळ हंगामी कामांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहतात. शहरी भागांत नियमित वेतनावर काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण बौद्धांमध्ये अधिक आहे. याला अंशतः त्यांच्यासाठी असलेले आरक्षण आणि अंशतः खाजगी अनौपचारिक क्षेत्रातील त्यांचा मोठा वाटा या दोन्ही गोष्टी कारणीभूत आहेत. नियमित वेतनाच्या नोक–यांतील किंवा रोजगारातील मुस्लिमांचा वाटा बौद्धांच्या तुलनेत कमी आहे. खासगी क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये त्यांना भेदभावाला तोंड द्यावे लागते हे यामागचे अगदी साहजिक असलेले कारण आहे. म्हणून मुस्लिमांना आणि बौद्धांना विविध घटकांमुळे उच्चस्तरीय गरिबीला तोंड द्यावे लागते हे स्पष्ट आहे. उत्पन्न मिळवून देणाऱ्या मालमत्ता कमी प्रमाणात उपलब्ध असणे, रोजंदारीच्या कामांवर उच्च प्रमाणात अवलंबून असणे आणि अनौपचारिक खासगी क्षेत्रातील नियमित वेतनाच्या कमी वेतनाच्या नोकऱ्यांवर काम करणे या घटकांचा त्यात समावेश आहे.

इतर काही घटकांसह मुस्लिमांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे उच्च वेतन दिल्या जाणाऱ्या नियमित वेतनाच्या नोकऱ्यांमध्ये मुस्लिमांचाही सहभाग कमी आहे. मुस्लिम आणि बौद्ध यांचा विचार करता, उच्च शिक्षणाची उपलब्धी बौद्धांना मुस्लिमांच्या तुलनेत अधिक प्रमाणात आहे. मात्र यातील विरोधाभास असा आहे की, शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या क्षमता विकसित करून घेतल्यानंतरही उच्चतर वेतनाच्या नोक–यांच्या संधी बौद्धांना उपलब्ध होत नाहीत. बौद्धांमध्ये पूर्वीपासून टिकून असलेल्या बेरोजगारीच्या उच्च दरातून हे प्रतिबिंबित होते. मुस्लिमांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण ६ टक्के आणि हिंदूंमध्ये ते ५ टक्के आहे. त्या तुलनेत बौद्धांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण ७.६ टक्के आहे. वास्तविक, शिकलेल्या तरुणांमध्येच बेरोजगारीचा दर अधिक म्हणजे १२ टक्के आहे. शिकलेल्या हिंदू तरुणांमधील हा दर ८ टक्के आहे. उच्च शिक्षित तरुणांमधील बेरोजगारीचा दर मुस्लिमांमध्येही उच्च आहे. तो सुमारे १३ टक्के आहे. आधी दाखवून दिल्याप्रमाणे बौद्ध आणि मुस्लिम यांच्यातील बेरोजगारीच्या मोठ्या प्रमाणाचे कारण हे खासगी क्षेत्रात नोकऱ्या देताना त्यांच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या भेदभावात आहे.

वर दिलेल्या शोधांचा किंवा निष्कर्षांचा धोरणांतील सहभाग कसा असेल? त्यांचे धोरणांवर काय परिणाम झाले पाहिजेत? मुस्लिमांचा विचार करता त्यांच्या शैक्षणिक पातळ्या वाढवण्यासाठी आणि त्यांच्या स्वयंरोजगारित उद्योगांमधील व व्यवसायांतील त्यांची कामगिरी सुधारण्यासाठी त्यांना मदत करण्यास धोरणात्मक उपाययोजनांची गरज आहे. बौद्धांच्या बाबतीत विचार करता त्यांच्यापैकी बहुतांश लोक एससी आहेत. त्यांच्यामध्ये व्यावसायिक आणि उद्योगविषयक शिक्षणाला प्रोत्साहन दिले पाहिजे. शेतजमिनी आणि खासगी उद्योग किंवा व्यवसाय या स्वरूपातील भांडवली मालमत्तांवरील त्यांच्या मालकीत वाढ केली पाहिजे आणि खासगी क्षेत्रात त्यांना रोजगार मिळावा यासाठी सकारात्मक कृती धोरणे तयार केली पाहिजेत. ●●●

# भाजप सत्तेपासून दूर राहणार!

जगातील सर्वात बलाढ्य लोकशाही राष्ट्र म्हणून नावलौकीक असलेल्या भारतातील लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा सहावा टप्पा पूर्ण झाला आहे. सातव्या टप्प्याचे मतदान १९ मे रोजी पूर्ण होत असून भारताची सत्ता कोणत्या पक्षाकडे जाणार, हे २३ मे रोजी निकालातून उघड होणार आहे.

लोकसभेच्या ५४३ जागांसाठी ८,२५१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. भारताची लोकसंख्या जवळपास १३६ कोटीच्या जवळपास पोहोचली असून ९० कोटी लोक मतदानाच्या अधिकारास पात्र आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत १८ ते १९ वर्षे वयोगटातील १३ कोटी नवमतदार आहेत. एकूण ९० कोटी लोकसंख्येमध्ये पुरूष ४६ कोटी ८० लाख तर महिला मतदार ४३ कोटी २० लाख आहेत. एवढ्या मोठ्या संख्येतील मतदार लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होणार असून आपल्या देशाच्या संसदीय लोकशाहीचे भवितव्य ठरवणार आहेत. जगात भारत हे असे एकमेव राष्ट्र आहे, ज्या देशातील निवडणुकीत लोक एखाद्या उत्सवाप्रमाणे सहभागी होतात. देशातील बलाढ्य नेत्यांच्या विरोधात सर्वसामान्य व्यक्तीही प्रचंड ताकदीने अभिव्यक्ती स्वातंत्र्याची अंमलबजावणी करत आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडत निवडणुका लढवतात. हे भारतीय लोकशाहीच्या महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यांपैकी एक आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील पहिल्या सहा टप्प्यांत ६५.४३ टक्के मतदान झाले असून पहिल्या टप्प्यात प्रथमच ६९.४३ टक्के मतदान झाले आहे. देशातील लोकसभा निवडणुकीत भाजप, काँग्रेस या प्रमुख राष्ट्रीय पक्षांबरोबरच १९ प्रादेशिक पक्षांनी लोकसभा निवडणुकीत प्रामुख्याने सहभाग घेतला आहे. २०१९ ची निवडणूक ही नरेंद्र मोदी विरूद्ध सर्व विरोधी पक्ष अशा स्वरूपाची झाली आहे. २०१४ च्या निवडणुकीत नरेंद्र मोदी आणि भाजपने जी आश्वासने दिली होती, त्या आश्वासनांची पूर्ती न केल्यामुळे विरोधकांनी त्यांच्यावर चौफेर सडकून टीका केली आहे. नोटाबंदीमुळे निर्माण झालेली बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली असून शेतकऱ्यांना योग्य तो हमीभाव देण्याचे सरकारने आश्वासन देऊनदेखील दिलेला नाही. दलित, अल्पसंख्याक, मुस्लिम समूहांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात शोषण झाले असून, त्यांच्यावर सामूहिक अत्याचार झाले आहेत. जीएसटीच्या माध्यमातून सर्वसामान्य व्यापारी देशोधडीला लागला आहे. या सर्व मुद्यांचा काँग्रेससह विरोधी पक्षांनी जोरदार प्रचार केला आहे. नरेंद्र मोदी आणि भाजपने मात्र पुलवामा आणि बालाकोटच्या मुद्यांचे भांडवल करत देशभक्तीला राजकीय मुद्दा बनवला आहे. एवढेच नव्हे तर शहिदांच्या नावाने मत मागण्याचे धाडसही मोदींनी या निवडणुकीत केले आहे. मोदींनीच दिलेल्या १५ लाखांच्या आश्वासनावर चुप्पी साधत बेरोजगारी, नोटाबंदी, मॉब लिंचिंगसारख्या मुद्यांमुळे त्रस्त झालेला मोठा वर्ग भाजपपासून दुरावला आहे. भाजप मोठ्या थाटात ३०० च्यावर जागा मिळणार असल्याचा दावा करत असला तरी जवळवळ ८० जागा भाजपच्या कमी होणार आहेत. त्यांच्या मित्रपक्षांकडूनही या जागा भरून काढल्या जाण्याची सुतराम शक्यता नाही. मोदींच्या नेतृत्त्वाखालील सरकारने मोदींमुळे देश बदलत आहे, विकास होत आहे असे चित्र उभे केले असले तरी वास्तवात मात्र ग्रामीण भारत विशेषतः दलित, मुस्लिम, शेतकरी मोठ्या प्रमाणात मोदींपासून दुरावला आहे. मोदींकडून त्यांच्या अपेक्षांचा भंग झाला आहे. त्यामुळे २०१४ पेक्षा २०१९ ची राजकीय परिस्थिती पूर्णपणे वेगळी असल्याचे दिसून येत आहे. म्हणूनच भाजप काही पोटनिवडणुकांमध्येही पराभूत झाला होता. एवढेचं नव्हे तर भाजपचा जो हिंदी भाषिक प्रदेश होता त्यातही पंजाब, मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ राज्यांतील विधानसभा निवडणुका काँग्रेसने जिंकल्या आहेत. या राज्यांमध्ये प्रचार करताना भाजपने दिलेल्या आश्वासनांची खिल्ली उडवत काँग्रेसने भाजपविरोधात आक्रमक प्रचार करून जनतेची मने जिंकली होती. अगदी नरेंद्र मोदींच्या गुजरातमध्येही काँग्रेसने अत्यंत ताकदीने लढत दिली आहे. देशाच्या काही भागात काँग्रेस आपल्या जागा प्रामुख्याने वाढवत असल्याचा अंदाज आहे. एकूणच काँग्रेसच्या देशभरातील निवडणुकीकडे बारकाईने लक्ष दिल्यास काँग्रेसने केलेल्या आक्रमक प्रचाराचा आणि मोदींविरोधात असलेल्या जनमतांचा विचार करता काँग्रेस जवळपास १२५ ते १५० च्या आसपास जागा मिळवेल असे चित्र दिसत आहे. काँग्रेसला सत्ता मिळवायची असल्यास प्रादेशिक मित्रपक्षांना सोबत घेतल्याशिवाय सत्तेत सहभाग नोंदवता येणार नाही. २०१९ च्या निवडणुकीत प्रादेशिक पक्षांचे विशेष महत्त्व राहणार आहे. ज्यात सपा-बसपा महायुती, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांचा बिजू जनता दल, वायएसआर काँग्रेस, तेलुगू देसम, तेलंगणा राष्ट्रीय समिती, द्रमुक व अण्णाद्रमुक यांची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका या सरकारस्थापनेत असणार आहे. भाजपची मुख्य भिस्त असलेला उत्तर भारत हातातून निसटल्याचे दिसत आहे. गृहमंत्री राजनाथसिंग यांनी तर उत्तरप्रदेशात २५ जागांचे नुकसान होईल याची कबुलीच दिली आहे. यावरूनच ३०० च्यावर जागा जिंकण्याचा भाजपचा दावा संपुष्टात येतो. बिहार, राजस्थान, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांत भाजपच्या जागा घटणार अशी परिस्थिती दिसून येत आहे, तर काँग्रेस महाराष्ट्रातून १० मे १२ जागांच्यापुढे सरकणार नाही. प्रकाश आंबेडकर व ओवेसी यांच्या वंचित आघाडीमुळे दलित, मुस्लिम मतदार काँग्रेससोबत गेला नाही, हे या निवडणुकीत प्रामुख्याने सिद्ध होणार आहे.राष्ट्रीय राजकारणात भाजप १८० ते २०० च्या दरम्यान जागा जिंकूनदेखील सत्ता स्थापन करू शकणार नाही. त्यांचे मित्रपक्ष त्यांना सत्तास्थापनेसाठी मदत करू शकतील, एवढे पुरेसे संख्याबळ त्यांच्याकडे नसेल. काँग्रेस प्रादेशिक मित्रपक्षांना सोबत घेऊन सत्ता स्थापनेत यश मिळवण्याची शक्यता आहे. या यशात अखिलेश यादव, मायावती, ममता बॅनर्जी, के. चंद्रशेखर राव यांची भूमिका महत्त्वाची असणार आहे.

**– प्रतिनिधी**



देशात भारतीय जनता पक्षाचे ३०० च्यावर लोकसभेचे खासदार निवडून येतील व नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होतील. मोदी लाट संपलेली नाही.

**– अमित शहा**



भाजपाने देशाचा विश्वासघात केला असून २०१९ मध्ये भाजप सत्तेत येणार नाही. काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी संसदेत बहुमत सिद्ध करेल.

**– राहुल गांधी**



नरेंद्र मोदी, अमित शहा गुंड असून त्यांनी पश्चिम बंगालमध्ये धुडगूस घातला आहे. पश्चिम बंगालची जनता पूर्ण ताकदीने तृणमुल काँग्रेससोबत असून भाजपला येथे एकही जागा मिळणार नाही.

**– ममता बॅनर्जी**



काँग्रेसने नीट काम न केल्यामुळेच भाजप सत्तेत आली. यावेळी भाजपच्या विरोधात जनमत असून उत्तर प्रदेशात सपा–बसपा आघाडी भाजपचा सफाया करेल. देशात त्रिशंकू लोकसभा असेल.

**– मायावती**



नरेंद्र मोदींनी देशाला व योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशाला विकासापासून दूर ठेवले आहे. सपा–बसपा आघाडी उत्तर प्रदेशात भाजपला उखडून टाकेल. ७० च्यावर जागा सपा–बसपाच्या येतील.

**– अखिलेश यादव**



२०१९ मध्ये भाजप सत्तेत येईल, अशी शक्यता दिसत नाही. देशातील शेतकरी या सरकारच्या पूर्णपणे विरोधात गेला आहे. देशात वेगवेगळ्या राज्यांतील प्रादेशिक पक्षांना सोबत घेऊन सत्ता स्थापन करता येईल, असे वाटते.

**– शरद पवार**



देशात काँग्रेसला सत्ता स्थापन करायची असल्यास आमच्या पक्षाला उपपंतप्रधानपद दिले पाहिजे. त्रिशंकू लोकसभा अस्तित्वात येईल. सरकार स्थापनेत आमचा पक्ष महत्वाची भूमिका बजावेल.

**– के.चंद्रशेखर राव**



भाजप सरकार स्थापन करण्यास अपयशी ठरणार आहे. त्यामुळे सर्व मित्रपक्षांचे मिळून सरकार स्थापन करण्याचा आमचा प्लॅन तयार आहे. आंध्रप्रदेशात भाजपला मूठमाती मिळणार आहे.

**– चंद्राबाबू नायडू**



एमआयएम व तेलंगणा राष्ट्र समिती मिळून लोकसभा निवडणुका लढत असून देशात काँग्रेस व भाजपाचे सरकार येणार नाही. मित्र पक्षाला घेऊनच सरकार स्थापन करावे लागेल.

**– असदुद्दीन ओवेसी**



नरेंद्र मोदींनी देशाला एखाद्या हुकूमशहाप्रमाणे सरकार दिले आहे. काँग्रेसही छुप्या हिंदुत्वाच्या अजेंड्यावर चालत आहे. देशात भाजपा सत्तेत येणार नाही. थर्ड फ्रन्टच्या हातात सत्ता जाईल.

**– ॲड. प्रकाश आंबेडकर**



मोदी आणि अमित शहा ही जोडी भारताच्या राजकीय क्षितिजावरील मोठं संकट असून त्यांचा नायनाट झाला पाहिजे. यावेळी लोकांनी भाजपला मत दिले नाही. त्यामुळे भाजपची सत्ता येणार नाही.

**– राज ठाकरे**



# बुद्ध विचारांनीच जगात क्रांती होईल



यशवंत मनोहर

**सूर्य घरोघरी जात नाही. सूर्य घेऊन किरणे घरोघरी जातात. तसेच बुद्धांचेही आहे. खुद्द बुद्धच घरोघरी जात नाहीत. बौद्ध माणसाचे वागणे बुद्ध होऊन घरोघरी जाते. म्हणूनच बौद्ध म्हणजे उजेड आणि बुद्ध म्हणजे उजेडापुढचा उजेड असे आपण मानतो. हे बुद्धपण जगातील माणसाच्या डोक्यातून प्रकाशित होणे सुरू झाले तर उद्याच्या सूर्योदयापूर्वीच जग क्रांतीमय होऊन जाईल.**

बुद्धांना एडविन अर्नोल्ड यांनी आशियाचा प्रकाश म्हटले. मी बुद्धांना कोणताही किनारा नसलेले उजेडाचे अंतरिक्ष मानतो. पुढे कधीही या अंतरिक्षाचा किनारा निर्माण होणे अशक्यच आहे. बुद्ध नावाची चौकट विहीनता कोणत्याही चौकटीत मावतच नाही. बुद्धांनी संपूर्णच विश्वाला आपले काळीज मानले. हे काळीजच त्यांच्या शब्दात आहे आणि विश्वहिताची अक्षय पौर्णिमा ही त्यांच्या काळजातही आहे. आपण सर्वांनीच या पौर्णिमेची इच्छा समजावून घ्यायला हवी.

बुद्धांना मी उजेडांपुढचा उजेड म्हणतो. जगात उजेडाची तत्त्वज्ञाने आहेत. वैज्ञानिकांना लागणाऱ्या नवनव्या शोधांचा उजेड आहे. क्रांत्यांचा उजेड आहे. बिनकाट्यांच्या सज्जनांचा उजेड आहे. अंधारात भरकटलेल्या वाटांना बाहेर आणणारा मार्गदर्शक उजेड आहे. पण दुनियेतील या सर्वच उजेडांना सम्यक दिशा देणारा एक उजेड जगाजवळ आहे, या उजेडांच्या उजेडाचे नाव बुद्ध हे आहे. अंधाराला उजेड शिकवणाऱ्या आणि उजेडांनाही उजेड शिकवणाऱ्या या बीजउजेडाला दुनिया आता बुद्ध म्हणते.

जगातल्या उजेडांनाही मार्गदर्शन करणारा आणि स्वंयदीप झालेल्यांनाही उजेडाची सतत पुनर्रचना करायला लावणारा नवनवोन्मेषशाली उजेड असे आपण बुद्धाला का म्हणतो, या प्रश्नाचा थोडा विचार करावा असे मला वाटते. जगातल्या सर्वच लोकांनी एक गोष्ट काळजीपूर्वक लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे बौद्ध हा धर्म नव्हे. धर्माच्या व्याख्येत बुद्धाची इहवादी आणि बुद्धिवादी जीवनशैली बसूच शकत नाही. शिवाय लोकायतप्रमाणे बुद्धानेही कुठला धर्म स्थापन केला नाही. माणसांची मने खुली, प्रवाही आणि पुनर्रचनाशील ठेवण्यासाठी बुद्धांनी धर्म ही संस्थाच किंवा ती रचनाच नाकारली.

बदल ही जीवनाची प्रकृतीच आहे. हे बदल माणसांना नवे प्रश्न विचारीत असतात. जुन्या उत्तरांना हे नवे प्रश्न जुमानत नाहीत. म्हणून नवी उत्तरे शोधावी लागतात. विचारांची आणि विचारसणीचीही पुनर्रचना करावी लागते. बुद्धांनाही याची कल्पना आहे आणि चिकित्सा करीत विचाराचे अद्ययावतीकरण करीत राहिले पाहिजे असे बुद्धांचेही म्हणणे आहे. विचाराने काळासोबतच नव्हे तर काळाला सम्यक दिशा देत काळाच्या पुढे चालले पाहिजे असे बुद्धांना वाटते. बुद्ध कधीही मूलतत्त्ववादी होत नाहीत, ते मुक्ततत्त्ववादीच राहतात त्याचे हेच कारण आहे. त्यामुळेच तर आजही आपण त्यांना उजेडापुढचा उजेड किंवा सतत नवनवी पालवी येणारा उजेड म्हणतो.

द्वेष, भ्रम आणि हिंसा याशिवाय धर्म जगाला काहीच देऊ शकत नाहीत, हे माहीत असल्याने बुद्ध स्वतःही धार्मिक नव्हते आणि धार्मिक माणसे निर्माण करणे हा त्यांचा उद्देशही नव्हता. सतत बदलणारी स्वत:ची आणि जीवनाची सतत पुनर्रचना करणारी बुद्धिवादी माणसे निर्माण करणे हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा उद्देश

आहे. समाजक्रांती हेच या तत्त्वज्ञानाचे ध्येय आहे. मानवी मनाची पुनर्रचना केली की बुद्धाचा साम्यवाद (तेश्र.१७- ४४९) शक्य होतो. ही क्रांती अहिंसेच्या मार्गानेच शक्य आहे.

बुद्धाचे तत्त्वज्ञान प्रतीत्यसमुत्पाद, अनित्यता, चिकित्सेची निरंतरता आणि मानवी आयुष्याचे स्वयंदीपत्व या चार मुख्य पंखांनी न थकता आणि न थांबता विश्वभर उडत आहे. प्रतीत्यसमुत्पादात विज्ञानशीलता आणि बुद्धिवाद या गोष्टी येतात. अनित्यतेत परिवर्तनशीलता आणि सतत पुनर्रचनाशीलता या गोष्टी येतात. चिकित्सेत सदसद्‌विवेक म्हणजे सगळी सम्यक आजीविका येते. स्वयंदीपत्वामध्ये संपूर्ण निरामय माणूसपण किंवा स्वयंनिर्भरता यांचा अंतर्भाव होतो. हीच माणूसपणाच्या सौंदर्याची पौर्णिमा असते.

हे नव्या आणि स्वतंत्र माणसाच्या निर्मितीचेच प्रबंधन आहे. माणूस ईश्वरसत्ताक, आत्मासत्ताक, राजसत्ताक, हकूमशहासत्ताक, पुरुषसत्ताक, अंधश्रद्धासत्ताक व असत्यसत्ताक अशा कोणत्याही सत्ताकाचा अंकित नसतो. ही वर्चस्वाच्या निर्मूलनाची आणि माणसाच्या स्वयंदीपत्वाचीच प्रस्थापना असते. म्हणजे स्वतःच्या मुक्त प्रज्ञेची आणि प्रतिभेचीच प्रस्थापना असते. स्वतःच्या सम्यक डोक्याने जगणे हाच मुक्त माणसाच्या अस्तित्वाचा इत्यर्थ असतो. कणा आणि मान ताठ असली की, मानवी स्वातंत्र्यही अजिंक्य ठरते. कोणाला शरण जाऊ नका. (तेश्र.१७- ३७६) ईश्वरच नाही तर भक्ती नाही. आत्मा नाही तर पुनर्जन्म नाही. निर्भय, स्वतंत्र आणि पुनर्रचनाशील माणूस हेच माणुसकीच्या सूर्यपौर्णिमेचे रूप बुद्धांना अभिप्रेत आहे.


विचारांची, ज्ञानाची, सत्याची, मानवी संबंधांची अधिकाधिक उज्ज्वल होत जाणारी रचना ईश्वर, आत्मा अशा भ्रमांशिवायच शक्य आहे. इतर माणसांना तळहातावरील फोडाप्रमाणे किंवा स्वतःच्या काळजाप्रमाणे जपणारा माणूस हाच बुद्धांच्या उजेडाचा अर्थ आहे. म्हणून तर आपण बुद्धांना उजेडांपुढचा उजेड म्हटले आहे.

बुद्ध म्हणजे बुद्धांचे तत्त्वज्ञान! बुद्धांचे ज्ञान म्हणजे बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचे ज्ञान. बुद्ध समजावून घेणे म्हणजे बुद्धांची नास्तिकता समजावून घेणे होय. ईश्वर, परलोक आणि वेद अमान्य करतो त्याला नास्तिक म्हटले जाते. लोकायतही आणि बुद्धही नास्तिक आहेत. बुद्धाचे ज्ञान म्हणजे ज्ञानाचे ज्ञान आणि हे ज्ञान ज्याला होते त्याच्या मनातून अज्ञानाचे, परद्वेषाचे आणि सर्वच श्रेण्यांचे निर्मूलन होते. हे सर्व डोक्यात घेणारा माणूस स्वतंत्र, स्वयंदीप आणि भेदातीत होतो आणि आपल्या नितळ निरामय माणूसपणाच्या थेट उगमाजवळ पोचतो. या क्रांतीचेच नाव बुद्ध हे आहे. ज्यांची बोटे कापली जातात तेही आणि बोटे कापणारे अंगुलीमालही या उजेडाचे बोट धरून आपल्या निरामय माणूसपणाच्या पहाटेपाशी पोचतात. इथून त्यांचे जीवन पूर्ण प्रकाशमयच होऊन जाते. उजेडापुढच्या उजेडाची ही अपूर्वता आहे. अंधार आपोआप नष्ट होत नाही. व्यक्तीला त्यासाठी उजेडात तरी जावे लागते किंवा स्वयंतेज तरी व्हावे लागते. या स्वयंतेजाची कार्यशाळा म्हणजे बुद्ध! विषमता आणि शोषण पवित्र मानले जात होते आणि ज्ञान अज्ञानासारखे वागायला लागले होते. त्यावेळी बुद्धांनी ही ज्ञानाची पुनःस्थापना करणारी आणि सत्याला निर्भय करणारी क्रांती केली. ती बुद्धिवादी, विज्ञानशील आणि सतत पुनर्रचनाशील आहे. शिवाय मनातील भेदसत्ताक पार जवळूनच गेले आहे अशी व्यक्ती जगात कुठेही असली तरी ती बौद्धच असते. तिने दीक्षा घेतली नसेल तिला पंचशील माहीत नसेल पण अशी नितळ वा निरूपाधिक व्यक्ती बौद्धच असते. जगात अशा बौद्धांची वा अशा विस्डमधारकांची संख्या इतर कोणत्याही धर्माच्या लोकांपेक्षा जास्त आहे.

बुद्ध म्हणजे असीम करूणा, असीम समता, असीम भगिनीता आणि बंधूता! आणि बौद्ध म्हणजे पूर्ण स्वतंत्रता, पूर्ण बुद्धता, पूर्ण स्वयंदीपता आणि सर्वहितैषी वैश्विकता! द्वेषाला, विषमतेला, वर्चस्वाला आणि कुणाला लुटण्याच्या इच्छेला मनात थारा देत नाही तो खरा बौद्ध! जो माणूस ईश्वरातीत, धर्मातीत, जात्यतीत आणि लिंगभेदातीत अशा आपल्या मूळ माणूसपणाचा उत्सव झालेला आहे, तोच खरा बौद्ध असतो.

माणसांच्या मनांची आणि समाजाची श्रेणीरचना बदलू नये याची काळजी घेणाऱ्या वर्चस्ववाद्यांनी या इहवादी आणि क्रांतिकारी बुद्धाच्या विरोधात विकृत केलेला अवतारी बुद्ध उभा केला. परदेशातील लोकांनी बुद्धाचा 'धर्म' नेला. क्रांती नेली नाही. बुद्धाचे अंतर्विरोधविहीन इहवादी तत्त्वज्ञान नेले नाही. त्यांच्या पूर्वधर्मातील भ्रमांची अडचण होणार नाही असा 'बुद्धधर्म' नेला. बुद्धाच्या क्रांतीची आग बाजूला सारली गेली आणि उरलेल्या कलेवराला लोकांनी 'बौद्धधर्म' म्हटले. पायाभूत बुद्ध तत्त्वज्ञानाचे आणि त्याच्या निरंतर क्रांतीचे खरे नुकसान इथे झाले.

एहिपस्सिको म्हणजे सम्यकबुद्धीच्या निकषाने सतत चिकित्सा करणे! सर्वच गोष्टींची म्हणजे साहित्याची, जीवनाची, माणसाच्या वर्तनाची आणि नैतिक मूल्यांचीही चिकित्सा ती असते. बौद्ध माणूस फक्त स्वतःच्या सदसद्‌विवेकाचाच निर्णय प्रमाण मानतो. चिकित्सेच्या आगीतून सहीसलामत बाहेर पडेल तेवढेच स्वीकारतो. कोणीही काहीही म्हटले तरी संमतीची मान हलवतोच तो बौद्ध माणूस नव्हे. बौद्ध माणूस सदसद्‌विवेकालाच आपले प्रमाणशास्त्र मानतो. याचा अर्थ तो विज्ञानप्रक्रियेचेच अनुसरण करतो. अनुसरण म्हणजे चिकित्सापूर्ण स्वीकार! विज्ञान म्हणजे नवनवोन्मेषमयता! विज्ञान म्हणजे प्रतीत्ययमुत्पाद आणि विज्ञान म्हणजे सतत प्रयोगशीलता! विज्ञान म्हणजे नवनव्या उजेडांची चिकित्सा आणि नवनव्या उजेडांच्या भेटी! विज्ञान म्हणजे थांबा नसलेला प्रवास! विज्ञान म्हणजे सम्यक आजीविका! विज्ञान म्हणजे अणूंना आलेला सकल प्राणीमात्रांचा फुलवरा! माणूस मूलतःच आणि प्रकृतितःच विवेकशील असतो, असे मानते ते विज्ञान! याचा अर्थ बुद्ध म्हणजे विज्ञान! म्हणून बुद्ध ही संकल्पना विज्ञान या अर्थानेच वापरली जाते. विज्ञानाचे अनुसरण म्हणजे अभेदसरणता! सम्यकसरणता! बुद्ध म्हणजे मूर निरामय माणसांचे साम्यवादी माणूसपण! या साम्यवादी माणूसपणाकडे माणसांना घेऊन जाणारी अजिंक्य प्रकाशाची वाट म्हणजे बुद्ध! माणसाला




उजेडापुढच्या उजेडाचे नागरिक करते त्या विज्ञानाचेच नाव बुद्ध आहे. सिद्धार्थ विज्ञान झाला आणि लोकांनी म्हटले सिद्धार्थ बुद्ध झाले! बुद्ध असे आहेत. त्यांच्यात कोणतीही गूढता नाही. चमत्कार नाही. कोणतीही अंधश्रद्धा नाही. कोणालाही निर्दयपणे तपासून घ्यायला सांगणारे ते कलदार तत्त्वज्ञान आहे. आदीअंती केवळ करूणा, केवळ सज्जनपणा आणि केवळ विश्वासार्हता असा हा नितळ प्रकल्प आहे. अंगुलीमालपणाचे विसर्जन करणारा कोणताही अंगुलीमाल बौद्ध होऊ शकतो. कोणाचाही लाजीम आणि कोणापुढेही लाचार होत नाही, त्या माणसाला बौद्ध म्हणावे. कण्याचे आणि निष्ठांचे पोलाद करू शकतो तो माणूस बौद्ध असतो. निष्ठा कुणाकडे गहाण टाकत नाही वा कोणाला विकत नाही आणि निष्ठा एवढाच आपल्या जगण्याचा अर्थ आहे असे मानतो त्या माणसाला आपण बौद्ध मानतो.

जो माणूस बौद्ध असतो तो नव्या प्रश्नांवर मात करण्यासाठी जुनी कालबाह्य उत्तरे वापरीत नाही. नवी जिवंत आणि सर्जनशील उत्तरे शोधतो. नव्या प्रश्नांना नवी उत्तरे हवी असतात. कारण नवी व्हिजनरी उत्तरे नवे प्रश्नही निर्माण करतात. बौद्ध माणूस नवनवी स्पष्टीकरणे, नवनवी क्षितिजे निर्माण करतो. आपले डोके नवनव्या स्थितीत नवनव्याने उगवत ठेवतो. विचाराला, मनाला, प्रज्ञेला, प्रतिभेला आणि जिज्ञासेला कुठे बांध घालत नाही. नवनव्याने सतत जन्माला येण्यालाच बौद्ध माणूस आपले जगणे मानतो.

विषमता, शोषण, देवदैववाद आणि मूठभरांचे वर्चस्व कायम ठेऊ इच्छिणाऱ्यांनी बुद्धाच्या क्रांतिप्रबंधाला धर्म केले. धर्माच्या विरोधात उफाळलेल्या धर्मातीत विज्ञानाला त्यांनी धर्म केले. एखाद्या तत्त्वज्ञानाला क्रांतीपासून तोडले की परिवर्तनाची हत्या सहजच करता येते आणि दीर्घकाळासाठी समाजाला गोठवून ठेवता येते. क्रांतिकारी तत्त्वज्ञानांना निकामी करण्यासाठी उत्सवांचा उपयोग केला जातो. महानायकांचे नामगजर क्रांतीची तत्त्वज्ञाने धुक्यात ढकलण्याचे काम करतात. समाजाची अवस्था गॅस संपलेल्या सिलेंडरसारखी होते. असे दिसते की, जगाने 'बुद्धधर्म' नेला, क्रांतीबुद्ध नेला नाही. डॉ. बाबासाहेबांना बुद्धाचे क्रांतिरूप हवे होते आणि जागतिक बुद्धधर्मियांचा विरोध पत्करूनही डॉ. बाबासाहेबांनी या क्रांतिबुद्धाची पुनर्रचना केली. ही पुनर्रचनाही आता विज्ञानाप्रमाणे कोणताही थांबा मानत नाही.

बौद्ध हे माणसाच्या वैज्ञानिक वागण्याचे नाव आहे. ते माणुसकीच्या आविष्काराचे सौंदर्य आहे. बौद्धत्व ही माणूस होण्याच्या घडणीची गोष्ट आहे. बौद्धत्व हे नितळ माणूसपणाचेच भाषांतर आहे. बौद्ध कपड्यांचे, कोणत्याही पूजेचे, परावलंबित्वाचे वा अंधाराचे नाव नव्हे. बौद्धत्व ही नवनवा प्रकाश निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. बौद्ध हे कोणत्याही कर्मकांडाचे नाव नव्हे. बौद्धत्व हे बुद्धाला निरंतर येणाऱ्या नवनव्या मोहोराचे नाव आहे. कारण झाडातून फुले तशी बौद्ध माणसाच्या वागण्यातून प्रतित्यसमुत्पाद आणि अनत्ता, विज्ञान आणि प्रज्ञान ही नक्षत्रे फुलत असतात. बौद्ध माणसाच्या मनाच्या क्षितिजात बुद्ध उगवतो आणि त्याच्या वागण्यातून प्रकाशित होतो.

सूर्य घरोघरी जात नाही. सूर्य घेऊन किरणे घरोघरी जातात. तसेच बुद्धांचेही आहे. खुद्द बुद्धच घरोघरी जात नाहीत. बौद्ध माणसाचे वागणे बुद्ध होऊन घरोघरी जाते. म्हणूनच बौद्ध म्हणजे उजेड आणि बुद्ध म्हणजे उजेडापुढचा उजेड असे आपण मानतो. हे बुद्धपण जगातील माणसाच्या डोक्यातून प्रकाशित होणे सुरू झाले तर उद्याच्या सूर्योदयापूर्वीच जग क्रांतीमय होऊन जाईल. ●●●



# तथागत गौतम बुद्धांच्या विविध भावमुद्रा

**धम्मचक्र मुद्रा :** या मुद्रेला धम्मचक्र ज्ञान याचे संकेत देणारे चिन्ह म्हणूनही ओळखले जाते. हा बुद्धांच्या जीवनातील सर्वात महत्वाच्या क्षणांपैकी एक आहे. त्यांनी या मुद्रेचे प्रदर्शन सर्वप्रथम ज्ञानप्राप्तीनंतर सारनाथ येथील त्यांच्या पहिल्या धर्मोपदेशात केले होते. या मुद्रेत दोन्ही हातांना छातीसमोर ठेवून डाव्या हातांचा पृष्ठभाग आतल्या बाजूने तर उजव्या हाताचा पृष्ठभाग बाहेरील बाजूने ठेवण्यात येतो.



**ध्यान मुद्रा :** या मुद्रेला समाधी किंवा योग्य मुद्रा म्हणून ओळखले जाते. ही मुद्रा बुद्ध शाक्यमुनी, ज्ञानी बुद्ध अमिताभ आणि चिकित्सक बुद्ध इत्यादी बौद्धांच्या गुणधर्मांना दर्शवते. या मुद्रेत उजवा हात डाव्या हातावर पूर्णपणे बोट उघडून मांडीवर ठेवण्यात येतो.



**भूमिस्पर्श मुद्रा :** या मुद्रेला पृथ्वीला स्पर्श करणे असेदेखील म्हणतात, जी बुद्धांच्या ज्ञानप्राप्तीला दर्शवते. कारण बुद्ध म्हणायचे की, पृथ्वी त्यांच्या ज्ञानाची साक्षी आहे. या मुद्रेत उजवा हात उजव्या गुडघ्यावर ठेऊन तळहात आतल्या बाजुला ठेऊन त्याला जमिनीच्या दिशेने नेण्यात येते.



**वरद मुद्रा :** ही मुद्रा अर्पण, स्वागत, ज्ञान, दया आणि प्रामाणिकपणा दर्शवते. या मुद्रेत डावा हात पूर्णपणे उघडून तळहात बाहेरील बाजूने असतो तर उजवा हात हा शरीरासोबत नैसर्गिकरित्या ठेवण्यात येतो.



**करण मुद्रा :** ही मुद्रा वाईटापासून वाचविण्याचे सूचित करते. या मुद्रेत तर्जनी आणि करंगळी वर उचलून इतर बोटांना मोडले जाते. ही कर्त्याला श्वास सोडून रोग अथवा नकारात्मक विचारांपासून बाहेर निघण्यास मदत करते.



**वज्र मुद्रा :** ही मुद्रा पंचतत्व म्हणजेच वायू, जल, अग्नी, पृथ्वी आणि धातू यांना दर्शवते. या मुद्रेत उजव्या हाताची मूठ करून त्यात डाव्या हाताच्या तर्जनीला वरील दिशेने अशा प्रकारे ठेवले जाते की, उजव्या हाताची तर्जनी तिला स्पर्श करू शकेल.



**वितर्क मुद्रा :** ही मुद्रा बुद्धांच्या शिक्षेचा प्रचार आणि परिचर्चेचं प्रतीक आहे. या मुद्रेत अंगठा आणि तर्जनीच्या वरील भागाला जोडले जाते आणि इतर बोटांना सरळ ठेवले जाते.



**अभय मुद्रा :** ही मुद्रा निर्भयता अथवा आशीर्वादाचे प्रतीक आहे, जी सुरक्षा, शांती, परोपकार आणि भय दूर करणे यांचं प्रतिनिधीत्व करते. या मुद्रेत उजव्या हाताला खांद्यापर्यंत उचलून बाहूला दुमडून हाताच्या बोटांना वर उचलले जाते.



**उत्तरबोधी मुद्रा :** ही मुद्रा दिव्य सार्वभौमिक ऊर्जे सोबत स्वतःला जोडून सर्वोच्च आत्मज्ञानाची प्राप्ती दर्शवते. या मुद्रेत दोन्ही हात हृदयाजवळ ठेऊन दोन्ही हातांच्या तर्जनी एकमेकांना स्पर्श करत वरच्या दिशेने असतात. तर इतर बोटं ही आतल्या बाजुने मोडलेली असतात.



**अंजली मुद्रा :** याला नमस्कार मुद्रा किंवा हृदयांजली मुद्रादेखील म्हणतात, जी अभिवादन, प्रार्थना आणि आराधना दर्शवते. या मुद्रेत दोन्ही हात पोटाच्यावर मोडलेल्या स्थितीत असतात. तळहात हे एकमेकांना जोडलेले असून दोन्ही हातांची बोटे एकमेकांना स्पर्श करत असतात.

# शाळांमधील २५ टक्के आरक्षणापासून खरी वंचित मुले दूर

विजया मालती हरी



शिक्षणहक्क कायद्यांतर्गत खऱ्या वंचित मुलां
चालढकल करतात. या प्रवेशापोटी देय अस
देत नाही. संस्थाचालक आणि सरकार यांच्य
शिक्षणापासून वंचित राहतात. नुकत्याच केले
टक्के आरक्षणापासून खरी वंचित मुले आज
त्यामुळे शिक्षणहक्क कायद्याची काटेकोर अं

भारताच्या संविधानाने स्वातंत्र्य, समानता आणि सन्मानाने जीवन जगण्याच्या अधिकाराचा भाग म्हणून शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार दिला आहे. महिला आणि मुलांसाठी विशेष तरतूद करण्यासाठी शासनाला कुणी रोखू शकणार नाही याची ग्वाही देखील दिली आहे (१५/३). शिवाय मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ६ वर्षांच्या आतील मुलांचे संगोपन व शिक्षण यांवर तरतूद करावी (४५) असे नमूद केले आहे. मूलभूत कर्तव्यांमध्ये पुढील गोष्टी येतात : सर्व जाती-धर्म-वर्ग यांमध्ये सलोखा व स्त्रियांची प्रतिष्ठा राखणे, संमिश्र संस्कृतीचे जतन करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक वृत्ती व मानवतावाद यांचा विकास करणे, पालकांनी ६-१४ वयोगटातील मुलांना शिक्षणाची संधी द्यावी आदी (५१ ए).

या पार्श्वभूमीवर ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्याचा (ठढए) विचार करायला हवा. यामध्ये मोफत शिक्षण हे मुलांसाठी व सक्ती ही सरकारवर आहे. समानतेचे एक पाऊल पुढे टाकणाऱ्या या कायद्याने १२(१) सी खाली वंचित व दुर्बल गटांतील बालकांना विनाअनुदानित, एक-दीड लाख फी घेणाऱ्या उच्चभ्रू व सर्व सुविधांनीयुक्त खाजगी शाळांमध्ये मोफत शिक्षणाचा हक्क दिला. मात्र अंमलबजावणी सुरू होऊन सात वर्षे झाली तरी महाराष्ट्रात आजही सदर आरक्षणांतर्गत शाळा प्रवेशाच्या प्रश्नावर गोंधळ चालू आहे. यासाठी भरीव आर्थिक तरतुदीचीदेखील तितकीच आवश्यकता आहे.

या कायद्याची अंमलबजावणी, त्यातील त्रुटी, शाळांची आणि पालकांची भूमिका यासंदर्भात 'द युनिक फाउंडेशन' या संस्थेने फील्डवर्कद्वारे एक अभ्यास नुकताच संपवला.

महाराष्ट्रात या २५ टक्क्यांची विभागणी करून १५ टक्के जागा या सामाजिकदृष्ट्या वंचित समूहांसाठी ठेवल्या आहेत. या वंचित गटांतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनाथ व दिव्यांग बालके, विमुक्त जातींमधील सर्व प्रकारच्या भटक्या जमाती, इतर मागास वर्ग (जइउ), विशेष मागास प्रवर्ग (स्पेशल बॅकवर्ड क्लास), सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (डएइउ), तसेच एच.आय.व्ही. बाधित/प्रभावित व दिव्यांग बालकेदेखील प्रवेशास पात्र आहेत. दुर्बल गटांतर्गत कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. एक लाखापर्यंत असणाऱ्या खुल्या प्रवार्गासह धार्मिक अल्पसंख्याक (मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, पारसी, जैन व शीख) बालके हीदेखील या प्रवेशासाठी पात्र आहेत.

महाराष्ट्रात गेल्या वर्षी ८,९७६ शाळांमध्ये एकूण १,२६,११७ जागा होत्या. यासाठी १,९९,०५९ अर्ज आले व त्यापैकी १,१४,०५६ अर्जांची निवड झाली; परंतु त्यापैकी प्रत्यक्षात फक्त ७४,२५६ प्रवेश झाले. याचा अर्थ ५१,८६१ म्हणजेच ४२ टक्के मुलांचे प्रवेश झालेले नाहीत. राज्यात चालू घडीला (म्हणजे २०१९-२० वर्षात) ९,१९५ शाळांमध्ये एकूण १,१६,७७९ जागा आहेत. शाळा वाढल्यावर जागा कमी का होतात. विशेषतः आदिवासी भागात ही तफावत जास्त दिसते, म्हणजे यात नक्कीच काहीतरी गडबड आहे. याविषयी सविस्तर जिल्हावार सांख्यिकी माहिती सोबत जोडली आहे.

अशी कल्पना होती की, हा कायदा आल्यावर शाळाबाह्य




ना प्रवेश द्यायला अनेक संस्थाचालक
लेली रक्कम सरकार शाळांना वेळेत
यातील या बेपर्वाई वृत्तीमुळे गरजू मुले
ल्या एका अभ्यासानुसार शाळांमधील २५
नही दूर असल्याचे आढळून आले आहे.
मलबजावणी करण्याची गरज आहे.

मुले शाळेच्या दायऱ्यात येतील आणि या आरक्षणाच्या परिणामी आणखी काही मुले शिकती होतील. या साऱ्याच्या परिणामी शासनाचा शिक्षणावरचा खर्च वाढेल; परंतु चित्र उलटेच दिसू लागले आहे. अर्थसंकल्पात शिक्षणावरील खर्च कमी कमी होत चाललाय, परिणामी कमी पटाचे कारण दाखवून शाळा बंद करणे, पूर्व-प्राथमिकला खर्च नाकारणे असा शिक्षण हक्काच्या विरोधात आणि म्हणून या कायद्याच्याही विरोधात व्यवहार वाढत चालला आहे.

**प्रत्यक्ष अनुभव** : २०१३ पासून शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शाळा प्रवेश अंमलबजावणी सुरू आहे. सुरुवातीला प्रत्यक्ष अर्ज भरून प्रवेश दिले जायचे; परंतु एवढ्या अर्जांची छाननी करणे आणि किती प्रवेश झालेत किंवा किती जागा रिक्त आहेत हे फक्त सरकारी यंत्रणेलाच माहीत असायचे. त्यामुळे काही संघटना/व्यक्तिंनी कलेल्या मागणीनुसार २०१४-१५ पासून ऑनलाईन प्रवेश सुरू झाले. त्यातून किती अर्ज आले व प्रवेश झाले हे कळायला मदत झाली; परंतु प्रत्यक्ष प्रवेश वाढण्यात फार कमीच फरक पडला, असे म्हणावे लागेल.

**अंमलबजावणीतील त्रुटी आणि रिक्त जागांचा प्रश्न** : अभ्यासात असे आढळून आले आहे की, खऱ्या अर्थी वंचित व दुर्बल गटांतील बालकांपर्यंत कायद्यातील शाळा प्रवेशाच्या २५ टक्के आरक्षणाची ही तरतूद पोचू शकलेली नाही. महाराष्ट्रात गेल्या वर्षी ८,९७६ शाळांमध्ये एकूण १,२६,११७ जागा होत्या. यासाठी १,९९,०५९ अर्ज आले व त्यापैकी १,१४,०५६ अर्जांची निवड झाली; परंतु त्यापैकी फक्त ७४,२५६ प्रवेश झाले. याचा अर्थ ५१,८६१ म्हणजेच ४२ टक्के मुलांचे प्रवेश झालेले नाहीत.

त्यातही वंचित समूह ज्या जिल्ह्यात किंवा क्षेत्रात राहातो तिथेही हे प्रवेश कमी झाल्याचे दिसतात. उदा. ठाणे, पालघर, नंदूरबार सारखे जिल्हे. या तीन जिल्ह्यांत गेल्या वर्षासाठी (२०१८-१९) अनुक्रमे एकूण १६,५९४; ३,७०२ व ४७९ इतक्या जागा होत्या. त्यासाठी अनुक्रमे एकूण ५,७७७; ५३६ व १३७ प्रवेश झाले. चालू वर्षासाठीचे (२०१९-२०) प्रवेश बघितले तरी हे दिसून येईल. ठाणे, पालघर व नंदूरबार जिल्ह्यांत अनुक्रमे १३,४००; ४२५२ व ४७० एकूण जागांपैकी पहिल्या फेरीत अनुक्रमे ३८३६, २९४ व ७८ प्रवेश झालेले आहेत. प्रवेश झालेल्या मुलांना गणवेष-बूट, पाठ्यपुस्तके-वह्या व शालेय साहित्य यासाठी खर्च येतो आहे. शिवाय काही शाळा जेवणाची रक्कम मुलांकडून घेतात. ३ कि.मी. वा लांबून येणाऱ्या मुलांना जाण्या-येण्याचा गाडीखर्च करावा लागतो. असा सगळा मिळून उच्चभ्रू शाळांसाठी वंचित घटकातील पालकांना अंदाजे एकूण २० ते ४० हजार रुपये खर्च येतो. पालक यासाठी सावकाराकडून कर्ज काढत असल्याचे कळले. सरकारच्या परताव्यामध्ये गणवेष व पाठ्यपुस्तके अंतर्भूत असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले; परंतु शाळा म्हणतात आम्हाला हा खर्च मिळत नाही.

कायद्याने २५ टक्के आरक्षणात प्रवेश घेतलेल्या व इतर उच्चभ्रू मुले अशा सर्वांनाच वर्गात एक समान वागणूक व सर्व उपक्रमात-स्पर्धांमध्ये भाग घ्यायला मिळावा. तसेच सर्व मुलांमध्ये असलेल्या चिकित्सक व शोधक वृत्तीला वाव दिला जाईल आणि बालककेंद्री, गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाईल, अशी ग्वाही कायद्याने दिली आहे. त्या आधारे मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तयार व्हावा असे म्हटले आहे. हे तपासायला शाळांनी त्यांचे वर्ग चालू असताना संशोधनाची परवानगी द्यायला हवी. काही वागणुकीच्या तक्रारींबद्दल पालकांशी संवाद झाले, त्याचे मिश्र अनुभव आहेत. आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या मुलांना वेगळी, असमान वागणूक मिळते अशी उदाहरणे समोर आली आहेत.

**काही निवडक सूचना** :

१) कायद्याशी विसंगत व न्यायालयाच्या निर्णयाविरोधात प्रशासन परिपत्रके काढते आहे, ते निर्णय लगेच मागे घ्यावेत. उदा. पूर्व-प्राथमिकला प्रतिपूर्ती दिली जाणार नाही, प्रवेश स्तर शाळांनी ठरवावेत, वाहन खर्च दिला जाणार नाही आदी.

२) सरकारने त्वरित प्रत्येक मुलाच्या खर्चाची प्रतिपूर्ती शाळांना करावी. तसेच प्रत्येक मुलाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीतील फी आणि फीव्यतिरिक्तची 'जादा खर्चाची रक्कम' (जेवण, पुस्तके, बॅग आणि

इतर उपक्रम) या दोन्ही रकमा स्पष्ट ठरवाव्यात. फी शाळेला अदा करावी व जादा खर्चाची रक्कम मुलांच्या खात्यावर टाकावी.

३) प्रवेश प्रक्रिया १ जानेवारीला सुरू करून ती १५ मार्चपर्यंत संपवावी. म्हणजे केंद्रीय बोर्डाच्या शाळा १ एप्रिलला सुरू होतात व अशा शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या वंचित घटकातील मुलांचा अभ्यास एक-दीड महिने बुडतो. १५ मार्चपर्यंत प्रवेश संपवले तर तो बुडणार नाही.

४) या तरतुदीचा प्रसार निरक्षर व सर्वार्थाने वंचितांपर्यंत झाला नाही. ऑनलाईन माहिती व निर्णय अपलोड करून प्रशासन आपला भार कमी करते आहे. तसे न करता प्रत्यक्ष आदिवासी पाड्यांवर, वाड्या-वस्त्यांवर जाऊन, फिरत्या रिक्षा-आकाशवाणी-टीवी यांवर तोंडी जाहिरात करून प्रचार करायला हवा. त्यासाठी शिक्षक व महाविद्यालयांची मदत घेणे आवश्यक आहे. शाळा-शाळांवर फोटोसहीत मोठे बॅनर व होर्डिंग्ज लावायला हवेत. काही शाळांमध्ये एकही जागा भरली जात नाही, त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरायला हवे.

५) फक्त ऑनलाईन प्रवेशावर विसंबून न राहता, प्रत्यक्ष अर्ज भरण्याची सुविधा मदत केंद्रावर ठेवायला हवी.

६) मदत केंद्रांची संख्याही वाढवून ती आरटीईखाली येणाऱ्या शाळांमध्ये ठेवावी व तिथे सरकारने सक्षम व्यक्तिची नेमणूक करावी.

७) तसेच आदिवासी वा भटक्या विमुक्त समाज घटकांतील मुलांची जिल्ह्याच्या वा तालुक्याच्या जागी राहाण्या-जेवण्याची सोय करायला हवी. एक वेळेला उपाशी राहाणारा, कुपोषणाने ग्रस्त समाज आपल्या लहानग्यांना उपाशीपोटी शाळा शिकायला कसा बरे पाठवेल?

८) माहितीसाठी व तक्रारीसाठी दोन स्वतंत्र हेल्पलाईन्सची सोय करावी.

**नियमांमधील गडबड आणि धोरणात्मक गंभीर बाबी** : कलम १२(२) हे २५ टक्के मुलांच्या खर्चाच्या भरपाईबद्दलचे आहे. या भरपाईबाबत शासनाच्या मूळ कलमात असे म्हटले आहे की,

''सरकार प्रत्येक मुलामागे झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती (शासन/शाळा यांपैकी कमी असेल त्या दराने) करेल. मात्र अशा शाळांनी मोफत किंवा सवलतीच्या किमतीत मिळालेल्या जमीन, इमारत इत्यादीपोटी जर विशिष्ट मुलांच्या संख्येला मोफत शिक्षण देण्याचे बंधन घालून घेतले असेल, तर अशा मुलांच्या (ठरलेली संख्या) खर्चाची भरपाई शाळेला मागता येणार नाही.''

विखे पाटील प्रकरणात ऑगस्ट २०१५ ला दिलेल्या निकालातदेखील न्यायालयाने या महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधले असून शाळांची यासह सर्व माहिती पोर्टलवर टाकण्याचे आदेश दिले आहेत. परंतु या तरतुदीबाबतचा कोठेही नियम नाही किंवा पोर्टलवरदेखील याबाबतची माहिती नाही. याचा अर्थ वंचित/दुर्बल घटकातील जास्त मुले येऊ शकतात. अशा मुलांना प्रवेश दिले गेले नसतील, तर वंचित/दुर्बल घटकातील मुलांना याच्या बॅकलॉगसह प्रवेश मिळावेत. त्यामुळे सरकारने याबाबतीत गंभीरपणे याचा विचार करून ताबडतोब पावले उचलावीत.

१) खऱ्या गरजूंना लाभ होण्यासाठी आंध्र प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रानेही २५ टक्के आरक्षणाअंतर्गत प्रत्येक समाज घटकनिहाय म्हणजे वेगवेगळी टक्केवारी विभागून असे आरक्षण द्यावे. महाराष्ट्रातही अशी तरतूद झाल्यास, पिढ्यान्‌पिढ्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाला पुढारलेल्या समाजासोबत येण्याची संधी खऱ्या अर्थाने मिळेल.

(आंध्र प्रदेश सरकारने आरटीईअंतर्गत २५ टक्के प्रवेशांमध्ये अनाथ, एड्सग्रस्त व अपंग विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के, एससीच्या विद्यार्थ्यांसाठी १० टक्के व एसटीच्या विद्यार्थ्यांसाठी ४ टक्के आरक्षण ठेवले आहे. तर अन्य दुर्बल व मागास घटकांसाठी सहा टक्के आरक्षण दिले आहे. कर्नाटकमध्ये तर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी ७.५ टक्के, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी दीड टक्का, वंचित विद्यार्थी, मागास व दुर्बल घटकांसाठी १६ टक्के आरक्षण ठेवले आहे.)

२) शाळांनी इमारत, जागा इत्यादी गोष्टी मोफत/सवलतीच्या दरात मिळवल्या असतील व त्यासाठी काही मुलांना मोफत शिक्षण देण्याचे बंधन घालून घेतले असेल, तर त्याशिवाय २५ टक्के जागा वंचित व दुर्बल गटांतील मुलांना मिळाव्यात. राज्य शासनाने अशी सर्व माहिती शाळांनी पोर्टलवर टाकण्याबाबत व मुलांची वाढीव संख्या यांसाठीचे परिपत्रक त्वरित पोर्टलवर टाकण्याबाबत सूचना द्याव्यात. तसेच शाळेने मोफत सुविधांपोटी आजपर्यंत किती जणांना मोफत शिक्षण दिले याची माहिती द्यावी व न दिलेल्या या संख्येचा बॅकलॉगही भरावा. येत्या वर्षभरात त्याविषयीचा नियमही आरटीई नियमावलीमध्ये समाविष्ट करावा.

३) सर्व गोष्टी कायद्यानुसार होत आहेत ना यावर राज्य बाल संरक्षण आयोगाने (डउझउठ) लक्ष ठेवावे. त्यासाठी या आयोगावर सक्षम अधिकारी आणि त्याला पुरेसा निधी दिला जावा.

४) अर्थसंकल्पात पूर्व-प्राथमिकसह २५ टक्के प्रवेशासाठी वेगळी तरतूद करावी. ती तरतूद करताना येत्या वर्षांमध्ये शाळांची व मुलांची वाढणारी संख्या व त्यानुसार होणारे प्रवेश लक्षात घेऊन ती तरतूद दरवर्षी वाढवावी.

५) खरे तर कोठारी आयोगाने केलेल्या सूचनेनुसार सर्वांसाठी सामायिक शाळा काढाव्यात व राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नाच्या किमान ६ टक्के खर्च किंवा आवश्यक तितका खर्च शिक्षणावर करावा.

संविधानाने दिलेली समानता व सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार प्रत्यक्षात येण्यासाठी आणि भारतातील जातीयतेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सामायिक शाळांची व शिक्षणावर जास्तीत जास्त गुंतवणूक करण्याची गरज आहे. विविध देशांनी जेव्हा १०-१२ टक्के गुंतवणूक शिक्षणावर केली तेव्हाच त्यांची प्रगती झालेली पाहावयास मिळते. त्यामुळे देशाला प्रगती पथावर नेण्यासाठी अशी भरीव गुंतवणुकीची गरज आहे. शिक्षणातील समानता ही आर्थिक-सामाजिक समतेचे पाऊल या दृष्टीने या कायद्याकडे पाहाणे, उच्चभ्रू शाळा चालकांची मानसिकता बदलणे महत्त्वाचे वाटते. ●●●


# ‘पाणीवाले बाबा’ डॉ. राजेंद्र सिंग

प्रतिनिधी

न केलेल्या कामाचा प्रचार करण्यात नरेंद्र मोदी पटाईत आहेत. गंगा नदी विकास कामांबाबत दिलेले आश्वासन न पाळून त्यांनी देशातील जनतेची विशेषतः गंगा नदी स्वच्छतेसाठी काम करणाऱ्या पर्यावरणवाद्यांची फसवणूक केली आहे, असा आरोप भारताचे जलपुरूष,जलसंवर्धक आणि पर्यावरणवादी डॉ. राजेंद्र सिंग करतात. भूगर्भातील जलसाठा वाढवून लोकांमध्ये जलसंवर्धन आणि पाण्याच्या वापराबाबत जनजागृती केल्याबद्दल मॅगसेसे पुरस्कार (२००१) आणि स्टॉकहोम वॉटर प्राईज (२०१५) हे दोन अत्यंत प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळवलेले डॉ. राजेंद्र सिंग यांनी लोकसभा निवडणुका जाहीर होण्याच्या काही दिवस अगोदर 'द वायर' या न्यूज वेबसाईटला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत त्यांनी, मोदी सरकारने गंगा नदी स्वच्छतेबाबत भ्रमनिराश केल्याचे सांगितले होते. डॉ. सिंग म्हणाले होते की, पंतप्रधानपदी येण्याआधी वाराणसी येथे जाऊन, ‘‘गंगाने मुझे बुलाया है, मै गंगा का बेटा हूँ, मुझे गंगासे कुछ नही चाहिये, मुझेही गंगा को देना है’’ असं मोदी म्हणाले होते; परंतु पंतप्रधान झाल्यानंतर गंगा नदी प्रदूषणमुक्त करण्याबाबत दिलेल्या आश्वासनाचा त्यांना विसर पडला.

पाणी हेच माझे जीवन, माझं सुख आणि माझा शिक्षक असं अभिमानाने सांगणारे डॉ.राजेंद्र सिंग यांनी आपलं संपूर्ण आयुष्य सामाजिक कार्यासाठी वाहून घेतलं आहे. जलक्रांतीने समाज संपन्न व्हावा या उदात्त हेतूने सुखासिन जीवनाचा त्याग करुन ते जमिनीतील जलसाठा वाढवण्याच्या दृष्टीने विविध प्रकल्प राबवण्याबरोबरच लोकांना जलसाक्षर करण्याचे काम नेटाने करीत आहेत. भरपूर पाणी, सुबत्ता आणि चांगलं जीवन अशा ठिकाणी ते वाढले; परंतु पाण्याअभावी वाळवंट बनलेल्या राजस्थानातील लोकांच्या जीवनाची कथा ऐकून व्यथित झालेल्या या ‘पाणीवाल्या बाबा’ने नोकरीला लाथ मारून त्या लोकांच्या जीवनात हिरवळ आणण्याचे काम केले. राजस्थानातील एक हजाराहून अधिक गावांमध्ये ८ हजार मातीचे बंधारे त्यांनी बांधले. यामुळे या राज्यातील ९ जिल्हे सुजलाम सुफलाम झाले.

उत्तर प्रदेशातील बागपत जिल्ह्यात दौला गावी एका जमीनदाराच्या कुटुंबात डॉ.राजेंद्र सिंग यांचा जन्म झाला. वयाच्या १५ व्या वर्षी म्हणजे १९७४ मध्ये ते हायस्कूलला असताना त्यांच्या आयुष्यातील एक महत्वाची घटना घडली. गांधी पीस फाऊंडेशनचे एक सदस्य रमेश शर्मा यांनी त्यांच्या मेरठ गावातील



घरी भेट दिली होती. ग्रामस्वच्छता मोहीम राबविणे, वाचनालय सुरु करणे आणि स्थानिक तंटे सोडविणे हा शर्मा यांच्या या दौऱ्याचा हेतू होता. यामुळे गावाच्या विकासाचे चक्र डॉ. राजेंद्र सिंग यांच्या डोक्यात सुरू झाले. त्यानंतर लवकरच शर्मा यांनी राजेंद्र सिंग यांना दारूमुक्ती कार्यक्रमात सहभागी करुन घेतले. त्यांचे इंग्रजीचे शिक्षक प्रताप सिंग यांनी एकदा वर्ग सुटल्यावर विद्यार्थ्यांशी राजकारण आणि सामाजिक प्रश्नांवर चर्चा केली. याचाही प्रभाव राजेंद्र सिंग यांच्यावर पडला. त्यांचे शिक्षण सुरू असतानाच १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागू झाली होती. देशभरात लोकशाही मूल्यांची गळचेपी सुरू होती. विरोधी पक्षातील नेत्यांना तुरूंगात डांबण्यात आले होते. देशात जे काही सुरू आहे ते अयोग्य असल्याचे डॉ. सिंग जाणून होते. जयप्रकाश नारायण यांच्या ‘संपूर्ण क्रांती’च्या आवाहनाने ते भारावून गेले होते. त्या काळात समुदाय, लोकशाही मूल्ये आणि गरिबातल्या गरिबाचा आदर कसा करावा हे ते शिकले. जयप्रकाश नारायण यांनी स्थापन केलेली छात्र युवा संघर्ष वाहिनी ही विद्यार्थी संघटना त्यावेळी जोरात होती. राजेंद्र सिंग या संघटनेचे स्थानिक नेता बनले. जयप्रकाश नारायण आजारी पडल्यानंतर या संघटनेत अंतर्गत सत्ता संघर्ष सुरू झाला. यामुळे सिंग यांचा भ्रमनिराश झाला. बीएएमएसची पदवी प्राप्त केल्यानंतर १९८० मध्ये डॉ. राजेंद्र सिंग शासकीय सेवेत रुजू झाले. जयपूरमध्ये शिक्षणासाठी राष्ट्रीय सेवा स्वयंसेवक म्हणून त्यांनी आपल्या कारकीर्दीस प्रारंभ केला. राजस्थानातील दौसा जिल्ह्यातल्या प्रौढ शिक्षण शाळांवर देखरेख ठेवण्यासाठी त्यांची तेथे नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर मीना नावाच्या सुंदर मुलीशी त्यांचा विवाह झाला. जयपूर विद्यापीठ परिसरात लागलेल्या आगीची आच बसलेल्या



विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी म्हणून अधिकारी आणि विद्यार्थ्यांनी १९७५ मध्ये तरूण भारत संघ नावाची संघटना स्थापन केली होती. सिंग यांनी १९८० पूर्वीच या संघटनेत काम सुरू केले होते. तीन वर्षांनी संघटनेचे महासचिव बनल्यानंतर संघटनेच्या ठोस प्रभावाबद्दल त्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यातून १९८४ मध्ये संघाच्या संपूर्ण संचालक मंडळानेच आपले राजीनामे राजेंद्र सिंगांकडे सोपवले होते. दरम्यान, शासकीय नोकरीला आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या अनास्थेला ते कंटाळले होते. पत्नी गरोदर असल्याने माहेरी आई-वडिलांकडे गेल्यानंतर त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि स्वतःचं घर विकून चार ध्येयवादी सहकाऱ्यांसह ते अलवार जिल्ह्यातील गोपाळपुरा गावी निघून गेले. भूगर्भात अत्यंत कमी पाणी आणि बेरोजगारी अशी गोपाळपूरची अवस्था होती. त्यामुळे या गावात केवळ मुले आणि वयस्कर मंडळीच राहत होती. तिथल्या लोकांना वैद्यकीय सेवा आणि शिक्षण देण्याचा डॉ. राजेंद्र सिंग यांचा हेतू होता; परंतु तिथली दुरवस्था पाहून वैद्यकीय सेवा आणि शिक्षण देण्याचा विचार सोडून पाणी आणि रोजगाराच्या समस्येतून गावची सुटका करण्याचं त्यांनी मनोमन ठरवलं. प्रारंभी त्यांनी तीन-चार सहकाऱ्यांना घेऊन मातीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्ती आणि खोलीकरणाचे काम हाती घेतले. १९८५ मध्ये पहिल्यांदा ते जेव्हा अलवारमध्ये आले तेव्हा त्यांना तेथे अत्यंत विरळ स्वरूपात जंगलाचं दर्शन झालं. खाणकाम कंपन्या आणि वृक्ष तोंडणाऱ्यांनी पाटबंधाऱ्यांचं मोठं नुकसान केलं होतं. यामुळे पावसाळ्यात या भागात धोकादायक पूर परिस्थिती निर्माण होत होती.

स्थानिक स्वायतत्ता आणि आत्मविश्वासाशी संबंधित महात्मा गांधी यांच्या शिकवणीने प्रेरित झालेल्या राजेंद्र सिंगांनी अलवार जिल्ह्यातील प्रत्येक गावात ग्रामसभा, महिला बँक, नदी संसद असे उपक्रम सुरू केले आणि ग्राम स्वावलंबनासाठी शेकडो गावांमध्ये जनजागृती मोहिमेस प्रारंभ केला. लोकांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी त्यांनी १९८५ मध्ये जलसंवर्धनाच्या माध्यमातून गोपालपुरा गावात ग्रामीण विकास आणि रोजगार निर्मितीचे कार्यक्रम सुरू केले. राजस्थानातील ९ जिल्ह्यांमध्ये ६ हजार ५०० चौरस किलोमिटर परिसरात १ हजार ५८ गावांमध्ये ८ हजार ६०० बंधारे उभारण्यात डॉ.राजेंद्र सिंग यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या अहर्निश प्रयत्नांमुळे ईशान्य राजस्थानातील कोरड्याठाक पडलेल्या जवळपास ५ हंगामी नद्या बारमाही वाहत्या बनल्या. मासे आणि नदीमधील जीवजंतूचे संरक्षण करण्यासाठी शासनाने मासेमारीसाठी परवानगी देऊ नये म्हणून त्यांनी तब्बल तीन महिने सत्याग्रह केला. १९९५ मध्ये नद्यांचं पावित्र्य आणि पर्वतांचं जतन करण्यासाठी जयपूरमधील गाल्टा ते उत्तर काशीमधील गंगोत्रीपर्यंत नदी पहाड बचाओ यात्रा काढण्यात आली. या यात्रेचे नेतृत्व त्यांनी केले. डिसेंबर २००२ मध्ये नवी दिल्लीतील राजघाट येथील महात्मा गांधींच्या समाधीपासून एका राष्ट्रीय जलयात्रेचे आयोजन त्यांनी केलं होतं. ही यात्रा १४४ नदी खोऱ्यांसह देशातील ३० राज्यांमधून नेण्यात आली. या यात्रेदरम्यान देशभरात पाच राष्ट्रीय जल परिषदा आयोजित केल्या होत्या. पाण्याशी संबंधित चिंतांशी नागरिकांना अवगत करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून राष्ट्रीय जलयात्रा काढण्यात आली होती. या यात्रेत, नद्या जोडण्याऐवजी लोकांना नद्यांशी जोडण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, या वास्तवावर भर देण्यात आला होता.

सरिस्का राष्ट्रीय पार्कच्या परिसरात जंगल निर्माण करणे आणि

# नमो गंगेवरील २० हजार कोटींबद्दल डॉ. राजेंद्र सिंगांचा सवाल

गंगा नदीच्या स्वच्छतेसाठी डॉ. राजेंद्र सिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जोरदार पाठपुरावा केला. त्याला यश मिळून यूपीए-२ सरकारच्या काळात पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी राष्ट्रीय गंगा नदी खोरे प्राधिकरण स्थापन केले होते. पंतप्रधान अध्यक्ष असलेल्या या प्राधिकरणावर २३ तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये सेवाभावी संस्थेत काम करणाऱ्या नऊ जणांचा समावेश होता. पंतप्रधानांना न घाबरता आपले म्हणणे या प्राधिकरणात मांडले जात होते. मात्र गंगा नदी स्वच्छतेचा आराखडा निश्चित होण्यापर्वीच नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर आले. या सरकारने हे प्राधिकारण मोडीत काढून 'नमामी गंगे'ची घोषणा केली. यासाठी या सरकारने २० हजार कोटी रूपयांची तरतूद केली होती. सरकार २०१९ पर्यंत गंगा स्वच्छता मोहीम पूर्ण करणार होते; परंतु या सरकारचा कार्यकाळ संपलेला असतानाही या मोहिमेला सुरूवात झालेली नाही. यामुळे डॉ. राजेंद्र सिंग प्रचंड नाराज आहेत. ते म्हणतात, नमो गंगेने काय साधले. केवळ मोदी सरकारच्या नमो गंगेच्या घोषणेने एखाद्याची मंत्रीपद मिळण्याची सोय झाली आणि ज्यांना पैसे (२० हजार कोटी) वाटायचे होते, त्यांना ते वाटून टाकण्यात आले. गंगा स्वच्छतेसाठी म्हणून तरतूद केलेल्या २० हजार कोटींची विल्हेवाट लावण्यात आली. मात्र गंगा काही स्वच्छ झाली नाही. आयआयटीमधील अध्यापनाचं कार्य सोडून सन्यास घेतलेले प्रो. जी.डी. अग्रवाल ऊर्फ स्वामी स्वरूपसानंद यांनी गंगा नदी स्वच्छतेच्या पाठपुराव्यासाठी १११ दिवस उपोषण केले. त्यादरम्यान आपल्या मागणीसंदर्भातील तीन पत्रं त्यांनी केंद्रसरकारला पाठवले; परंतु सरकारने या पत्रांची कसलीच दखल घेतली नाही. शेवटी स्वामी स्वरूपसानंद यांचा उपोषणातच अंत झाला. आपला प्राण माणसाला सर्वात प्रिय असतो. तो स्वरूपसानंद यांनी गंगा नदीसाठी दिला. मोदी सरकारने मात्र आश्वासनांवर देशवासियांना झुलवत ठेवले, अशी तिखट प्रतिक्रिया डॉ. राजेंद्र सिंग व्यक्त करतात.

असलेल्या जंगलाचं संरक्षण करणे यासाठी खेड्यातील लोकांना प्रेरित करण्याच्या हेतूने राजेंद्र सिंग यांच्या नेतृत्वाखाली ९० गावांमध्ये वनसंरक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या आणि राजस्थानातील अन्य ३ जिल्ह्यांमध्ये ३२ समित्या स्थापन करण्यात आल्या. अलवार जिल्ह्याच्या भंवता-कोल्याला गावातील लोकांनी १२ चौरस किलोमिटरहून अधिक जागेत भैरवदेव लोक वन्यजीव अभयारण्य स्थापन केले.

१९८६ मध्ये त्यांनी सुरु केलेली पेड बचाव पेड लगाव पदयात्रा आता या भागातील विविध गावामध्ये दरवर्षी आयोजित केली जाते. जंगले आणि वन्य जीवांच्या रक्षणासाठी लोकांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने त्यांनी १९९५ मध्ये जंगल जीवन बचाव यात्रा काढली होती. अरवली पर्वतांमध्ये खाणींच्या विध्वंसक परिणामांविरोधातही त्यांनी एक मोहीम राबवली होती. यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या आधारावर केंद्र सरकारला या खाणींवर शेवटी बंदी घालावी लागली आणि राजस्थान सरकारने येथील एक हजार खाणी बंद केल्या. यातील ४७० खाणी सरिस्का पार्कभोवताल होत्या. खाणी बंद केल्यामुळे अनेक मजूर बेरोजगार झाले होते. यावर तोडगा म्हणून जल आणि वन संवर्धन, ग्रामीण विकास तसेच तरूण भारत संघाने हाती घेतलेल्या विविध प्रकारच्या रोजगार निर्मिती कार्यक्रमांद्वारे या कामगारांचे पुनर्वसन करण्यात आले. डॉ. राजेंद्र सिंग आणि त्यांची संघटना, तरूण भारत संघ यांनी ग्रामीण विकासासह पर्यावरणाची काळजी आणि संरक्षणाच्या कार्यात २१ वर्षांपासून वाहून घेतले आहे.


**दोन हजार किलोमीटरचा प्रवास करून काढले गंगा नदीवर पुस्तक** : गंगा नदी भारत आणि बांग्लादेश मिळून २,५२५ किलोमीटर धावते. ऐतिहासिक महत्त्व असलेली ही नदी तिच्या काठी वसलेल्या लाखो लोकांची जीवनवाहिनी असून आपल्या दैनंदिन गरजांसाठी ते तिच्यावर अवलंबून आहेत. आज ही नदी प्रचंड प्रमाणात प्रदूषित आहे. या प्रदूषणाचा केवळ माणसांनांच नाही तर माशांच्या १४० पेक्षा अधिक प्रजाती, उभयचर प्राण्यांच्या ९० प्रजाती आणि डॉल्फिन यांना धोका आहे. गंगा ही वैश्विक सागरी प्लास्टिक प्रदूषणाचा मुख्य स्त्रोत आहे. प्रचंड भ्रष्टाचार, सरकार आणि त्यांच्या नोकरशाहीमध्ये इच्छाशक्तीचा अभाव, तांत्रिक कौशल्याचा अभाव, अपुरे पर्यावरणीय नियोजन आणि धार्मिक संस्थांकडून पाठिंबा न मिळणं यामुळे गंगा नदी स्वच्छतेसाठीचा गंगा कृती आराखडा हा पर्यावरणीय पुढाकार यशस्वी झालेला नाही. या पार्श्वभूमीवर गंगा नदी स्वच्छतेसाठी ठोस आराखडा निश्चित करता यावा म्हणून डॉ. राजेंद्र सिंग यांच्या नेतृत्त्वाखाली आघाडीचे शास्त्रज्ञ, पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्ते अशा जवळपास ५१ तज्ज्ञांच्या पथकाने गंगा नदीचा अडीच हजारांहून अधिक किलोमीटरचा प्रवास करून पाहणी केली. या तज्ज्ञांनी ११ राज्यांमधील शेतकरी, विद्यार्थी, शिक्षक तसेच केंद्र आणि संबंधित राज्य सरकारांमधील तज्ज्ञ अशा ७ लाख लोकांशी चर्चा करून एक पुस्तक तयार केले आहे. या लोकांनी पुरविलेली तथ्ये आणि प्रत्यक्ष पाहणीच्या आधारावर 'गंगा सद्‌भावना यात्रा' नावाचे पुस्तक तयार करण्यात आले आहे. जेवढा खर्च आम्ही आरोग्यावर करीत आहोत, त्यामधून गंगा आणि तिच्याशी संबंधित समाजाचे आरोग्य आणि विकास होऊ शकेल असे डॉ. सिंग यांना वाटते. लाखो लोकांचे जीवन संचालित करणारी गंगा नदी प्रदूषणमुक्त आणि प्रवाही ठेवण्याच्या दृष्टीने गंगा सद्‌भावना यात्रा हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास डॉ. राजेंद्र सिंग यांना वाटतो.

●●●

# डॉ. रावसाहेब कसबे यांचे 'भक्ती आणि धम्म' चिंतन

डॉ. मिलिंद कसबे

माणसाच्या आयुष्यात धर्माचे स्थान कसे आहे? माणूस धार्मिक असतो म्हणजे काय असते? धर्माला महत्त्व देणाऱ्या आणि धर्माचे अस्तित्त्व नाकारणाऱ्या परस्परविरोधी बाजू कशा आहेत? हिंदूत्त्ववादी धर्माची वाटचाल आणि भगवान बुद्धांनी रुजवलेला धम्म कसा आहे. अशा अनेक प्रश्नांची सखोल उत्तरे देणारा ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांचा 'भक्ती आणि धम्म' हा ग्रंथ आहे. लोकवाङ्मय गृहाने २०१६ साली प्रकाशित केलेला हा ग्रंथ रावसाहेबांचे वैदिक, इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मांच्या चिकित्सेसह बौद्ध धम्माचे केलेले नवे सिद्धांकन आहे. १९९६ पासून रावसाहेबांनी हाती घेतलेल्या लेखन प्रकल्पातील हा तिसरा ग्रंथ आहे. या लेखन प्रकल्पातील त्यांचा 'मानव आणि धर्मचिंतन' हा पहिला ग्रंथ प्रकाशित झाला तेव्हा त्यावर अभ्यासकांत उलटसुलट चर्चा झाल्या. प्रा. मे.पु. रेगे तसेच कॉ. शरद पाटील यांनी या ग्रंथाची चिकित्सा केली. माणूस प्राणीसृष्टीतून बाहेर पडल्यानंतर त्याचा जीवनशास्त्रीय आणि सांस्कृतिक विकास कसा घडत गेला, याचा विविध ज्ञानशाखांच्या आधारे रावसाहेबांनी या ग्रंथात शोध घेतला आहे. यानंतर २००८ साली त्यांनी लिहिलेल्या 'धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवाह' या ग्रंथात, माणूस बाहेरच्या कोणत्याही दैवी शक्तीने नव्हे तर स्वप्रयत्नाने कसा माणूस बनला याची चर्चा आहे. या ग्रंथात भगवद्गीता, कुराण, बायबल आणि धम्मपद अशा धर्मग्रंथांवर रावसाहेबांनी केलेले विवेचन माणसाचा आजचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रवास कसा झाला याची ऐतिहासिक मांडणी करणारा आहे. यानंतरचा रावसाहेबांनी लिहिलेला लेखनत्रयीतला 'भक्ती आणि धम्म' हा शेवटचा ग्रंथ आहे. ईश्वर आणि धर्माच्या उगमापासूनचा प्रवास समजून घेतल्याशिवाय माणसाच्या आजपर्यंतच्या सांस्कृतिक प्रवासाचा अन्वयार्थ लावता येत नाही. कारण कोणत्याही चिकित्सेचा पूर्वपक्ष धर्मचिकित्सा आहे, असे रावसाहेबांचे मत आहे. मृत्यूची कल्पना ही माणसाला सर्वात भयभीत करणारी गोष्ट आहे. ईश्वराचे अस्तित्व केवळ मृत्यूची भीती विसरण्यापुरतेच मर्यादित आहे. माणूस जेव्हा मृत्यूचे अंतिम सत्य कोणताही बहाणा न करता स्वीकारील, तेव्हाच त्याला मृत्यूंजय होता येईल, असेही रावसाहेबांनी म्हटले आहे. माणूस जेव्हा ईश्वराच्या आणि धर्माच्या बंधनातून मुक्त होईल, तेव्हाच तो स्वतःचा स्वामी आणि मार्गदीप बनेल, असेही रावसाहेबांना वाटते. आज विज्ञानाची प्रगती धार्मिक ईश्वरी कल्पनांना पुसट करते आहे. हे खरे असले तरी माणसे आपले आयुष्य प्रज्ञा, शील, करूणा आणि मैत्रीच्या आधाराने जेव्हा प्रेममय करतील तेव्हाच न दिसणाऱ्या ईश्वराचा शोध थांबेल आणि माणूस स्वतःच ईश्वर बनून आपल्या जगण्याला सार्थ आणि सुंदर करील, असा आशावाद घेऊन रावसाहेबांचा हा ग्रंथ साकारला आहे.




'भक्ती आणि धम्म' हा ६६५ पृष्ठांचा ग्रंथ तीन भागांत विभागला आहे. यातल्या 'भक्ती' या पहिल्या भागात मानवी जीवनात देव, आत्मा या संकल्पनेची झालेली मानसिक निर्मिती, यातून विविध धर्मांचा झालेला उदय आणि विकास, विविध धर्मातील देव, कल्पना इत्यादी गोष्टींची मांडणी केली आहे. याच भागातल्या दुसऱ्या प्रकरणात रावसाहेबांनी मानवी जीवनात प्रेम ही अत्यावश्यक आणि सर्वश्रेष्ठ ऊर्जा कशी आहे, याविषयी मूलभूत अशी समाजशास्त्रीय मांडणी केली आहे. तिसऱ्या प्रकरणात रावसाहेब कसबे मानवी जीवनचा अविभाज्य भाग झालेल्या भक्ती चळवळीचे ऐतिहासिक स्वरूप वाचकांसमोर मांडताना दिसतात.

भक्ती चळवळींचा मध्ययुगीन आढावा घेत संतांचा भक्तीमार्ग, इस्लामी धर्म आणि सूफी संतांचे आंदोलन, कबीर, मीरा, तुकाराम यांसारख्या संतांचे मन बुद्धांच्या प्रेममय वैश्विक संदेशात कसे गुंतले होते, याविषयी रावसाहेबांनी जे विवेचन केले आहे, ते बुद्धांनी सांगितलेल्या मानवी जीवनाच्या विज्ञानवादी तत्त्वज्ञानाशी थेटपणे नाते सांगणारे आहे.

या ग्रंथाच्या दुसऱ्या भागात जगभरातल्या पुनरुज्जीवनवादी आणि प्रबोधन चळवळीचा विकास मांडला आहे. ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणात डॉ. रावसाहेब कसबे यांनी बौद्ध धम्माचा उदय, विकास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराची सामाजिक फलश्रृती मांडली आहे. या ग्रंथांचे 'बुद्ध आणि धम्म' याविषयी रावसाहेबांनी केलेले चिंतन म्हणजेच त्यांनी त्यांच्या या लेखनत्रयीचा मांडलेला सारांश आहे.

धर्म म्हणजे धारणा किंवा आधार देणे असे असले तरी ऋग्वेदात मात्र धर्माचा अर्थ धार्मिक कृत्यांशी जोडला गेला. धर्माचा मानवी जीवनातील प्रवास अधोरेखित करताना रावसाहेब कसबे वैदिक धर्माची चिकित्सा करतात. ते म्हणतात, 'भारतीय वैदिकांच्या धर्मसंकल्पनेत कर्माला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

''ख्रिस्त शतकाच्या पूर्वी दुसऱ्या शतकाच्या प्रारंभापासून ते सरासरी चौथ्या शतकाच्या अंतापर्यंत हिंदुस्थानाबाहेरील राजे लोकांनाच हिंदुस्थानात महत्त्व आले होते आणि मधून-मधून त्यांची सत्ता फार मोठ्या प्रदेशात महाराष्ट्राच्या मर्यादेपर्यंत पोहचली होती... या काळात बौद्धधर्म तेवढा अस्तित्त्वात असल्याची चिन्हे दिसून येतात आणि हाच बहुजनांचा धर्म होता.'' (पृ-४०)

**- डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर**

''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धम्माचे वैशिष्ट्य हे आहे की, बुद्धाच्या नव्या रूपाचा आधुनिक ज्ञान विज्ञानाशी आणि लोकशाही मूल्यांशी संयोग करून बुद्धालाच आधुनिक बनवले. समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार या धम्माने कसा करावा यासाठी त्यांनी बुद्धाला कार्ल मार्क्स यांच्याजवळ नेऊन बसविले.'' ('भक्ती आधि धम्म' - संदर्भ (पृ-३९६)

**- डॉ. रावसाहेब कसबे**

## ग्रंथातील अवतरणे

''मध्ययुगीन संत चळवळीने सर्वात मोठी क्रांती जनभाषांना समृद्ध केले, ही आहे. त्यांनी केवळ संस्कृतविरूद्ध विद्रोह केला नाही तर त्यांनी लोकभाषांत साहित्य सृजन करून खऱ्या अर्थाने सांस्कृतिक आणि भाषिक क्रांती केली आहे. या क्रांतीचे महत्त्व त्याचवेळी समजू शकेल, ज्यावेळी संत आणि त्यांच्या लेखनाकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहिले जाईल.'' (पृ-१०७)

**- डॉ. रावसाहेब कसबे**

''जातीयता पाळणारे लोक हे खरे शत्रू नाहीत, तर खरा शत्रू जातीसंस्थेची शिकवण देणारी धर्मशास्त्रे आहेत. म्हणून जातीसंस्थेच्या पालनातून मुक्त होण्यासाठी खरा मार्ग हा धर्मशास्त्रांच्या मान्यतेलाच उद्ध्वस्त करणे हा आहे. म्हणून लोकांना जाती सोडा असे सांगणे म्हणजे त्यांच्या मूलभूत धार्मिक मतांचा त्याग करा असे सांगणे आहे.''

**- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (संदर्भ, पृ-३४०)**

त्यांच्या दृष्टीने धारयति सः धर्मः जो समाजधारणा करतो तो धर्म. या गोष्टीला इतके महत्त्व आहे की, त्यांची धर्मशास्त्रे चातुर्वर्ण्य आणि जातीव्यवस्थेभोवतीच फिरताना दिसतात. माणसाचा वर्ण किंवा जात जन्मानेच ठरते आणि त्याने कोणते काम करावे हेसुद्धा जन्मानेच ठरलेले असते.' (पृ-९) भगवद्‌गीता, मनुस्मृती यांसारख्या ग्रंथात वैदिकांनी चातुर्वर्ण्य व्यवस्था ही कशी परमेश्वराची निर्मिती आहे हे कसे रुजविण्याचा प्रयत्न केला, हे रावसाहेबांनी अनेक वैदिक धर्मग्रंथांच्या सखोल चिंतनातून दाखल्यासह मांडले आहे. याउलट धम्म म्हणजे कोणतेही धार्मिक कर्मकांड नसून 'धम्म म्हणजे नीती आणि नीती म्हणजे धम्म' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारसूत्र पकडून रावसाहेबांनी बौद्ध धम्माबद्दल जे चिंतन मांडले आहे, ते आजच्या घडीला समजून घेणे फार महत्त्वाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय प्रबोधन चळवळीचे साफल्य हे या ग्रंथातील एक महत्त्वाचे प्रकरण आहे. प्रबोधनकाळातील थॉमस पेन, महात्मा फुले, राजा राममोहन रॉय, कार्ल मार्क्स, महात्मा गांधी यांसारखे विचारवंत जातीसंस्थेच्या अस्तित्वाकडे कसे पाहात होते, याची ऐतिहासिक मीमांसा करून रावसाहेब कसबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीसंस्थेची कशी चिकित्सा केली आहे, याकडे लक्ष वेधले आहे. लोकमान्य टिळक आणि गांधींजी या दोघांनीही वर्णव्यवस्था ईश्वराने निर्माण केली, असे ठामपणे मानले आणि वर्ण व जातीव्यवस्थेचे समर्थन केले. त्यामुळे भारतीय समाज आधुनिक बनण्यात अनंत अडचणी उभ्या राहिल्या, असे सांगून रावसाहेब कसबे डॉ. आंबेडकरांनी जातीअंताचे सुचविलेले उपाय अधोरेखित करतात. आंतरजातीय विवाहाचा उपाय धर्मचिकित्सा करून जातीच्या संस्कारात दडलेल्या पौरोहित्याला नष्ट करणे यांसारखे उपाय रावसाहेबांना आजही महत्त्वाचे वाटतात. दलितांनीही जातीबद्दलची भावुकता कमी करून जातीचा मानवी समाजात झालेला विकासक्रम मानसशास्त्रीय दृष्टीने समजून घेऊन तिच्या अंताची कारणे शोधून त्यादृष्टीने कृतीशील पावले टाकावीत, असे रावसाहेबांनी सूचित केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची जी पुनर्रचना केली याकडे तर्कशुद्ध दृष्टीने पाहून 'भक्ती आणि धम्म' या ग्रंथात डॉ. रावसाहेब कसबे बुद्धांच्या विचारांचे जे मानववंशशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय विश्लेषण करतात, ते समजून घेणेही फार महत्त्वाचे आहे.

●●●

**- 'भक्ती आणि धम्म'**
**डॉ. रावसाहेब कसबे**
**लोकवाङ्मय गृह, मुंबई.**
**प्रथम आवृत्ती - जानेवारी २०१६**
**पृष्ठे - ६६५**
**किंमत - ९७५/-**

# नेते शिरजोर, पक्ष कमजोर



नेत्याला जनतेची गरज असते की जनतेला नेत्याची, असा प्रश्न लोकशाहीत उपस्थित केला तर परस्परांना परस्परांची गरज असते असं उत्तर यायला हवं. पक्षाला नेत्यांची गरज असते की नेत्याला पक्षांची गरज असते, हा प्रश्नही सर्वसाधारणपणे असाच जाणारा आहे. म्हणजे लोकांचा पक्ष बनतो. पक्ष नेते निवडतो; पण या प्रश्नाचं उत्तर अलीकडं असं येऊ लागलंय की, पक्षाला म्हणजे जनतेला नेत्याची गरज असते. नेता जिकडे जाईल तिकडं जनतेनं धावत जायचं. नेता जेवढी घरं बदलेल तेवढी जनतेनं बदलायची. आता लोकशाहीच्या दृष्टीनं विचार केला तर हे उत्तर फारसं बरोबर वाटलं नाही. लोकशाहीत स्वाभाविकच लोक सार्वभौम असतात. लोकांच्या मागं नेत्यानं धावलं पाहिजे. पण गेल्या काही वर्षांपासून पक्षांची किंमत, त्याचं वजन, त्याची प्रतिष्ठा कमी होते आहे आणि नेताभिमुख संघटन तयार होतं आहे. इथं जनतेला फारसा वाव ठेवलेला नाही.

१९५२ च्या निवडणुकीत हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढे पक्ष होते. आज त्यांची गणती करणे कठीण होते. सर्वच राजकीय पक्षांचे तुकडे तुकडे झाले. याला डावेही अपवाद नाहीत. कोणत्या तरी पक्षातून एखादा नेता तुकडा पाडून बाहेर पडला. त्यानं या तुकड्याचा पक्ष केला आणि सत्ताकारणात तो मातृ किंवा पितृपक्षाच्या विरोधात लढू लागला. या लढती कधी मैत्रीपूर्ण तर कधी शत्रूपूर्ण होतात. मग या तुकड्यातून कोणीतरी दुसरा बाहेर पडतो. दुसरा पक्ष तयार होतो. मग चौथा, पाचवा, शंभरावा असं होत आता आपल्या राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांची संख्या तीन हजारांच्या घरात पोहोचली आहे. नव्वद कोटी मतदार आणि पक्ष-तीन हजार. भारतात जास्त पक्ष असण्याचा कदाचित हा जागतिक विक्रम असावा. मुळातच आपण बहुपक्षीय लोकशाही स्वीकारली आहे. तिच्यामागे काही विधायक व्यापक भूमिका होती. भारत हा जातीपातीत, धर्मात, वंशात, भाषेत विभागलेला आहे. इथं अल्पसंख्याक जास्त आहेत. बहुसंख्याकही आहेत. गरीब-श्रीमंत आहेत. एक किंवा दोनच पक्ष असते तर बाकीच्यांना सत्तेत वाटा मिळवणे, आपले प्रतिनिधी पाठवणे अशक्य झाले असते. सनदशीर मार्गाने पक्षीय राजकारण करून सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठीचा एक सोपान म्हणजे हे पक्ष असायला हवेत. त्याबाबत कुणाचे दुमतही नाही. पण आता पक्ष विरुद्ध नेते असा संघर्ष दिसतो आहे. व्यक्तीच स्वतःला पक्ष समजायला लागले आणि पक्ष स्वतःला राष्ट्र समजायला लागले. त्यातून काही पेचप्रसंग निर्माण होत आहेत.

बरेच नेते पक्षाबाहेर राहून बलवान होतात. त्यासाठी विविध मार्ग ते अवलंबतात. अशा बलवान नेत्यांची सर्वच पक्षांना गरज असते. ते यांच्यासाठी पायघड्या घालतात. पक्षात त्यांना समाविष्ट करून घेतात. महत्त्वाची पदे देतात. निवडणुकांत उमेदवारी देतात. निवडून यायला मदत करतात. पुन्हा पुन्हा ते निवडून येतात. त्यातून त्यांची घराणेशाहीही तयार होते. व्यक्तीबरोबर घराणेशाहीचं हित पाहण्याची जबाबदारी येते. शेवटी शेवटी हे कर्तबगार नेते पक्ष व्यापून राहतात. विशेष म्हणजे, स्वतःच पक्ष बनतात. व्यक्तीचं पक्षात रूपांतर झालेल्या अनेक घटना आपल्या अवतीभोवती आहेत. ज्या क्षणाला एखाद्या गब्बर नेत्याच्या आकांक्षांना, इच्छांना तडा जातो त्या क्षणी तो पक्ष सोडतो. एक तर नवा पक्ष काढतो किंवा त्याचे हितसंबंध जपणाऱ्या दुसऱ्या पक्षात जातो. तेथे नेता होतो. लोकांची मते घेऊन मोठे होणारे नेते पक्ष बदलताना, पक्ष काढताना, बंड करताना कधीही लोकांना विश्वासात घेत नाहीत. त्यांना गृहीत धरतात. त्यांना नेत्याची गरज आहे. ते गुलामाप्रमाणे आपल्या मागे येतील याची त्यांना खात्री असते. घडतंही तसंच. एकही मतदार नेत्याला प्रश्न करत नाही. तुम्ही कुणाला विचारून पक्षांतर करता आहात, असा सवाल टाकत नाही. उलट तो जेथे जाईल तेथे हा ढोल वाजवत जातो. नवा झेंडा आणि त्याचा दांडा स्वीकारत राहतो.

लोकशाहीतील मतदार निरपेक्ष असावे

लागतात. मतांचं मूल्य कायम टिकवून ठेवण्यासाठी विचार करणारे असावे लागतात. नेता स्वतःच्या मस्तीवर, ताकदीवर भलेबुरे जे काही करायला लागतो तेव्हा स्वाभाविकच मतदारांचा आणि लोकशाही प्रणालीचाही अप्रत्यक्ष का होईना अपमान झालेला असतो. पण याचा विचार करताना कोणी दिसत नाही. त्यामागे महत्त्वाचं एक कारण म्हणजे असे नेते सत्ता, संपत्ती आणि मनगटाच्या जोरावर लाभार्थी मतदार तयार करतात. कुणाला कशाचा ना कशाचा लाभ करून देतात. मतदारांना बांधून घेतात. यासाठी सहकाराचा वापर खूप मोठ्या प्रमाणात होतोय. सावकाराच्या मगरमिठीतून सर्वसामान्यांना सोडवण्यासाठी सहकाराचा जन्म झाला. बघता बघता सहकाराच्या मगरमिठीत हा माणूस अडकला. लेकरांना नर्सरीत प्रवेश असो, सहकारी बँकेचं कर्ज असो, दूध विक्री असो की शेतीसाठी कर्ज असो, सहकार सम्राटाच्या मर्जीशिवाय पान हलत नाही. लोकांच्या शक्तीतून तयार झालेली साधने तो लोकांसाठी वापरतो; पण मीच हे सगळं करतोय असं सांगतो. पूर्वी राजवाड्याबाहेर सामान्य लोक हात जोडून उभे असायचे. आज सहकारसम्राटाच्या दारात असतात. गुलाम तेच आहेत फक्त त्यांचे मालक बदलताना दिसतात. हे लोक आपल्या नेत्याला दहा-दहा वेळा निवडून देतात. तो कुठंही गेला तरी त्याचा जयजयकार करत त्याच्या मागं जातात. जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठी ही एक नवी व्यूहनीती आहे. मग असे नेते पक्षाला कस्पटासमान लेखतात. आपण ठरवू तसा पक्ष वागायला पाहिजे; अन्यथा आम्ही बाहेर पडू, असे बजावून सांगतात. काही काही वेळेला या बांधून घेतल्या जाणाऱ्या मतदारांच्या जागी जात येते. धर्म येतो. प्रादेशिक अस्मिता येतात आणि आपला नेताच आपला कैवारी आहे असं समजत आणि लोकशाहीचा संकोच करत चालू लागतात.

एका रात्रीत नेता पक्ष बदलतो आणि नव्या पक्षात जाऊन निवडूनही येतो याचं कारण आपल्याकडे पक्षीय राजकारणाला कमी आणि नेत्याच्या राजकारणाला अधिक महत्त्व आहे. पक्ष ही एक तांत्रिक गरज असते. इथे कोणी पक्ष नेत्याची प्रतिष्ठा वाढवत नाही तर ती जबाबदारी नेता घेतो. जो पक्ष स्थापन करतो तोच मरेपर्यंत पक्षाचा प्रमुख म्हणून राहतो. लोकाग्रहास्तव, लोकांच्या प्रेमापोटी हे सारं करावं लागतं असं खोटं हसत खोटंच सांगत असतो. खरं तर ही गोष्ट लादलेलीच असते; पण लाभार्थी मतदार हालचाल करू शकत नाहीत म्हणून हे सारं काही चालतं.

लोकशाहीत सत्तेचं विकेंद्रीकरण होत असतं म्हणून तर तिला लोकशाही म्हणतात. पण आपल्याकडं नेमकं उलटं. साऱ्या देशाची सत्ता पाच-पन्नास कुटुंबात सत्तर वर्षांपासून आहे. डावे, मध्यम, उजवे, पुरोगामी असे कोणीच याला अपवाद नाहीत. मी दोन वेळा निवडून आलो, आता दुसऱ्याला संधी द्या असं कोणी म्हणत नाही आणि समजा तशी वेळ आलीच तर नेत्याच्याच कुटुंबातील कुणाला तरी संधी मिळते. म्हणजे बघा सत्तेचं विकेंद्रीकरण होतं; पण समाजात नव्हे तर विशिष्ट कुटुंबांमध्ये. महाराष्ट्रात सध्या अर्धा डझन नातू नव्या पिढीच्या नावानं निवडणुका लढत आहेत. काहींनी तिकीट मिळवण्यासाठी बापाचा पक्ष सोडला. म्हातारपणी पोराबरोबर रहायला हवं म्हणून काही बापांनीही पक्ष सोडला. कुणी तरी आजोबाचा पक्ष सोडला. कुणी बापाचा पुरोगामी पक्ष सोडला. आता या साऱ्यांकडे निवडून येण्याची क्षमता आहे किंवा त्यांना निवडून आणण्याची क्षमता त्यांच्या बापात किंवा आजोबांत आहे. लोकांना आश्चर्य वाटतं. हे असं कसं घडू शकतं? पण भारतात हे घडू शकतं. लोकशाहीतही लोक घराणेशाहीवर, संपलेल्या राजेशाहीवर आणि विशेष म्हणजे लाभावर प्रेम करतात. बहुतेक पक्षांत लोकशाही फक्त तांत्रिक असते. बाकी सारे बाहेर कुठं तरी बंड करून आलेला आणि नव्या पक्षाचा परंपरागत मालक झालेला नेताच निर्णय घेत असतो. लोक त्याला जनसेवक म्हणतात. सेवेसाठी त्याला कधीही, कोणताही निर्णय घेण्याचा ब्लाईंड चेक देतात. प्रश्न आहे तो अजून किती दिवस आपण जुन्या परंपरा, भ्रामक गोष्टी यात अडकणार आहोत? नेते गब्बर आणि पक्ष दारिद्र्यरेषेखाली, नेते एटीएम कार्डहोल्डर आणि पक्ष आधार कार्डहोल्डर असं चित्र पाहणार आहोत? लोकशाहीचा रस्ता अशा गाभूळलेल्या चिंचेखालून कधी जात नसतो. खरंच लोकशाहीच्या गावात आपण पोहोचणार की नाही हा प्रश्न स्वतःच स्वतःला विचारायला हवा. आपल्या मनावर वाढवली गेलेली क्षणिक लाभाची, मिंधेपणाची, परावलंबीपणाची चामडी सोलून आपण कधी पाहणार की नाही? निवडणुका त्यासाठीच असतात. आपण काय घेणार आपणच ठरवायला हवं. पंक्चरवाला उन्हातान्हात रस्त्यावर बसून हे सारं बघत असतो. तुम्हीही चष्म्यावर बसलेली मिंधेपणाची धूळ झटकून हे बघायला हवं.

## नौका भरून आरोप

नरेंद्र मोदी यांनी अतिशय निष्ठेनं आणि स्वतःची छाती व मन साक्षी ठेऊन काँग्रेसवर आणि महात्मा गांधींपासून राहुल-प्रियंका गांधींपर्यंत संसदेत, संसदेबाहेर आणि परदेशात केलेले सर्व आरोप कोण्या स्वयंसेवकाने राष्ट्रीय कार्य म्हणून गोळा केले तर एक नौका भरेल. कदाचित ती भरली असावी म्हणून की काय निवडणुकीच्या शेवटच्या चरणातील आरोप विराट या भारताच्या प्रसिद्ध युद्धनौकेच्या निमित्ताने राजीव गांधी यांच्यावर केला गेला. देशाच्या संरक्षण दलाच्या नौकेतून राजीव गांधी कुटुंबासह सहलीला गेले. हा देशातला सगळ्यात मोठा भ्रष्टाचार होता. खरं तर, आता भ्रष्टाचार शब्दाची जागा राष्ट्रद्रोह या शब्दाने घेतली आहे. पहाटे कोंबडं आरवायला उशीर जरी झाला तरी कोंबड्याविरुद्ध राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करता येईल का, असा विचार कुणीतरी भंपक राष्ट्रभक्त केल्याशिवाय राहणार नाही.

तर मोदी नेहमीच्या टोलेजंग आवाजात म्हणाले, राजीव गांधींनी विराट नौकेचा



वापर सुटीत मजा करण्यासाठी केला. रामाच्या नावानं असलेल्या रामलीला मैदानावर रामभक्त मोदींनी हा आरोप केला. दहा दिवस राजीव गांधी, त्यांचे मित्र आणि सासरची मंडळी नौकेत मजा करत होती. एका पंतप्रधानाने देशाच्या सुरक्षा व्यवस्थेशी खेळ केला. लष्करातले जवान त्यांच्या तैनातीसाठी होते. हा गुन्हा (म्हणजे भाजपच्या भाषेत राष्ट्रद्रोह) नाही का, असा सवाल विचारत टाळ्या तर घेतल्याच; शिवाय यासारखी प्रकरणे खणून काढण्यासाठी मला आणखी पाच वर्षे सत्ता द्या हे सांगायलाही ते विसरले नाहीत. काँग्रेसचा न संपणारा इतिहास सांगूनही ते सत्ता मागतात. आता प्रश्न आहे तो मोदी म्हणतात त्याप्रमाणे पंतप्रधानांनी नौदलाची नौका वापरणे गैर आहे का? तो भ्रष्टाचार आहे का? हे प्रकरण जर लांबवलं तर सरकारी यंत्रणेची सेवा घेणे किंवा ते घेणारे सर्वच भ्रष्टाचारी ठरतील. मंत्र्यांच्या दौऱ्यात त्यांच्या तैनातीला सारे सरकारी कर्मचारी असतात. सुरक्षा विभागात काम करणारे पोलिसही असतात. अशी सेवा कोणीच घेतलेली नाही. मीसुद्धा नाही हेही मोदींनी सांगायला हवं.

मुळात मोदी किती खोटे बोलताहेत आणि निवडणुकीत महत्त्वाचे इश्यू मांडण्याऐवजी आरोपाचे ढीगच कसे तयार करताहेत हेही लोकांना कळले आहे आणि ते ऐकून वीट येतो आहे. या प्रकरणावर देशाच्या लष्कराने यापूर्वीच खुलासा करून राजीव गांधी यांनी अनुचित काहीच केलेले नाही असे स्पष्टपणे लेखीच प्रसिद्ध केले आहे. पंतप्रधानांच्या औपचारिक दौऱ्यात युद्धनौका आणि हेलिकॅप्टर वापरण्यात काहीच गैर नाही तर तो प्रोटोकॉलचा एक भाग असतो असे खुद्द निवृत्त व्हाईस ॲडमिरल आय. सी. राव यांनी सांगितल्यामुळे मोदींची आरोपरूपी नौका बुडू लागली आहे. समुद्राच्या दौऱ्यात पंतप्रधानांची व्यवस्था हॉटेल अथवा गेस्ट हाऊसमध्ये केली की माहिती फुटते. विशेष म्हणजे, नौकेत राजीव, सोनिया व राहुल यांच्याशिवाय कोणी नव्हते. पार्टीचा प्रश्नच नव्हता. सहा मे २०१९ ला नौदल अधिकाऱ्यांनी अधिकृतरीत्या आरोपाचे खंडन करून तसं पत्र पाठवले आहे. याचा अर्थ राव यांच्यासारख्या जबाबदार अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार नौकेचा वापर हा विषयच होऊ शकत नाही आणि तरीही तो कोणी केला असला तरी त्याचे योग्य स्पष्टीकरण झालं आहे.

आता हा प्रश्न उपस्थित करणाऱ्या मोदींनी सत्तर वर्षांत होऊन गेलेल्या पंतप्रधानांनी केले नसतील एवढे परदेश दौरे केले आहेत. त्यांच्या दौऱ्यात चुकूनच कधी तरी पत्रकार असतात. या दौऱ्यावरच्या प्रचंड खर्चाविषयी त्यांना कोणी कधी विचारलं नाही. निवडणूक प्रचार दौऱ्यात इतक्या मोठ्या प्रमाणात हवाई दलाचे विमान कसे काय वापरतात, असाही सवाल कुणी केलेला नाही. लोकांना ठाऊक आहे की, पंतप्रधानपद काय असते, त्याविषयीचे शिष्टाचार काय असतात आणि ते कसे पाळायचे असतात? पण या साऱ्यांशी मोदींचा संबंध नाही. स्वच्छ भारत अभियान मोहिमेवर निघालेल्या मोदींना सातत्यानं दुसऱ्याच्या डोळ्यातलं कुसळ दिसतं; पण बाजूलाच आपल्या सावलीत आपल्याला चिकटलेलं मुसळ कधी दिसत नाही.

शत्रुत्वाचा शेवट शत्रूच्या मृत्यूबरोबर असतो. मेलेल्या माणसाशी कोणी दुश्मनी करत नाहीत हे महाभारतात, रामायणात आणि वाजपेयींनी त्यांना सांगितलेल्या राजधर्मातही आहे. प्रश्न आहे तो गंगेला माता, आपल्या मतदारसंघाला मंदिर म्हणत रामभक्ती करणाऱ्या मोदींना हे समजत नाही असं कोणीच म्हणणार नाही. पण त्यांचं राजकारण खोटं बोला पण रेटून बोला या सुविचारावर चालतं. त्याला पंक्चरवाला तर काय करणार बुवा?

## बरंय, ते दिलगिरी तरी व्यक्त करतात..!

बरंय, ब्रिटनच्या पंतप्रधान थेरेसा मे यांनी भारतात एप्रिलमध्ये झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांडासंदर्भात ९ मे २०१९ रोजी दिलगिरी व्यक्त केली. ब्रिटन साम्राज्यवादी होता म्हणजे आता फारसा नाही; पण त्याला मानवी हक्काविरुद्ध ब्रिटनकडून घडलेल्या काही गोष्टींची आठवण होते. पश्चात्ताप होतो आणि कधी कधी तो दिलगिरी आणि क्षमा व्यक्त करतो म्हणजे मागतो. जगाच्या मानवी इतिहासात कुख्यात ठरलेल्या या हत्याकांडाची आठवण मे यांना झाली आणि त्यांनी दिलगिरी व्यक्त केली.

जालियनवाला बाग हत्याकांड म्हणजे मानवतेवरील एक कलंक आहे. स्वातंत्र्य मागण्यासाठी जालियनवाला बागेत १३ एप्रिल १९१९ ला म्हणजे जवळपास शंभर वर्षांपूर्वी जमलेल्या निःशस्त्र नागरिकांवर जनरल डायर यांच्या हुकुमानुसार एक-दोन नव्हे तर रायफलीच्या सोळाशे फैरी झाडल्या गेल्या. त्यात स्त्री-पुरुष आणि त्यांची चिल्लीपिल्ली असे जवळपास ३७९ लोक मारले गेले. स्वरक्षणासाठी विहिरीत उड्या मारलेल्यांवरही गोळ्या झाडण्यात आल्या. विहीर प्रेतांनी भरून



गेली. सत्यपाल आणि सैफुद्दीन कयलू या स्वातंत्र्यवीरांची तडिपारी रद्द करा, अशी मागणी होती. ब्रिटिश सैन्याच्या एका तुकडीने त्यांच्यावर बेछूट गोळीबार केला. स्वातंत्र्यसैनिक आणखी भडकले. जाळपोळ सुरू झाली. दोन दिवसांनी म्हणजे १३ एप्रिलला शिखांचा बैशाखी सण साजरा करण्यासाठी हिंदू-शीख एकत्र जमले; पण हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर मार्शल लॉ जारी करण्यात आला होता. अमृतसर शहराचा एक भाग असलेल्या जालियनवाला बागेत सर्व देशप्रेमी जमले असता गोळीबाराचे आदेश दिले गेले. दोन हजारांहून अधिक जखमी झाले. स्वातंत्र्याच्या चळवळीत एक मोठा नरसंहार झाला. एक मोठी जखम तयार झाली. ती आजही भळभळते आहे. १९९७ मध्ये ब्रिटनच्या राणी एलिझाबेथने श्रद्धांजली वाहिली होती. त्यानंतर २०१३ मध्ये ब्रिटनचे पंतप्रधान डेव्हिड कॅमेरॉन यांनी स्मारकाला भेट देऊन तिथल्या नोंदवहीत एक वाक्य लिहिले. ते असे, ब्रिटनच्या इतिहासातील एक लज्जास्पद घटना म्हणजे हे हत्याकांड आहे. ब्रिटनने या घटनेची चौकशीही केली होती. जनरल डायरला पदावनती देऊन कर्नल बनवण्यात आले. त्याला भारतातून माघारी बोलावण्यात आले. त्याने नंतर राजीनामाही दिला. जगाच्या इतिहासातला एक काळा दिवस म्हणजे जालियनवाला बाग हत्याकांड.

हत्याकांडाची आठवण कधीही विस्मरणात गेलेली नाहीय. एप्रिल उगवला की, ब्रिटनमध्येही या घटनेचे स्मरण होते. सरकारी पातळीवर कोणी काही तरी विधान करते. दिलगिरी व्यक्त करते. आता ही झाली जालियनवाला बाग हत्याकांडाची गोष्ट. आपल्याकडे हजारो वर्षे जातिव्यवस्थेत भरडून कोट्यवधी लोक जिवंतपणीच मरण भोगत होते. आजही परिस्थिती फारशी बदललेली नाही; पण स्वतःला हिंदू राष्ट्राचे कर्ते समजणाऱ्यांनी या गोष्टीबद्दल कधी दिलगिरी व्यक्त केली नाही. गेल्या काही वर्षांत जमावाने खालच्या जमावाची सामुदायिक हत्या केली; पण तरीही यांनी तोंड उघडून श्रद्धांजली वाहिली नाही. पश्चात्ताप केला नाही किंवा जातीमुक्त भाषेचा आग्रह धरला नाही. गुजरातेत गोध्रा आणि त्यानंतर उसळलेल्या दंगलीत नाहक ठार झालेल्यांविषयी कोणी दिलगिरी व्यक्त केली नाही. पंजाबमध्ये झालेल्या दंगलीत ठार झालेल्यांविषयी क्षमायाचना करण्यास आपण खूप वेळ घेतला. देशासाठी ज्यांनी बलिदान दिले त्यांच्या मरणोत्तर आपण त्यांचे ऑडिट करतो. त्यांच्या पुतळ्यांना गोळ्या घालतो. इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांची हत्या झाली; पण काही हिंदुत्ववादी मरणोत्तर त्यांचे ऑडिट करून मते मिळतील का, याचा विचार करतात. जालियनवाला घटना जशी कलंक आहे तशी आपली जातव्यवस्थाही कलंक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले त्याप्रमाणे तो शरीरावरील नव्हे तर आत्म्यावरील कलंक आहे. तो कधी धुऊन काढणार आणि या कलंकाखाली होरपळ होऊ नये म्हणून काय करणार? केवळ सफाई कामगारांचे पाय धुऊन हा कलंक धुतला जाणार नाहीय. महात्मा गांधी जेव्हा दक्षिण आफ्रिकेत काम करत होते म्हणजे तेथील काळ्यांसाठी काम करत होते तेव्हा बाबासाहेब म्हणाले होते की, भारतात प्रत्येक गावात एक दक्षिण आफ्रिका आहे. येथे येऊन त्यांनी काम करावे. अर्थात, महात्मा गांधींनी असे काम करण्यास आपले जीवनव्रत मानले. तेही जातींविरुद्ध लढले. प्रश्न आहे तो आपल्या व्यवस्थेतील विषमतेने त्यांचे नाहक बळी घेतले त्यांच्याविषयी हिंदुत्ववाद्यांच्या मनात काही करुणा आणि पश्चातबुद्धी आहे की नाही? सर्वच हिंदू असतील तर मग काही जणांनाच जातीयतेचे चटके का बसतात? पंतप्रधान मे यांनी दिलगिरी व्यक्त केली. माफी का मागितली नाही, अशी चर्चा सुरू आहे. ती रास्तही आहे; पण आपली व्यवस्था बदलण्यासाठी आपण काय करतोय, हा प्रश्न उरतोयच. ●●●

# भरारी

पडकं घर होतं, घराला दार नव्हतं
चिकल–मातीनं बापानं थोपलं होतं
घर गळत होतं, दारिद्र्यानं न्हात होतं
आयुष्य चिंब–चिंब भिजत होतं
पडकं घर होतं, घराला दार नव्हतं ।।१।।

मन ताठ, जसी रस्त्याची वाट होतं
वाऱ्याला रोखून, वादळाला झेलत होतं.
जिद्दीचं पाऊल, लाटांना हेरत होतं
पडकं घर होतं, घराला दार नव्हतं ।।२।।

लेकरांसाठी कोंड्याचा मांडा करीत होतं
उपाशी पोटानं, तळहातावर तारलं होतं
फाटकं शिवून, अंधाराला दूर सारलं होतं
पडकं घर होतं, घराला दार नव्हतं ।।३।।

ध्येय पक्कं होतं, हत्तीचं बळ होतं
संकटांना सारून, सन्मार्गानं जगायचं होतं
भरारी मारून, आकाश कवेत घेण्याचं होतं
पडकं घर होतं, घराला दार नव्हतं ।।४।।

# साहेब बनायचं हाय!

पोरगं म्हटलं बाला
मलाबी साळा शिकायची हाय
पंधरा ऑगस्ट, सव्वीस जानेवारीला
प्रभात फेरीत सामील व्हायचं हाय

बा म्हटला पोराला,
अरे पोरा,
गावात घर नाही
ग्रामपंचायतीत नाव नाही
बेवारस आपण देशात निशान नाही
अरे लेका, माझ्याजवळ दमडी नाही बरं का
तुझ्या साळंसाठी कुठं मारू मी डाका?

पोरगं म्हटलं
तसलं आता नको करू
फुले, शाहू, आंबेडकरांची
वाट आता धरू

रात रात अभ्यास करीन
क्रांतीचे पाऊल टाकून दावीन
मोक्याची जागा काबीज करीन
बा तुला अन् माईलाबी
लाल दिव्याच्या गाडीत फिरवीन

**– प्रा. डॉ. शेषराव नाईकवाडे**
औंढा नागनाथ, जि. हिंगोली.

# ग्रेट थॉट्स



शत्रुला कधीही दुर्बल समजू नये. अत्यंत बलवान समजूनही त्याला घाबरुन जाऊ नये.

**– छत्रपती शिवाजी महाराज.**

मनाची मशागत हा मानवी अस्तित्वाचा अंतिम हेतू असला पाहिजे.


**– डॉ.बाबासाहेब आंबेडकर**





खरा धर्म हा क्रांतीकारी बल असतो. तो दडपशाही, विशेषाधिकार आणि अन्यायाचा दृढमूल शत्रू असतो.

**– डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन**



जी व्यक्ती तुमची शांतता मागत असेल किंवा तुमचा प्रगतीचा अधिकार नाकारत असेल तर ती तुमचा मित्र होऊ शकत नाही.

**– अलाईस वॉकर**



विनम्रता, सौजन्य आणि विनयशीलता एक उत्तम दौलत आहे.

**– एकवर्ड सिमेन्स**



जेंव्हा एखादी गोष्ट खरी असते, तेंव्हा ती सिद्ध करण्यासाठी कोणत्याही युक्तीवादाची गरज नसते.

**– विनोबा भावे**

नेहमी सुहास्यवदनानं एकमेकांना भेटा कारण स्मितहास्य ही प्रेमाची सुरुवात असते.

**– मदर तेरेसा**





चांगला निवाडा अनुभवातून येत असतो आणि अनुभव वाईट निवाड्यातून मिळत असतो.

**– रिना मे ब्राऊन**

# कोण काय बोलतं...

## प्रियंका गांधी




गंभीर समस्यांनी त्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या सोडविणे हाही राष्ट्रवादच.

## ममता बॅनर्जी (पश्चिम बंगाच्या मुख्यमंत्री)



चुकीच्या पद्धतीने पाठिंबा मिळविण्याचा मोदीचा प्रयत्न.

## भूपेश बघेल (छत्तीसगडचे मुख्यमंत्री)




राजीव गांधी यांच्यावर मोदींची टीका म्हणजे भारतरत्न मिळालेल्या नेत्याचा अपमान होय.

## नवज्योतसिंग सिधू



खोट्या आश्वासनांच्या लाटेमध्ये भाजप बुडणार आहे.

## शरद यादव



बिहारमधील रालोआ आघाडी सरकारचा प्रभाव विरोधकांची आघाडी नाहीशी करेल.

## संजय पांडेय (ज्येष्ठ आयपीएस अधिकारी)



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सहसंचालक नियुक्तीवेळी मला मुद्दाम डावलले.

## जयंत पाटील (राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष)



महाराष्ट्राला पुन्हा विकासाच्या मार्गावर आणायचे असेल तर राज्यात खरे बोलणारे नेतृत्व आणावे लागेल.

## राजू शेट्टी (स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सदस्य)




मंत्र्यांनी केवळ दौरे न करता दुष्काळग्रस्तांचे प्रश्न सोडवावेत अन्यथा रत्यावर उतरु.

## टीम कुक (ॲपलचे सीईओ)



आम्ही दर दोन-तीन आठवड्यांनी कंपनी खरेदी करतो.

## पी.विजयन (केरळचे मुख्यमंत्री)



दोन्ही आघाड्यांना बहुमत मिळणार नाही. सरकार स्थापनेत छोट्या पक्षांची भूमिका महत्वाची.

## अयातुल्ला अली खोमेनी



इराणच्या तेल विक्रीवर बहिष्कार घालण्याने अमेरिकेला काहीही मिळणार नाही.

## ए.बालकृष्णन (विवेकानंद केंद्र कन्याकुमारीचे उपाध्यक्ष)



प्रत्येकाच्या जीवनात त्याग आणि सेवेचा अंतर्भाव असलाच पाहिजे. त्यातूनच महान कार्ये उभी राहतात.

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

हो, मी **"द पीपल्स पोस्ट"** चा वर्गणीदार बनू इच्छितो!

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :
कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. ---------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------- जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : -------------------------------------------------------पत्ता : ----------------------------------

---------------------------------------------------शहर : ------------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------ फोन नं. (घर) : -------------------------

मो. नं. : -----------------------इ-मेल : ---------------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460



With Best Compliments

Sos. Agrotech Pvt.Ltd

